


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार २७ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४




# महाराष्ट्रातील 265 तालुक्यांत कोरडा दुष्काळ जाहीर !

## दुष्काळावर मात करण्यासाठी एकजूटीने प्रयत्न - मुख्यमंत्री

## दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी मदतीच्या केंद्रस्थानी

## 12 उपाययोजना व सवलती लागू; पाणी, चारा, रोजगार, अन्नधान्याची व्यवस्था बळकट होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करू या, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी बारा उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या तालुक्यांमधील परिस्थितीबाबत तत्काळ पंचनामे सुरु करावेत असे निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. पावसाअभावी शेतक-यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल विभाग, कृषि तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीयस्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतक-यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले आहेत. सर्व्हेक्षण करताना पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्रे व जीपीएस कोऑडीनेटद्वारे पिक परिस्थितीचा अहवाल सादर केला जाणार आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नुकताच राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दौरा केला. यावेळी त्यांनी शेतक-यांच्या बांधावर जाउन पाहणी केली. शेतकरी बांधवांशी आस्थेवाईक संवाद साधला. त्यांच्या अडी-अडचणी समजून घेतल्या. दुष्काळी परिस्थितीबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने आज दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत शासन निर्णय जाहीर करण्यात आला.

राज्याचे कृषि आयुक्त यांनी खरीप २०२६ च्या हंगामाचा आढावा घेउन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. त्यामुळे आता या राज्यातील तालुक्यामध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत दुष्काळाबाबतच्या Trigger- १ (प्रथम कळ) अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन



करून पिक परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त भागात विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्यात येणार आहेत. त्यामध्ये जमीन महसूलात सूट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हार्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल), शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज खंडीत केली जाणार नाही, शेतीवर अवलंबून शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी अन्न धान्याचा पुरेसा पुरवठा, टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे, जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे सुरु करणे, अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे या उपाययोजनांचा समावेश आहे.

**सहा महसूल विभागांतील २६५ तालुक्यांचा समावेश**

ट्रिगर-१ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये राज्यातील विविध महसूल विभागांतील तालुक्यांचा समावेश आहे. ठाणे महसूल विभागातील १२, नाशिक विभागातील ४९, पुणे विभागातील ३५, छत्रपती संभाजीनगर विभागातील ७४, अमरावती विभागातील ५६ आणि नागपूर विभागातील ३९ तालुक्यांचा यामध्ये समावेश आहे.

ठाणे महसूल विभागातील रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी, संगमेश्वर व राजापूर तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड व वेंगुर्ला या तालुक्यांना प्रथम कळ लागू झाली आहे. ठाणे व पालघर जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्याचा यामध्ये समावेश नाही. नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील एकूण ४९ तालुक्यांचा, तर पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील ३५ तालुक्यांचा समावेश आहे.छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांतील ७४ तालुक्यांना प्रथम कळ लागू झाली आहे. अमरावती विभागातील बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांतील ५६ तालुक्यांचा, तर नागपूर विभागातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील ३९ तालुक्यांचा समावेश आहे.

**पीक नुकसानीच्या मदतीसाठी स्वतंत्र निर्णय**

दुष्काळग्रस्त शेतक-यांच्या पिकांच्या नुकसानीबाबत विहित कार्यपद्धतीची पूर्तता झाल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे मदत जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे पंचनामे व पीक परिस्थितीचे अचूक सर्वेक्षण करण्याच्या प्रक्रियेला शासनाने विशेष महत्त्व दिले आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, विद्यार्थी, मजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक त्या सवलती व सुविधा वेळेत उपलब्ध करून देत दुष्काळी परिस्थितीचा परिणाम कमी करण्यासाठी शासनाने विविध पातळ्यांवर उपाययोजना सुरू केल्या आहेत.

## लालबागच्या राजाचं विसर्जन

### ◆ गिरगांव चौपाटीवर भाविकांची गर्दी ◆




**मुंबई /प्रतिनिधी-** गेल्या १० दिवसांपासून सुरू असलेल्या गणेशोत्सवाची शुक्रवारी (२५ सप्टेंबर) सांगता झाली आहे. घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये विराजमान झालेल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला आहे. मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूरसह राज्यभरातील गणेश मंडळांनी बाप्पाचं विसर्जन केलं आहे. ढोल-ताशांचा गजर आणि गुलालाची उधळण करत गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष करत भाविकांनी आपल्या लाडक्या विघ्नहर्त्याला निरोप दिला.मुंबई आणि पुण्यात शनिवारीही गणपती बाप्पाच्या विसर्जन मिरवणुका सुरू होत्या. लाडक्या गणरायाला निरोप देताना अनेकजण भावूक झाल्याचे पाहायला मिळाले आहेत. मुंबईतील गणेश विसर्जन सोहळा हा देशभरातील भाविकांसाठी लक्षणीय सोहळा असतो. मुंबईचा राजा, परळचा महाराजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, लालबागचा राजा या गणपतींचं गिरगाव चौपाटीवर विसर्जन होत असतं. या गणपती बाप्पांच्या विसर्जन सोहळ्याची जंगी मिरवणूक निघते. यावर्षी मुंबईत दुस-या दिवशी म्हणजे शनिवारी (२६ सप्टेंबर) सकाळी ११ पर्यंत विसर्जन मिरवणुका सुरू होत्या.मुंबईतील लालबागच्या राजाची विसर्जन मिरवणूक शुक्रवारी दुपारी सुरू झाली होती, त्यानंतर दुस-या दिवशी म्हणजे शनिवारी सकाळी लालबागचा राजा गिरगांवच्या समुद्रकिनारी दाखल झाला होता. लालबागच्या राजाच्या विसर्जन मिरवणुकीत गणेशभक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. त्यानंतर अखेर लालबागच्या राजाचं गिरगांव चौपाटीवर विसर्जन संपन्न झालं आहे. मुंबईतील लालबागच्या राजाचं २२ ते २३ तासांच्या भव्य मिरवणुकीनंतर लालबागचा राजाचं स्थानिक कोळी बांधवांच्या मदतीने विसर्जन पार पडलं आहे. **गिरगांव चौपाटीवर झाली होती मोठी गर्दी-**ढोल-ताशांचा गजर, गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या अशा जयघोष आणि पाणावलेल्या डोळ्यांनी गणपतीला निरोप देण्यासाठी गिरगांव चौपाटीवर भाविकांचा जनसागर लोटला होता. गणेशभक्तांनी गिरगाव चौपाटीवर मोठी गर्दी केली होती. परिसरात उत्साहाचे आणि भावनिक वातावरण निर्माण झालं होतं.

**पुण्यातील दगडूशेठ गणपतीचे विसर्जन-**पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे पांचाळेश्वर घाटावर विसर्जन करण्यात आले आहे. बेलबाग चौकातून दुपारी ४ वाजता मिरवणूकीला सुरवात झाली होती.

## गणेश मंडपात विजेचा जोरदार धक्का;

## 4 जणांचा जागीच मृत्यू, 2 गंभीर जखमी

**मंडला/मध्यप्रदेश/वृत्तसंस्था :**मध्य प्रदेशातील मंडला जिल्ह्यातील नैनपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिरापूर गावात विजेचा धक्का लागून तिघांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत इतर तिघे जखमी झाले आहेत. गणेश विसर्जनानंतर ज्या प्लॅटफार्मवर ही घटना घडली, तिथे लोक झोपले होते. मिळालेल्या माहितीनुसार, गणेश विसर्जनानंतर सुमारे ७ ते ८ तरुण मंडपात झोपले होते. शनिवारी पहाटे ५.३० च्या सुमारास मंडपात वीज पसरली. यात चार तरुणांचा मृत्यू झाला आणि तीन जण जखमी झाले. मृतकांची ओळख जैनू भावरे (१९), रवी झरिया (२४), कृष्ण कुमार भावरे (१८) आणि वीरेंद्र भावरे (२४) अशी पटली आहे. जखमींमध्ये प्रियांशूचा समावेश असून, त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. इतर दोन जखमींवर नैनपूर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गणेशाची मूर्ती हिरापूर गावातील खिरका परिसरात स्थापित करण्यात आली होती. अपघाताची माहिती मिळताच नैनपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी प्रकरणाचा तपास सुरू केला.

## 2027 चा वर्ल्डकप भारतासाठी शेवटचा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**भारतीय क्रिकेट टीमचा दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच फारमॉटमध्ये खेळतायत. मात्र पुढील वर्षी होणा-या आयसीसी पुरुष क्रिकेट वर्ल्डकपसाठी दोघांनीही आपली तयारी आणि लक्ष्य स्पष्ट केले आहे. २०२७ मध्ये दक्षिण आफ्रिकेत होणा-या या मोठ्या स्पर्धेपूर्वी टीम इंडिया घरच्या मैदानावर वेस्ट इंडिजविरुद्धच्या सिरीजने नव्या सिझनची सुरुवात करणार आहे.या सिरीजपूर्वी जिओस्टारशी बोलताना विराट कोहलीने २०२७ च्या वर्ल्डकपसंदर्भात त्याची भूमिका स्पष्ट केली. भारतासाठी हा आपला शेवटचा वर्ल्डकप असेल, असे विराटने म्हटले आहे. त्यामुळे वर्ल्डकप



जिंकण्यासाठी मैदानात आपले सर्वस्व पणाला लावण्याचा निर्धार त्याने व्यक्त केला.

विराट कोहली म्हणाला, ५० ओव्हर्सच्या वर्ल्डकपचा प्रभाव इतर कोणत्याही स्पर्धेपेक्षा जास्त असतो. एका दिवसात तुम्ही अडीच टी-२० सामन्यांइतकं क्रिकेट खेळत असता. मोठ्या स्पर्धेत आणि वर्ल्डकपमध्ये १० सामन्यांपर्यंत हीच तीव्रता कायम ⇨(पान २ वर)

## निवडणूक आयोगाविरोधात ठाकरे बंधू रस्त्यावर

### मुंबईत 'जनमोर्चा'ची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात उद्धवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनमोर्चाची हाक दिली आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक पोस्ट करत याबद्दलची माहिती दिली. ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत हा जनमोर्चा काढला जाणार असून, हा सर्वपक्षीय जनमोर्चा असेल असेही ठाकरे म्हणाले आहेत. राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील जनतेने मोठ्या संख्येने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. केंद्रीय निवडणूक आयोग एसआयआर प्रक्रिया आणि निवडणूक आयोगाने घेतलेल्या काही निर्णयांबद्दल दोन निवडणूक आयुक्तांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. काही निर्णय हे बेकायदेशीर असल्याचे



या आयुक्तांनी म्हटल्याचे समोर आल्यानंतर त्याचे तीव्र राजकीय पडसाद उमटण्यास सुरुवात झाली आहे. याविरोधात आता मनसे-उद्धवसेना मोर्चा काढणार आहे. राज ठाकरे यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. ते म्हणाले, 'सस्नेह जय महाराष्ट्र, देशातील सत्ताधारी पक्षाची जणू काही आपण शाखाच आहोत अशा पद्धतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक आयोगाने एसआयआरच्या नावाखाली मतदारांची जी घोर फसवणूक केली आहे त्याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना येत्या ४ ऑक्टोबर २०२६ ला मुंबईत एक जनमोर्चा काढणार आहे."या मोर्चाच्या आयोजनात जरी महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेनेचा पुढाकार असला तरी हा जनतेचा मोर्चा आहे आणि हा ⇨(पान २ वर)

## अशोक खरात प्रकरणाचा भांडाफोड करणारा पत्रकारच अडकला

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** श्रीरामपूर तालुक्यातील फत्त्याबाद येथील एका महिला ग्रामपंचायत अधिका-याकडे स्मशानभूमीच्या विकासकामात १ लाख रुपयांची खंडणी मागून जातीवाचक शिवीगाळ, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात कथित पत्रकार दत्तात्रय खेमनार याच्यावर खंडणी, अ‍ॅट्रासिटी आणि शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी माधवी नामदेव पलघडमल (वय ४५) या सन २०२२ पासून फत्त्याबाद ग्रामपंचायत कार्यालयात ग्राम विकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. सध्या फत्त्याबाद गावातील स्मशानभूमीत मुरूम टाकून जमीन समतल करण्याचे शासकीय काम सुरू आहे.



गुन्ह्याच्या प्रथम माहिती अहवालानुसार , चांदेवाडी येथील रहिवासी दत्तात्रय पोपट खेमनर हा गेल्या १० ते १२ दिवसांपासून महिला अधिका-याला फोन करून वारंवार त्रास देत होता. स्वतःला पत्रकार असल्याचे सांगून, 'मी भल्या-भल्यांना कामाला लावतो, मला स्मशानभूमीच्या कामात १ लाख रुपये द्यावे लागतील, नाहीतर तुला काम करू देणार नाही, खोट्या केसमध्ये अडकवून तुझी नोकरी घालवेन,' अशी धमकी त्याने दिली होती.आरोपीच्या त्रासाला आणि धमक्यांना ⇨(पान २ वर)

## छगन भुजबळांना न्यायालयाचा मोठा दिलासा !


**मुंबई /प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांना मुंबई विशेष न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथील जमिनीवर केंद्रीय ग्रंथालय बांधण्याच्या कंत्राटात गैरव्यवहार आणि लाचखोरी झाल्याच्या आरोपातून त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. विशेष न्यायालयाने कलिना जमीन घोटाळा प्रकरणात भुजबळ आणि अन्य



आरोपींना दोषमुक्त केले आहे. २००९ मध्ये छगन भुजबळ सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. त्यावेळी कलिना येथील ४ एकर जागेवर ग्रंथालय उभारणीसाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने असा आरोप केला होता की, या व्यवहारात नियमांचे उल्लंघन करून एका खासगी विकासकाला फायदा पोहोचवला गेला आणि यातून सुमारे ७९.२ कोटी ⇨(पान २ वर)

## 1 ऑक्टोबरपासून ज्येष्ठ नागरिक, महिलांना एनसीएमसी कार्ड अनिवार्य

**मुंबई /प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध सवलत योजनांचा लाभ घेणा-या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबर २०२६ पासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. सवलतीचे तिकीट देताना एनसीएमसी कार्डचा वापर करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असून, त्यासाठी कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया राज्यभरातील आगार आणि बसस्थानकांवर सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती एनसीएमसीकार्डने अधिकृत एक्स पोस्टच्या मार्फत दिली. एसटी महामंडळाकडून विविध सामाजिक घटकांना शासन निर्देशानुसार सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते. त्यामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना मिळणा-या सवलतीचा समावेश आहे. या सवलतीच्या प्रवासाचे अधिक सुलभ आणि डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी एनसीएमसी कार्ड प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. १ ऑक्टोबरपासून सवलतीचे तिकीट एनसीएमसी कार्डमधूनच वितरित केले जाणार आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारक प्रवाशांनी त्यापूर्वी एनसीएमसी कार्डची नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. ज्या प्रवाशांकडे कार्यरत एनसीएमसीकार्ड आहे किंवा कार्ड नोंदणी केल्याची क्यूआर कोड असलेली पावती आहे, त्यांना सवलतीचा लाभ मिळणार आहे.




## एमपीएससीविरोधातील आंदोलन 27 सप्टेंबर ऐवजी 2 ऑक्टोबरला

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारातील कथित गैरव्यवहार, परीक्षा मूल्यांकनातील विसंगती आणि आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आक्रमक झालेल्या विद्यार्थ्यांचे आंदोलन आता महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी होणार आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या विनंतीचा मान राखत विद्यार्थ्यांनी २७ सप्टेंबरचे नियोजित आंदोलन तात्पुरते स्थगित केले असून, आता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर रोजी पुण्यात सत्याग्रह पुकारण्यात येणार आहे.मागील काही महिन्यांपासून एमपीएसीच्या विविध परीक्षांमधील गोंधळ, पेपरफुटी प्रकरणे आणि निकालांमधील त्रुटींमुळे स्पर्धा परीक्षा परीक्षार्थींमध्ये असंतोष पसरला आहे.



# वर्धा नदीकाठच्या हातभट्टी अड्ड्यावर छापा

## २८०० लिटर मोहा सडवा नष्ट



**अमरावती/प्रतिनिधीः-** वर्धा नदीकाठच्या शेतशिवारात सुरू असलेल्या अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मितीच्या अड्ड्यावर अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून कारवाई केली. धारवाडा शेतशिवारात केलेल्या या कारवाईत तब्बल २८०० लिटर मोहा मास सडवा आणि २७५ लिटर तयार गावठी दारू आढळून आली. पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले असून, दारू निर्मितीचे साहित्य आणि दोन मोपेडसह एकूण ४ लाख ९० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार ग्रामीण जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कारवाई सुरू आहे. त्याच अनुषंगाने २५ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला धारवाडा शेतशिवारातील वर्धा नदीकाठावर हातभट्टी दारू तयार केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. कारवाईदरम्यान जितेश ऊर्फ गोखरू रामू राठोड (वय ३२, रा. शिदवाडी, ता. तिवसा), महेश लक्ष्मण कोळबते (वय ३१), मंगेश जनार्दन श्रीरामे (वय ३०) आणि धिरज विजय धानके (वय २९, तिघेही रा. लहादेवी, ता. आर्वी, जि. वर्धा) यांना ताब्यात घेण्यात आले. यातील एक जण हातभट्टीचा मालक व चालक, तर तिघे कामगार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, २७५ लिटर तयार गावठी दारूची किंमत २७ हजार ५०० रुपये, तर २८०० लिटर मोहा मास सडव्याची किंमत २ लाख ८० हजार रुपये आहे. याशिवाय दोन TVS ज्युपिटर मोपेड, दोन अँड्रॉइड मोबाइल, युरिया, नवसागर तसेच दारू निर्मितीची भांडी, टोपले आणि नळ्या जप्त करण्यात आल्या. घटनास्थळी आढळलेला मोहा सडवा आणि दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य पंचांसमक्ष नष्ट करण्यात आले. तयार दारूमध्ये युरिया व नवसागर मिसळून दारू तयार केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. या पदार्थांमुळे मानवी आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने तयार दारू, युरिया व नवसागरचे नमुने सीलबंद करून सी.ए. परीक्षणासाठी पाठविण्यात आले आहेत. याप्रकरणी बीएनएस कलम १२३, २७४, २७५ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ६५(फ), ६५(क), ६५(ड) व ६५(ई) अन्वये कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोउपनि. रोहित कुदळे, पोहेका चेतन दुबे, गजानन ठाकरे, सुधीर बावणे आणि सचिन गायधने यांच्या पथकाने केली.

# महिलेला फुस लावून पळवून नेल्याचा आरोप

## -राजापेठ पोलिसांत तक्रार

**अमरावती/प्रतिनिधीः-** मला त्याचा फोन येत आहे. मी आता नाही गेले तर तो आत्महत्या करेल,' असे सांगून एक महिला घराबाहेर पडल्याची घटना समोर आली आहे. त्यानंतर महिलेचा ठावठिकाणा लागला नसल्याने तिच्या वडिलांनी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून राजापेठ पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

संबंधित महिला आपल्या तीन मुलांसह वडिलांच्या घराशेजारी राहते. तिच्या सात वर्षीय मुलाची प्रकृती बिघडल्याने त्याला उपचारासाठी इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान महिलेची एका तरुणासोबत ओळख झाली. त्यानंतर दोघांचा संपर्क वाढला. २१ सप्टेंबर रोजी रात्री महिला आपल्या लहान मुलीला घेऊन जात असताना शेजारी राहणाऱ्या व्यक्तीने तिला पाहिले. त्यांनी महिलेला विचारणा केली असता, 'एका तरुणाचा फोन येत आहे. मी आता नाही गेले तर तो आत्महत्या करेल,' असे महिलेने शेजारी राहणाऱ्या व्यक्तीला सांगितले. त्यानंतर महिला निघून गेली. त्यानंतर महिला घरी परतली नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी तिचा शोध घेतला, मात्र ती आढळून न आल्याने वडिलांनी राजापेठ पोलिसांत धाव घेतली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, तरुणी व तिच्या मुलीचा शोध सुरू आहे.

# दै. हिंदुस्थानचा प्रतिष्ठित प्रभास सन्मान उद्या घोषित होणार




**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भातील अग्रणी अशा दै. हिंदुस्थान परिवाराच्या वतीने स्व. प्रभा अरुण मराठे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठित असा सामाजिक सेवा पुरस्कार 'प्रभास सन्मान' उद्या दि. २८ सप्टेंबर रोजी घोषित केला जाणार आहे. प्रभास सन्मान गेल्या तीन वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेस दिला जातो. २५००० रुपये रोख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. हा पुरस्कार स्व. प्रभा अरुण मराठे यांच्या स्मृतिदिनाच्या दिवशी घोषित केला जातो आणि स्व. डॉ. अरुण मराठे यांच्या स्मृतीदिनाच्या दिवशी म्हणजे २० नोव्हेंबर रोजी समारंभपूर्वक प्रदान केला जातो. प्रभास सन्मान निवड समितीमधे पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील हे अध्यक्ष असून अनंत कौलगीकर (यवतमाळ), पराग पांढरीपांडे (नागपूर), अनुराधा आळशी (अमरावती) आणि प्रा. डॉ. सावन देशमुख (अमरावती) हे सदस्य आहेत. यावर्षी या निवड समितीने एका संस्थेची प्रभास सन्मानाकरीता निवड केली आहे. सदर घोषणा उद्या दि. २८ सप्टेंबर रोजी केली जाणार आहे.

# भरधाव कारची धडक, वृद्धाचा मृत्यू

**दाभा गावाजवळ अपघात**

**अमरावती/प्रतिनिधीः-** कर्तव्यावर जाण्यासाठी घराबाहेर पडलेल्या ७० वर्षीय वृद्धाचा भरधाव कारच्या धडकेत दुर्दैवी अंत झाला. मागून आलेल्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने नारायण लालुजी टेभुर्णे (वय ७०, रा. दाभा) हे रस्त्यालगतच्या नाल्यात फेकले गेले. गंभीर दुखापतीमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. कुटुंबीयांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे दाभा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बडनेरा पोलिसांच्या हद्दीतील दाभा गावाजवळ शनिवार, २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता हा भीषण अपघात घडला. नारायण टेभुर्णे हे दाभा परिसरातील वेअर हाऊसमध्ये कार्यरत होते. शनिवारी नेहमीप्रमाणे ते दुचाकीवरून कर्तव्यावर जाण्यासाठी निघाले होते. घरातून बाहेर पडताना त्यांना आपण पुन्हा घरी परतू की नाही, याची कल्पनाही नसावी; मात्र काही अंतरावरच काळाने त्यांच्यावर घाला घातला.

## सुरेशराव भोंगाडे यांचे निधन



**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** बोर्डा येथील श्री. गुरुदेव विद्या मंदीराचे माजी सेवानिवृत्त कर्मचारी तथा श्री गुरुदेव सेवा भजनी मंडळाचे सदस्य सुरेशराव नथ्थुजी भोंगाडे यांचे वयाच्या ६५ वर्षी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, स्नुषा, जावाई, नातू नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व. सुरेशराव भोंगाडे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

# १ व १० वरिल उर्वरित

## २०२७ चा वर्ल्डकप भारतासाठी

ठेवणे मोठे आव्हान असते.वर्ल्डकप परदेशात होणार असल्याने आव्हान आणखी वाढणार असल्याचेही विराटने सांगितले. यावेळी स्पर्धा परदेशातील होणार आहे. त्यामुळे त्याचा शरीरावर आणि मानसिकतेवरही मोठा परिणाम होतो. माझ्यासाठी भारताकडून खेळण्याचा हा शेवटचा वर्ल्डकप असेल आणि हीच माझी प्रेरणा आहे. मैदानावर आपलं सर्वस्व द्यायचं आहे. वर्ल्डकप जिंकणं हेच लक्ष्य आहे. त्यासाठी जे काही करावं लागेल ते करण्यासाठी मी पूर्णपणे तयार आहे, असे विराट म्हणाला.दरम्यान रोहित शर्मानेही २०२७ च्या वर्ल्डकपबाबत त्याची भूमिका स्पष्ट केली. २०२३ च्या वर्ल्डकपमध्ये भारताला अंतिम सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे रोहितसाठी या स्पर्धेतले अपूर्ण काम अजूनही कायम आहे. जिओस्टारशी बोलताना रोहित म्हणाला, आपलं काम पूर्ण झालं आहे, असा विचार माझ्या मनात कधीच येणार नाही.

## निवडणूक आयोगाविरोधात ठाकरे

एका पक्षापुरता न राहता तो तमाम राजकीय व्यवस्थेचा आणि जनतेचा आवाज ठरेल यासाठी आम्ही सर्व राजकीय पक्षांना या मोर्चा मध्ये सहभागी होण्यासाठी संवाद साधणार आहोत', अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली आहे. 'अर्थात महाराष्ट्रातील जनतेलाच आवाहन आहे की आपण मोठ्या संख्येने या मोर्च्यात सहभागी व्हा. बाकी मोर्च्याची वेळ आणि ठिकाण लवकरच कळवण्यात येईल. तेंव्हा एसआयआरविरोधातील या जन मोर्च्यात भेटूया ! या , देशातील लोकशाही आणि या देशाचे संविधान वाचवण्यासाठी एकत्र या', असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे.

## अशोक खरात प्रकरणाचा

घाबरून फिर्यादी महिला अधिका-याने १४ सप्टेंबर रोजी १,१०० रुपये ऑनलाईन वर्ग केले होते. मात्र, तरीही आरोपीचा तगादा सुरूच राहिला. एवढेच नव्हे तर, त्याने मुरूम पुरवठा करणा-या ठेकेदाराकडूनही पैसे उकळल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. सदर प्रकरणी दत्तात्रय खेमनारला रात्री अटक झाली आहे

२४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता फत्त्याबाद येथील स्मशानभूमीत JCB च्या साह्याने मुरूम लेव्हल करण्याचे काम सुरू असताना, आरोपी दत्तात्रय खेमनार काळ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून तिथे आला. त्याने प्रत्यक्ष काम करणा-या सागर चांदे व संकेत पाडेकर या कर्मचा-यांना शिवीगाळ करत काम तात्काळ थांबवण्यास भाग पाडले. विशेष म्हणजे, आरोपी दत्तात्रय खेमनार हा यापूर्वी चर्चेत आलेल्या 'अशोक खरात प्रकरण' समोर आणणारा पत्रकार म्हणून ओळखला जातो. आता त्याच्यावरच थेट १ लाखाच्या खंडणीचा आणि ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोणी पोलीस करत आहेत.

## छगन भुजबळांना न्यायालयाचा

रुपयांचे नुकसान राज्य सरकारच्या तिजोरीचे झाले. भुजबळ यांनी त्यांच्या हाताखालील कर्मचा-यांना प्रकल्पाच्या आकड्यांमध्ये फेरफार करण्यास, निविदा नियमांमध्ये बदल करण्यास किंवा अटी दडपण्यास सांगितले होते, याचा कोणताही पुरावा नाही, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला. छगन भुजबळ यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून त्यांचे प्रशासकीय कर्तव्य बजावले होते. हा निर्णय एका उपसमितीचा सामूहिक निर्णय होता आणि यामध्ये कोणत्याही प्रकारच्या गुन्हेगारी कटाचा किंवा बेकायदेशीर फायद्याचा ठोस पुरावा सरकारी पक्ष मांडू शकला नाही. केवळ खात्याचे प्रमुख असणे म्हणजे गुन्हेगारी कटात सहभाग असणे असे होत नाही, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने त्यांना दोषमुक्त केले.**अखेरचा खटलाही रद्द-** छगन भुजबळ यांच्यावर दाखल असलेल्या सर्व प्रकरणांपैकी हे अखेरचे थकीत प्रकरण होते.

## अमरावतीत बाप्पाला निरोप

घरगुती गणपतीपासून ते मोठ्या सार्वजनिक मंडळांच्या मूर्तीपर्यंत सर्वच ठिकाणी रांगा लागल्या होत्या. लहान मुलंही गणपती बाप्पाला हातात घेऊन विसर्जनाकरिता आले होते. अनेक मोठ्या मंडळांनी ट्रॅक्टर-ट्रॉली आणि उचलून डोक्यावर मूर्ती आणून विसर्जन केले. ढोल-ताशे वाजत-नाचत गात भक्तांनी लाडक्या बापाला निरोप दिला. विसर्जनाच्या वेळी सुरक्षेसाठी तलावाच्या काठावर पोहणारे आणि लाईफ जॅकेट घातलेले सुरक्षा कर्मचारी तैनात होते. पाण्याची पातळी वाढल्याने खोल पाण्यात जाण्यास मनाई होती. महिला, लहान मुले आणि वयोवृद्धांना मूर्ती विसर्जनासाठी पोलिसांनी स्वतः मदत केली. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही आणि वॉच टॉवर उभारण्यात आले होते.दहा दिवस घरात विराजमान असलेल्या बाप्पाला निरोप देताना अनेकांचे डोळे पाणावले होते. विशेषतः लहान मुलांमध्ये एकाच वेळी उत्साह आणि दुःख असे दोन्ही भाव दिसत होते. अनेक चिमुकल्यांनी बाप्पाला घट्ट मिठी मारून 'पुढच्या वर्षी लवकर या' अशी आर्त हाक दिली. एकंदरीत, अमरावतीकरांनी शिस्तबद्ध पद्धतीने आणि पर्यावरणपूरक पद्धतीने बाप्पाचे विसर्जन करून उत्सवाची सांगता केली.

## जिप आरोग्य विभागात आढळला

आरोप करण्यात आला आहे.तक्रारदाराने या प्रकरणाची सखोल, वस्तुनिष्ठ आणि पारदर्शक चौकशी करण्याची मागणी केली आहे. औषधांची खरेदी कधी करण्यात आली, त्यांची मुदत किती होती, कोणत्या आरोग्य संस्थांना किती औषधे वितरित करण्यात आली, उर्वरित औषधांचा साठा वेळेत का हलविण्यात आला नाही, तसेच औषधे कालबाह्य झाल्याची माहिती प्रशासनाला कधी मिळाली, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच कालबाह्य औषधांचा साठा नियमाप्रमाणे स्वतंत्रपणे सुरक्षित ठेवून त्याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया करण्यात आली आहे का, याचीही चौकशी करण्याची यावी, औषधे व प्रसाधने कायदा व संबंधित नियमांच्या अनुषंगाने ही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली असून, कालबाह्य औषधांचा गैरवापर अथवा अनधिकृत वितरण होऊ नये यासाठी प्रशासनाने तत्काळ खबरदारी घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात जबाबदारी निश्चित करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी आणि शासकीय निधीच्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. या प्रकारामुळे प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर एकदा पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. औषध प्रशासन विभागाचे सह आयुक्त अनिल मानकर यांच्या नेतृत्वात ही कार्यवाही करण्यात आली आहे.

## पैशांच्या वादातून तरुणाचा खून

असलेल्या संशयिताला पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे ताब्यात घेतले. त्यानंतर त्याने दिलेल्या माहितीनुसार मृतदेह हस्तगत करण्यात आला. २४ सप्टेंबर रोजी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत होते. यावेळी नागपुरी गेट चौकात एक इसम ऑटोबाबत विचारणा करीत असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना मिळाली. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पथकाने माहितीची खातरजमा सुरू केली. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी माहुली रोड परिसरातील शेतशिवारात शोध घेतला. तेथे मोहम्मद राजीक मोहम्मद काफील (वय २१, रा. हबीब नगर, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, चौकशीदरम्यान त्याने पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादानंतर मोहम्मद तौफिक मोहम्मद शफीक (वय २७, रा. नालसाबपूरा) याचा खून केल्याची माहिती दिली. तसेच मृतदेह धामणा शेतशिवारातील नाल्याजवळ प्लास्टिकच्या पोत्यात ठेवून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी ऑटो शोधत असल्याचे त्याने सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले. त्यानंतर पथकाने संबंधित ठिकाणी पाहणी केली असता पोत्यात मृतदेह आढळला. मृताच्या नातेवाइकाच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात बीएनएस कलम १०३(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ने केली असून सायबर पथकाने तपासात सहकार्य केले.

## प्रा.अनिल बंड जिजाऊ बँकेच्या

निचळ बँकीग तज्ञ ,चार्टर्ड अकाऊंट शुभम वानखडे व बँकेचे प्रभारी सीईओ हरीश नाशिरकर व बँकेच्या प्रभारी उप मु.का. अधिकारी उपस्थित होते. प्रा.अनिल बंड कृषी हवामान तज्ञ असुन ते जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेच्या स्थापनेपासुनच बॅकेच्या विकासासाठी कटीबद्ध व सदैव प्रामाणिक राहीले आहे.त्यांचा विदर्भात नावलौकिक आहे. जिजाऊ कमर्शियल को-ऑप.बँकेने नऊ सदस्यांचे व्यवस्थापन मंडळ २०२४ मधे निवडणुका झाल्यानंतर निर्माण केले होते . ईजी तथा प्रसिद्ध ऊद्योजक ईजी.राजेंद्र जाधव हे दुस-या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष होते.तर ईजी.अविनाश कोठाळे,प्रा.अनिल बंड,बबन आवारे,स्वप्निल वावरे,सुरेन्द्र दाळु,शुभम वानखडे,प्रा अनिल बुरघाटे,गोपाळकृष्ण निचळ हे सदस्य आहेत. परंतु राजेन्द्र जाधव अध्यक्ष यांनी माहे मार्च २०२६ला राजीनामा दिल्याने अध्यक्ष पद रिक्त झाले होते. प्रा अनिल बंड हे २०२१ते २०२३ पर्यंत प्रथम व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष होते.त्यांचा बँकेच्या सभासदांमधे लोकप्रियता आहे.प्रा अनिल बंड यांची एकमताने निवड करण्यात आली.

## अभ्यासिकेच्या टेरेसवर

हल्ल्यासह पाठलाग व धमकीच्या आरोपांची नोंद तपासात घेतली आहे. पीडितेच्या जबाबावरून नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २३९/२०२६ दाखल करण्यात आला. बीएनएसच्या कलम ७४, ७८(१)(i), १०९(१) आणि ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. तपास पथकाने विविध ठिकाणी शोध घेत अखेर अभिषेक बावीस्थळे याला घटनेनंतर २४ तासांच्या आत ताब्यात घेत अटक केली. त्याला न्यायालयासमोर हजर केल्यानंतर पोलीस कोठडी मिळाली असून, पुढील तपास नांदगाव खंडेश्वर पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक आनंद पिदुरकर यांच्या नेतृत्वात पोहवा प्रशांत पोकळे, अजय राजुरकर आणि मपोहेका रेखा चव्हाण यांच्या पथकाने केली.

## अचलपूर - परतवाडात मोकाट

अनेक नागरिक गंभीर जखमी सुद्धा झाले आहे. त्यामुळे जुळ्या शहरवासीयांत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. यासंदर्भात विविध वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाले होते.या पार्श्वभूमीवर विविध सामाजिक ,राजकीय आणि विविध पक्षातील नगरसेवकांनी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने आणि मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत ही मोहीम तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती.याची तत्काळ दखल अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने आणि मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी घेतली .या मोहिमेमध्ये जुळ्या शहरातील मोकाट श्वानांचे निर्बीजीकरण व लसीकरण केले जाणार आहे. शस्त्रक्रियेनंतर श्वानांना तीन ते चार दिवस देखरेखीखाली ठेवले जाईल आणि त्यानंतर त्यांना मूळ ठिकाणी परत सोडले जाईल. ही संपूर्ण प्रक्रिया प्राणी कल्याण संस्था – सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन तर्फे पार पडणार आहे. ही संस्था ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाकडे नोंदणीकृत असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काम करत आहे. अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाकडून शहरवासीयांना आवाहन केले आहे की, या मोहिमेला सहकार्य करावे, मोकाट श्वानांच्या हल्ल्यांपासून खबरदारी घ्यावी तसेच लहान मुलांना व ज्येष्ठ नागरिकांना एकटे सोडू नये. या मोहिमेद्वारे भविष्यात मोकाट श्वानांची संख्या नियंत्रित करण्याचे उद्दिष्ट अचलपूर नगर परिषद प्रशासनाने ठेवले आहे.

## चार सराईत आरोपी

आले होते. त्यामुळे परतवाडा पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम ५५ अन्वये दोघांच्या तडीपारीचा प्रस्ताव सादर केला होता. दुसरीकडे, शिरखेड पोलिसांनी मोर्शी तालुक्यातील राजुरवाडी येथील कुलदीप दादाराव अंभोरे (वय २५) आणि अक्षय सुधाकर मोहोकार (वय २८) यांच्याविरुद्ध तडीपारीचा प्रस्ताव दाखल केला होता. दोघांवर मालमत्ता व शरीराविरुद्धचे गुन्हे असल्याचे तसेच त्यांच्या कृत्यांमुळे परिसरातील कायदा-सुव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे पोलिसांनी प्रस्तावात नमूद केले होते. या प्रस्तावांवर सुनावणी व चौकशीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. संबंधितांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी अचलपूर आणि मोर्शी यांनी उपलब्ध कागदपत्रे व प्रकरणातील नोंदींची छाननी करून आपले अहवाल सादर केले. या चौकशी अहवालांच्या आधारे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी २२ सप्टेंबर रोजी तडीपारीचे आदेश जारी केले. आदेशानुसार पेंदे व मंडले यांना सहा महिने, तर अंभोरे व मोहोकार यांना तीन महिने अमरावती जिल्ह्याच्या हद्दीतून बाहेर राहावे लागणार आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असून त्याचे उल्लंघन केल्यास पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

## गणपती विसर्जनादरम्यान युवकाचा

२०२६ रोजी पोलीस विभाग व NDRF च्या टीमने सकाळी शोध मोहिमेस सुरुवात केली. बेंबळा नदीत ३ ते ४ किमी अंतरावर फुबगांव लगत नदी पात्रात तिसऱ्या दिवशी सुमितचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळला. मृतदेह बाहेर काढून ग्रामीण रुग्णालय, नांदगाव खंडेश्वर येथे शवविच्छेदनासाठी नेण्यात आले व शवविच्छेदनानंतर मृतदेह परिवाराच्या स्वाधीन करण्यात आला. प्रथमच नांदगाव खंडेश्वर शहरात गणपती विसर्जनाला असे गालबोट लागल्याने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

## कुऱ्हावासीयांची पर्यावरणपूरक

उपस्थिती होती. ढोल-ताशांचा गजर, गणरायाचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक श्रद्धा जपत पर्यावरणाचेही संरक्षण करता येते, याचा आदर्श या कुटुंबांनी घालून दिला.यंदा कमी पर्जन्यमानामुळे अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच जलस्रोतांचे वाढते प्रदूषण, पाण्याची कमतरता आणि जनावरांसाठी उपलब्ध पाण्याचे संवर्धन करण्याची गरज लक्षात घेता पर्यावरणपूरक विसर्जनाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. गणेशमूर्तींच्या विसर्जनामुळे नदी, तलाव, धरणे आणि इतर नैसर्गिक जलस्रोतांचे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी घरगुती विसर्जन तसेच कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर करण्याचे आवाहन ग्रामपंचायतीकडून करण्यात आले होते. श्रद्धेसोबत पर्यावरणाची जबाबदारी जपणाऱ्या या उपक्रमातून 'गणरायाला भक्तिभावाने निरोप, पर्यावरणाला प्रदूषणापासून दिलासा' असा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

## अमरावती कबड्डी संघ असोसिएशनच्या

मिळाल्याबद्दल आझाद हिंद मंडळांनी पदाधिकारी व शिवसेनेचे महानगर प्रमुख संतोष बद्रे यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पदाधिकारी व शिवसेनेचे महानगर प्रमुख संतोष बद्रे यांचे अभिनंदन करत त्यांच्या नेतृत्वाखाली अमरावतीतील कबड्डी क्षेत्राला अधिक चालना मिळावी, तसेच जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन व योग्य व्यासपीठ मिळावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

कबड्डी हा ग्रामीण भागापासून शहरापर्यंत मोठ्या प्रमाणावर खेळला जाणारा पारंपरिक व लोकप्रिय खेळ आहे. अमरावती जिल्ह्यातही या खेळाची मोठी परंपरा असून अनेक होतकरू खेळाडू विविध स्तरांवर आपल्या खेळाची चमक दाखवत आहेत. अशा परिस्थितीत असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्याने कबड्डीच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.यावेळी आमदार धीरज लिंगाडे, राज राजेश्वर माऊली, माजी महापौर तथा विरोधी पक्षनेते तथा प्रभागाचे नगरसेवक विलास इंगोले, माजी खासदार अनंतराव गुढे, नितीन सराफ, निलेश सराफ, प्रवीण चौधरी, संतोष चिखलकर, मयूर जलतारे, नंदू गुंबळे यांच्यासह आझाद हिंद मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, कबड्डीप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आष्टी येथे घराजवळ

बांगले यांना संपर्क करून घटनास्थळी बोलावण्यात आले.

सर्पमित्रांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता तो अजगर असल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी अथक प्रयत्न करून अजगराला सुरक्षितपणे रेस्क्यू केले.या अजगराची लांबी अंदाजे ८ ते १० फूट असून वजन सुमारे १५ ते २० किलो असल्याचे सांगण्यात आले. अजगराचे सुरक्षितपणे रेस्क्यू झाल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## गुरुकुंज मोझरीत दुष्काळी शासन

दुष्काळामुळे खरीप हंगामातील सोयाबीनसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत सरकारने केलेली दुष्काळी घोषणा शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अपुरी असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. 'सर्व पिक उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी एक लाख रुपये मदत द्या', अशी प्रमुख मागणी यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी वाळलेल्या सोयाबीनसह शासन निर्णयाची होळी करत सरकारच्या दुष्काळी धोरणाचा निषेध केला. 'शेतकरी विरोधी सरकारचा निषेध असो', 'शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.पिके हातची गेली, उत्पादन खर्चही निघण्याची शक्यता नाही, अशा परिस्थितीत केवळ सवलती जाहीर करून प्रश्न सुटणार नाही. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने भरीव मदत जमा करावी आणि सरसकट हेक्टरी एक लाख रुपयांची मदत जाहीर करावी, अशी मागणी यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी राजिक शेख, विवेक ठाकरे, मनोज दिगांबरे, संदीप हगवणे, सतीश मुंद्रे, अनिल मेश्राम, रमेश हिवराळे, सलीम शेख, सुनील देहणकर, उमेश गणेश, संजय खेरडे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या

प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांसह राणीगाव येथे शोककळा पसरली. विशेष म्हणजे, अमरावती जिल्ह्यात यापूर्वीही आश्रमशाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या घटना चर्चेत आल्या आहेत. त्यामुळे यावेळी घडलेल्या घटनेनंतरही विद्यार्थ्यांच्या आरोग्याची निगा, आजारपणाच्या वेळी मिळणारी वैद्यकीय मदत आणि आपत्कालीन परिस्थितीत केली जाणारी कार्यवाही याकडे लक्ष वेधले गेले आहे. मात्र, भातकुलीतील विद्यार्थिनीच्या मृत्यूमागे नेमके कारण काय होते, याबाबत चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणताही निष्कर्ष काढता येणार नाही. घटनेची माहिती मिळाल्यानंतर आमदार केवलराम काळे यांनी राणीगाव येथे जाऊन मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले.

**प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत चौकशी-** भातकुली येथील अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यूची प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे. विद्यार्थिनीच्या मृत्यूचे नेमके कारण चौकशीनंतर स्पष्ट होईल. चौकशीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

## राधे गणेशोत्सव मंडळाच्या विसर्जन

झालेली हे विसर्जन मिरवणुकीत विशेष आकर्षण होते. लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले , सावित्री फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे या महापुरुषांच्या व शहीद विकास उईके यांच्या प्रतिमा सुद्धा या विसर्जन मिरवणुकीत होत्या. यावेळी महिलांचे भजन दिंडीतील फुगडी व महिलांचा लक्षणीय सहभाग होता. विसर्जन मिरवणुकीत धारणी वरून आलेले आदिवासी नृत्याने नांदगाव वासियांचे लक्ष वेधले. न.प.चे गटनेते प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात मंडळाचे अध्यक्ष अक्षय हिवराळे ,उपाध्यक्ष भूमेश्वर गोरे ,निलेश मारोटकर, प्रेम हिवराळे ,निलेश झिमटे ,महेश वानखडे ,गजानन तायडे ,आकाश मंगळे ,मयूर लोखंडे ,पवन जेवडे ,आदित्य खडसे ,आदित्य अवचारे ,नितीन मोकळेकर, ओम रूमने ,मनिष चौधरी ,जय जेवडे ,सौरभ सावळे ,पवन तानकर, गोकुळ हिवराळे ,अनिकेत गटूले ,अंकित पाळनकर, सुरज गडलिंग ,किशोर मासोतकर इत्यादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २७ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## ‘जीआर’ने दुष्काळ हटणार नाही; शेतक-यांच्या खात्यात पैसे जमा करा!

### आ. साजिद खान पठाण यांची सरकारवर रोखठोक टीका

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून राज्य सरकारने शासन निर्णय काढला असला, तरी केवळ कागदावर दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांच्या हातात काय पडणार? असा थेट सवाल अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी उपस्थित केला आहे. दुष्काळाची घोषणा नव्हे, तर शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष आर्थिक मदत जमा करणे हीच आजची खरी गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात पावसाने मोठी ओढ दिल्याने अनेक भागांतील खरीप पिके उद्ध्वस्त झाली आहेत. पिकांवर खर्च केलेला उत्पादन खर्चही वसूल होण्याची शक्यता कमी झाली असून शेतकरी आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडला आहे. अशा परिस्थितीत दुष्काळ जाहीर करून केवळ योजनांची यादी जाहीर करणे किंवा शासन निर्णय काढणे पुरेसे नाही. मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोहोचली पाहिजे, अशी मागणी आ. पठाण यांनी केली. ‘शेतकऱ्यांच्या शेतात पीक उरलेले नाही. उत्पादन खर्चही निघण्याची शक्यता नाही. अशा वेळी पंचनामे, अहवाल आणि कागदोपत्री प्रक्रियेत शेतकऱ्यांचा वेळ घालवण्यापेक्षा सरकारने सरसकट आर्थिक मदत जाहीर करून ती थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी,’ अशी भूमिका त्यांनी मांडली. दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांसाठी शासनाने विविध सवलती व उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मात्र शेतकऱ्यांना नेमकी किती प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळणार, याबाबत ठोस रक्कम स्पष्टपणे समोर येणे आवश्यक असल्याचे पठाण यांनी म्हटले.



**‘‘दुष्काळ जाहीर झाला; आता मदतीची प्रतीक्षा**

राज्यातील २६५ तालुक्यांना दुष्काळग्रस्त घोषित करण्याचा निर्णय झाल्यानंतर आता शेतकऱ्यांचे लक्ष प्रत्यक्ष मदतीकडे लागले आहे. सरकारच्या निर्णयानंतर विविध सवलती आणि मदतीच्या उपाययोजना लागू होणार असल्या तरी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष आर्थिक मदत कधी आणि किती पोहोचणार, हा प्रश्न आ. पठाण यांच्या मागणीमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

#### सरसकट हेक्टरी एक लाखांची मदत द्या

शेतकऱ्यांची सध्याची परिस्थिती लक्षात घेता कोणत्याही मर्यादेशिवाय सरसकट प्रतिहेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी आ. पठाण यांनी केली. दुष्काळाची तीव्रता पाहता मदतीसाठी कागदोपत्री अटी, विलंब आणि पंचनाम्यांच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना अडकवून ठेवणे योग्य ठरणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

#### दौरे, फोटोसेशन नको; खात्यात मदत हवी!

‘शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी, दौरे, फोटोसेशन आणि रील्स करण्यापेक्षा त्यांच्या खात्यात प्रत्यक्ष मदतीची रक्कम जमा करा,’ असा टोला आ. पठाण यांनी सरकारला लगावला. शेतकऱ्याला आज घोषणेची नव्हे, तर आर्थिक आधाराची गरज आहे. त्यामुळे शासनाने तातडीने ठोस आर्थिक पॅकेज जाहीर करून त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

#### ‘मदत नाही तर काँग्रेसचा संघर्ष’

दुष्काळामुळे शेतकरी वर्ग पूर्णपणे हताश आणि संकटात आहे. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांना तातडीने सरसकट आर्थिक मदत दिली नाही, तर काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या हक्कासाठी पूर्ण ताकदीने संघर्ष करेल, असा इशाराही आ. साजिद खान पठाण यांनी दिला.

## वीजबिलाच्या तगाद्याची तक्रार

### अनधिकृत वीजवापराबाबतही चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यातील दापुरी खुर्द येथील संतोष वामन भालेराव यांनी वीजबिल भरण्यासंदर्भात झालेल्या दूरध्वनीवरील संभाषणाबाबत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे. तसेच गावातील काही ठिकाणी कथितरीत्या होत असलेल्या अनधिकृत वीजवापराबाबतही तपासणी करून नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

भालेराव यांच्या तक्रारीनुसार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी लाईनमन कलीम शेख यांनी त्यांच्याशी वीजबिल भरण्याच्या संदर्भात दूरध्वनीवरून संपर्क साधला. यावेळी सध्या आर्थिक परिस्थिती हलाखीची असून, शेतातील सोयाबीन पिकाचे पावसाअभावी नुकसान झाल्याने



आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. वीजबिल भरण्यासाठी तीन दिवसांची मुदत देण्यात यावी, अशी विनंती केल्याचे भालेराव यांनी नमूद केले आहे. मात्र, दुसऱ्या दिवशीपर्यंत वीजबिल न भरल्यास घरातील वीजपुरवठा खंडित करण्यात येईल, असे सांगण्यात आल्याचा आरोप भालेराव यांनी केला आहे. त्यानंतर घरातील उदरनिर्वाहासाठी साठवून ठेवलेला गहू विकून वीजबिलाची रक्कम भरावी लागल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

## साखरडोह येथे गणेश मंडळाच्या वतीने प्रबोधनपर प्रवचनाचा कार्यक्रम

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील साखरडोह येथील जय बजरंग बाल गणेश मंडळाच्या वतीने सामाजिक कार्यकर्त्या सौ. अश्विनीताई अवताडे यांचा प्रबोधनपर प्रवचनाचा कार्यक्रम दि. २२ रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमात अश्विनीताई यांनी तरुण मुलांना व्यसनापासून होणारे दुष्परिणाम व सोशल मीडियाचे दुष्परिणाम आणि या गोष्टी पासून दुर राहून स्वतःला कसं सुरक्षित करायचं याची माहिती दिली.

तसेच तरुण मुलांनी व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन इतर गोष्टींचा मागे न लागता स्वतःचे व्यवसाय चालू करावे आपला पूर्ण वेळ आपल्या भविष्यासाठी द्यावा. योग्य , सकस आहार घ्यावा . तरुण मुलं हे देशाचे भविष्य आहेत या



मुलांमध्ये काम करण्याची खूप जास्त ऊर्जा असते त्यामुळे गणेशोत्सव किंवा कुठल्याही धार्मिक कार्यक्रमानिमित्त नाच गाण्याचे कार्यक्रम न ठेवता समाजप्रबोधन कार्यक्रम ठेवून समाजाला योग्य दिशा देऊन आपली संस्कृती टिकून राहिल अशा प्रकारे कार्यक्रम आयोजित करावे. हे तरुण मुलंच करु शकतात फक्त त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे

असे यावेळी अश्विनीताई अवताडे यांनी सांगितले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष सचिन गावंडे, उपाध्यक्ष ऋषिकेश भोयर, सचिव रघुनाथ भोयर, पार्थ भोयर व आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर गायकवाड़ ,जयश्रीताई भोयर

अजय भोयर प्रतिक भोयर हेमंत देशमुख , शिवाजी भोसले, साई गावड़े श्रिनाथ भोयर आयुष भोयर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला महिला मंडळी मोठया संख्येने उपस्थित होती.

## शेतक-यांना विविध सवलती व उपाययोजनांचा दिलासा

### दुष्काळसदृश परिस्थितीच्या यादीत वाशिम जिल्ह्यातील सहाही तालुके समाविष्ट

### पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पाठपुराव्याला यश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

खरीप हंगामातील पर्जन्यमानातील तूट, पिकांची प्रतिकूल स्थिती आणि उपलब्ध पाणी परिस्थितीचा विचार करून वाशिम जिल्ह्यातील तालुक्यांचा दुष्काळसदृश परिस्थितीच्या यादीत (ट्रीगर-१) समावेश करण्यात आला आहे. याबाबत राज्य शासनाने आज शासन निर्णय निर्गमित केला आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दुष्काळसदृश परिस्थितीतील विविध उपाययोजना व सवलतींचा लाभ मिळावा, यासाठी राज्याचे कृषीमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यामुळे यश आले आहे.

खरीप २०२६ मधील पर्जन्यमानातील तूट, पिकांची स्थिती आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून कृषी आयुक्तांच्या अहवालाच्या



आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती आढळून आली आहे. त्यामध्ये वाशिम जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. पालकमंत्री श्री भरणे यांनी स्वतः वाशिम जिल्ह्यात पाहणी करून सविस्तर आढावा घेतला व मदतीच्या अनुषंगाने पाठपुरावा केला.

#### शेतकरी व नागरिकांना विविध सवलती

दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर झालेल्या भागात नागरिक व शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन निर्णयानुसार विविध उपाययोजना लागू करण्यात येणार आहेत. यामध्ये जमीन महसूल वसुलीस सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती तसेच कृषी पंपाच्या वीजबिलात सवलत यांचा समावेश आहे. तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांच्या निकषांमध्ये शिथिलता, आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याचे टँकर, शेतीपंपाची वीज जोडणी खंडित न करणे, शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी व मजुरांसाठी अन्नधान्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा व्यवस्था आणि जलसंधारणाची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येणार आहेत. पिण्याचे तसेच जनावरांच्या पाण्याचे नियोजन करण्याच्या उपाययोजनाही करण्यात येणार आहेत.

#### पिकांचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश

शासन निर्णयानुसार बाधित भागातील पिकांचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. सर्वेक्षणादरम्यान पिकांची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे तसेच जीपीएस कोऑर्डिनेट संकलित करून पिकांच्या परिस्थितीचा अहवाल शासनास सादर करण्यात येणार आहे. पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहित कार्यपद्धतीची पूर्तता केल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात येणार आहे. या संकटकाळात शेतकऱ्यांना पूर्ण पाठबळ देणे हे आमचे प्राधान्य आहे. शासन स्तरावर केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील तालुक्यांचा दुष्काळसदृश यादीत समावेश झाला आहे. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध सवलती व मदत वेळेत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे कृषीमंत्री तथा पालकमंत्री ना.भरणे यांनी सांगितले.

## गरब्याच्या तालावर आता तलवारीची झंकार!

### अकोल्यात प्रथमच महिलांसाठी ‘तलवार गरबा’ प्रशिक्षण

### ‘माता ते जिजामाता’ उपक्रमातून स्त्रीशक्तीचा आविष्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

नवरात्रीच्या उत्सवाला शौर्य, संस्कार आणि स्त्रीशक्तीची अनोखी जोड देत विश्वमांगल्य सभा, अकोला महानगरच्या वतीने शहरात प्रथमच महिलांसाठी ‘तलवार गरबा’ प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘माता ते जिजामाता’ या विशेष उपक्रमांतर्गत २८ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबरदरम्यान हे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.

विशेष प्रशिक्षित प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली महिलांना तलवार गरब्याच्या विविध हालचाली, तालबद्ध सादरीकरण आणि सामूहिक सरावाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणानंतर सहभागी महिलांची एकत्रित प्रॅक्टिस घेण्यात येणार असून, अकोला शहरातील विविध गरबा महोत्सवांमध्ये त्यांना ‘तलवार गरबा’चे लाइव्ह सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. महिलांच्या सोयीसाठी शहरातील गोरक्षण रोड, रामदास पेठ आणि जुने शहर या तीन विभागांत प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात आली आहेत.

विविध वेळांमध्ये प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. १८ वर्षांवरील महिलांना या उपक्रमात सहभागी होता येणार असून, प्रवेश मर्यादित ठेवण्यात आला आहे. एकूण २०० महिलांनाच प्रवेश दिला जाणार आहे. ‘फक्त गरबा नाही... तलवारीतून स्त्रीशक्ती!’ या संकल्पनेतून साकारण्यात येणाऱ्या या उपक्रमातून महिलांमध्ये आत्मविश्वास, शौर्य, संस्कार आणि सामूहिकतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पारंपरिक नवरात्री उत्सवाला शौर्याची जोड देत अकोल्यातील महिलांच्या सहभागातून यंदा ‘तलवार गरबा’चा वेगळाच दिमाख पाहायला मिळणार आहे. विश्वमांगल्य सभा, अकोला महानगरच्या वतीने शहरातील अधिकाधिक महिलांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

#### तीन विभागांत संपर्क व्यवस्था

गोरक्षण रोड : निशा ताई टावरी – ९९६०५ ९४९८८
मनिषा आंबारखाने – ९९२१२ ७६९०४
रामदास पेठ : नीलम ताई लोकरस – ९९६०० ६४२१३
अश्विनी जकाते – ८६९८००८८००
जुने शहर : गिरिजा जहागिरदार – ९८५०१ ९७३२४
संध्याताई देशपांडे – ८४३२० २८७५८

## शेलुबाजार ग्रामपंचायतीचा गलथान कारभार?

### अर्धवट नाली बांधकामामुळे नागरिकांची गैरसोय; अपघाताचा धोका वाढला

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील नावाजलेल्या ग्रामपंचायतींपैकी एक म्हणून ओळख असलेल्या शेलुबाजार ग्रामपंचायत परिसरात अस्वच्छता आणि अर्धवट विकासकामांमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ग्रामपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ५, कारंजा रोड परिसरात एस आर कॉन्व्हेंट जवळील सांडपाण्याच्या नियोजनासाठी काही दिवसांपूर्वी नाली बांधकामासाठी खोदकाम करण्यात आले. मात्र, हे काम अर्धवट अवस्थेत सोडून देण्यात आल्याने रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात माती, दगड, विटांचे तुकडे व बांधकामाचा मलबा पडलेला आहे. यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे.

विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ



नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, खोदलेल्या भागात कोणी पडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाहनचालकांनाही अरुंद झालेल्या रस्त्यावरून वाहने नेताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सांडपाण्याचा योग्य निचरा व्हावा यासाठी सुरू करण्यात आलेल्या कामामुळेच सध्या सांडपाण्याच्या प्रवाहालाही अडथळा निर्माण झाल्याची नागरिकांची तक्रार आहे. परिणामी परिसरात घाण व दुर्गंधी निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे.

**काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी**

ग्रामपंचायतीने अर्धवट सोडलेले नाली बांधकाम तातडीने पूर्ण करून सांडपाण्याचा कायमस्वरूपी निचरा होईल, याचे नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच ज्या ठिकाणी नालीचे बांधकाम करण्यात आले आहे, तेथे दर्जेदार व मजबूत झाकणे बसविण्यात यावीत, जेणेकरून नागरिक, लहान मुले व ज्येष्ठ व्यक्तींच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होणार नाही. अर्धवट विकासकामे आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असताना संबंधित ग्रामपंचायत प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देणार का? असा सवाल परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## गर्भाधारणेपासून २ वर्षांपर्यंतचे ’पहिले १००० दिवस’ बालकाच्या भविष्याचा पाया!



■ प्रतिनिधी | वाशिम ■

बालकाचा सुदृढ शारीरिक व मानसिक विकास साधायचा असेल, तर गर्भाधारणेपासून ते वयाची दोन वर्षे पूर्ण होईपर्यंतचे ‘पहिले १००० दिवस’ अत्यंत निर्णायक असतात. या काळात आई आणि बाळाला मिळणारा संतुलित व पौष्टिक आहार हाच त्यांच्या निरोगी आरोग्याचा खरा पाया ठरतो, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन बाल कल्याण समितीचे सदस्य जांभरूनकर यांनी केले. येथील अंगणवाडी केंद्र क्रमांक ६६ महाकाली परिसर अंतर्गत ९ व्या राष्ट्रीय ‘पोषण माह’चे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी आहारातील विविधता, स्थानिक भाजीपाल्याचे महत्त्व आणि कुपोषणमुक्तीसाठी घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर माहिती दिली.

## कारंज्यात गणपती विसर्जन शोभायात्रा उत्साहात व शांततेत

### - पारंपरिक कला-प्रकारांसह ढोल-ताशांचा गजर
### - डीजेच्या तालावर तरुणाईचा जल्लोष

■ प्रतिनिधी | कारंजा ■

गणेशोत्सवाच्या भक्तिमय वातावरणाला भावपूर्ण निरोप देत अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी कारंजा शहरात गणपती विसर्जनाची भव्य शोभायात्रा उत्साहात, जल्लोषात आणि शांततेत पार पडली. शहरातील विविध गणेश मंडळांनी मोठ्या भक्तिभावाने सहभागी होत बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

गणेश चतुर्थीला विधिवत स्थापना करण्यात आलेल्या गणरायाची गेल्या काही दिवसांपासून मनोभावे आराधना करण्यात येत होती. अनंत चतुर्दशीला विसर्जनाच्या निमित्ताने शहरातील प्रमुख मार्गांवरून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शिवाजीनगर, आंबेडकर चौक, जयस्तंभ चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बजरंग पेठ, महात्मा फुले चौक, रामासावजी चौक, पोहा वेश मार्गे ही विसर्जन मिरवणूक पुढे मार्गस्थ झाली.

शोभायात्रेत लेझीम, मल्लखांब, लाठी-काठी तसेच विविध पारंपरिक वाद्यांचे सादरीकरण



हे विशेष आकर्षण ठरले. पारंपरिक कला-प्रकारांनी मिरवणुकीत रंगत भरली, तर डीजेच्या तालावर तरुणाईने उत्स्फूर्तपणे ठेका धरत आनंदोत्सव साजरा केला. ठिकठिकाणी गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांकडून गुलालाची उधळण करण्यात येत होती.

गणेश मंडळांच्या मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. उत्साहाला शिस्तीची जोड देत सर्व मंडळांनी विसर्जनाची प्रक्रिया पार पाडली. पहाटे सुमारे ४ वाजेपर्यंत शहरातील सर्व गणेश मंडळांचे विसर्जन शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

विसर्जन शोभायात्रेदरम्यान आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगर परिषद तसेच महावितरणचे कर्मचारी उपस्थित होते. शोभायात्रा शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी कारंजा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमर चोरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने तैनात होते. पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे संपूर्ण विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली.

भक्ती, उत्साह, पारंपरिक संस्कृती आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या विसर्जन शोभायात्रेने कारंजा शहरातील गणेशोत्सवाची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३०० ■ रविवार, २७ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# पालक सचिव मिलींद म्हैसकर यांनी केली पिक परिस्थितीची पाहणी

**वर्धा जनमाध्यम :** सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव मिलींद म्हैसकर यांनी आज सेलू तालुक्यातील सेलडोह येथील वैभव सोनटक्के यांच्या शेतातील सोयाबिन पिकाच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत कापूस, तूर व सोयाबिन पिकांची सद्यस्थिती जाणून घेतली.

यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपविभागीय अधिकारी कुश मोटवाणी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अरविंद उपरीकर, कृषि विज्ञान केंद्र सेलसुराचे वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ.जीवन कतोरे, तहसिलदार डॉ.शंकुतला पाराजे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले, तालुका कृषि अधिकारी रविंद्र राऊत आदी उपस्थित होते.

एलनिनोच्या पार्श्वभूमीवर हा पाहणी दौरा होता. यावेळी मिलींद म्हैसकर यांनी शेतकऱ्याशी संवाद साधला. मागीलवर्षीच्या सोयाबिन, कापूस व तूर पिकाच्या वार्षिक उत्पन्नाची माहिती घेतली. गेल्यावर्षी सोयाबिनचे पिक पुर्णपणे नष्ट झाल्याचे शेतकऱ्यानी सांगितले. तसेच गेल्या तीन वर्षांपासून सरासरीपेक्षा फारच कमी उत्पन्न झाले असल्याचे शेतकरी म्हणाले. यावर्षी वेळोवेळी पाऊस आल्यामुळे सोयाबिन पिक बऱ्या प्रमाणात असून सरासरी पेक्षा २५ ते ३० टक्के कमी पिक होण्याची शक्यता आहे, असे शेतकरी म्हणाले. तूर पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव असल्यामुळे तूर पिक सुध्दा कमी होण्याची शक्यता असल्याचे सांगितले.

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी जिल्ह्यात सरासरी ७० टक्के पाऊस झाला असून काही तालुक्यात कमी पाऊस झालेला आहे. मध्यंतरी पावसाचा खंड पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबिन पिकाचे नुकसान झालेले आहे. जिल्ह्यात २५ ते ३० टक्के सरासरी उत्पन्न कमी होण्याचा अंदाज कृषि विभागाने वर्तविला असल्याचे त्यांनी सांगितले.



सद्या कापूस पिक चांगले असले तरी यावर बोंडअळीचा प्रादुर्भाव येण्याची शक्यता असते. यावर उपाययोजना करण्यासाठी अळीनाशक फवारणीसाठी ट्रायकोडर्मा शेतकऱ्यांना मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करावे, अशा सुचना यावेळी देण्यात आल्यात. यावेळी शेतकामासाठी मजूर, येणाऱ्या अडचणी, शेतपिकांचे भाव, बाजारपेठ आदी बाबतही शेतकऱ्यांशी मिलींद म्हैसकर यांनी सविस्तर चर्चा केली.

### पालक सचिव मिलींद म्हैसकर यांची बापूकुटीला भेट

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव मिलींद म्हैसकर यांनी आज सेवाग्राम येथील बापूकुटीला भेट देऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला. १९९९ ते २००३ या कालावधीत जिल्हाधिकारी असतांना मंत्री महोदयांच्या दौऱ्याप्रसंगी बापुकुटीला भेट देण्याचा योग यायचा. त्यावेळी असलेल्या बापुकुटीतील साहित्यासोबतच व्यवस्थापन आजही त्याच स्थितीत आहे. या बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानचे विजय तांबे यांनी आश्रम विषयी माहिती दिली.

# मदतीच्या बहाण्याने तरुणीला जाळ्यात ओढले; निर्जनस्थळी नेऊन सामूहिक अत्याचार

## रेल्वे स्थानक परिसरात नराधमांचा हैदोस; पाच जण अटकेत, तीन दिवसांची पोलिस कोठडी

**वर्धा जनमाध्यम :** रेल्वे स्थानक परिसरात मदतीच्या बहाण्याने १९ वर्षीय तरुणीला ऑटोमध्ये बसवून निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी लोहमार्ग पोलिसांनी पाच जणांना अटक केली असून न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.




नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील बेला बोरगाव येथील तरुणी नातेवाईकांकडे चंद्रपूरला गेली होती. बुधवारी रात्री चंद्रपूरहून रेल्वेने अंदमान एक्स्प्रेसने सेवाग्राम येथे मध्यरात्री दीडच्या सुमारास पोहोचल्यानंतर ऑटोने वर्धा रेल्वे स्थानक गाठले. तिकीट काउंटरजवळ ती उभी असताना एका ऑटोचालकाने मदतीच्या बहाण्याने तिला ऑटोमध्ये बसविले. त्यानंतर साथीदारांना सोबत घेऊन तिला शिवाजी चौक परिसरातील निर्जनस्थळी नेऊन तेथे तिच्यावर सामूहिक अत्याचार केल्याचे पोलिस तपासात समोर आले.

घटनेची माहिती गुरुवारी पहाटे चारच्या सुमारास लोहमार्ग पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम सुरू केली. दुपारी तीनच्या सुमारास पीडिता शहरात आढळून आली. तिची चौकशी केल्यानंतर वडिलांना बोलावण्यात आले. पोलिसांनी संशयावरून दहा जणांना ताब्यात घेतले. त्यापैकी पाच जणांची पीडितेने ओळख पटविली.

विक्रम उर्फ गोलू खंडाळे वय २८ इंदिरानगर आर्वी नाका वर्धा मोहसिन शेख कासम शेख (वय २९ गजानन नगर वर्धा) , शेख साहील शेख शरीफ (वय ३२ महादेवपुरा वर्धा) , रजत सुनील बावणे (वय १८ छत्रपती शिवाजी महाराज चौक गोंड प्लॉट वर्धा) आणि एका अल्पवयीनाचा आरोपींमध्ये समावेश आहे. पोलिसांनी सर्वांविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली. शुक्रवारी आरोपींना घटनास्थळी नेऊन तपास करण्यात आला,

ही कारवाई रेल्वे पोलीस अधीक्षक नागपूर मंगेश शिंदे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराम राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर शेळके तसेच रेल्वे पोलीस ठाणे वर्ध्याचे प्रभारी अधिकारी रेल्वे पोलीस निरीक्षक वीरसेन चहांदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक पंकज ढोके आणि एपीआय पंजाबराव डोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक पुढील तपास करीत आहे.

# बँक संपामुळे वीजबिल भरण्यात अडथळा; २८ सप्टेंबरपूर्वी भरणा करण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** बँक कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान तीन दिवसांचा देशव्यापी संप पुकारला आहे. त्यानंतर २ ऑक्टोबरला गांधी जयंतीची सुटी तसेच ३ ऑक्टोबरला शनिवार असल्याने सलग सुट्ट्यांचा परिणाम बँकिंग व्यवहारांवर होणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी २८ सप्टेंबरपूर्वीच वीजबिलाचा भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.




महावितरणकडून थकीत वीजबिलांच्या वसुलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरू आहे. अशा परिस्थितीत बँक संप आणि त्यानंतरच्या सुट्ट्यांमुळे धनादेशाद्वारे वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना अडचणी येण्याची शक्यता आहे. धनादेशाचे क्लिअरन्स रखडल्यास बिलाची रक्कम वेळेत जमा न झाल्याने थकबाकी निर्माण होऊ शकते. परिणामी वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका आहे.

त्यामुळे ग्राहकांनी २८ सप्टेंबरपूर्वी वीजबिल भरून संभाव्य कारवाई आणि विलंब आकार टाळावा. महावितरणच्या संकेतस्थळावर किंवा मोबाईल ?पद्वारे नेटबँकिंग, डेबिट किंवा क्रेडिट कार्ड, यूपीआय तसेच अन्य डिजिटल माध्यमांतून घरबसल्या बिल भरता येणार आहे. तत्पर भरणा करणाऱ्या ग्राहकांना नियमानुसार सवलतीचाही लाभ घेता येणार आहे.

# आर्वी-तळेगाव महामार्गावर बुलडोझरची टांगती तलवार

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी शहरातून जाणाऱ्या आर्वी-तळेगाव राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४७ ए वरील अतिक्रमणाविरोधात अखेर राष्ट्रीय महामार्ग विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. अतिक्रमणधारकांना सात दिवसांत अनधिकृत कब्जा हटविण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्याने महामार्ग परिसरात खळबळ उडाली आहे.

**अतिक्रमण धारकांना सात दिवसांचा अल्टिमेटम**

राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या नागपूर येथील कार्यकारी अभियंत्यांनी २३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय राजमार्ग नियंत्रण अधिनियम २००२ मधील कलम २६ नुसार या नोटिसा बजावल्या आहेत. महामार्गाच्या भूमीचे संयुक्त निरीक्षण केल्यानंतर अनधिकृत अतिक्रमण आढळून आल्याचे नोटिसीत नमूद करण्यात आले आहे. नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांत अतिक्रमण स्वतःहून हटविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, कारवाईविरोधात संबंधितांना तीन दिवसांत अपील करण्याची संधी देण्यात आली आहे. अपील असल्यास २८ सप्टेंबर रोजी नागपूर येथील राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यालयात सुनावणी होणार आहे. मुदतीत अतिक्रमण न हटविल्यास कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करून महामार्गाच्या जागेतून निष्कासन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा विभागाने दिला आहे. नोटिसांची प्रत आर्वीच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आली आहे.

# दुष्काळ जाहीर, मदत कुठे? शेतकऱ्यांच्या जखमेवर घोषणा नको भरपाई द्या

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार आणि शेतमजुरांना २५ हजारांची तातडीची मदत द्या - अतुल वांदिले

**वर्धा जनमाध्यम :** पावसातील खंड, प्रतिकूल हवामान आणि खरीप पिकांच्या नुकसानीमुळे वर्धा जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असला तरी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या हातात अद्याप थेट आर्थिक मदत आलेली नाही. केवळ सवलतींच्या घोषणा करून शेतकऱ्यांची थट्टा करू नये. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये आणि शेतमजुरांना २५ हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी केली.



दुष्काळग्रस्तांसाठी जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत, परीक्षा शुल्क माफी आणि चारा व पाणीपुरवठ्यासह विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत. मात्र सोयाबीन, कापूस आणि अन्य खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदतीची गरज आहे.

शेतकऱ्यांनी बियाणे, खते, मशागत आणि फवारणीसाठी कर्ज काढून खर्च केला. पीक हातातून गेल्याने हा आर्थिक भार वाढला आहे. त्यामुळे तातडीने पंचनामे पूर्ण करून प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी. शेतीची कामे घटल्याने रोजगार गमावलेल्या शेतमजूर कुटुंबांनाही २५ हजार रुपये द्यावेत, अशी मागणी वांदिले यांनी केली. दुष्काळग्रस्त क्षेत्राची पारदर्शक माहिती जाहीर करून एकही पात्र लाभार्थी मदतीपासून वंचित राहू नये, अशी मागणीही त्यांनी केली.

# दत्ताजींच्या स्वप्नाला अदाणींचे बळ; सावंगी विद्यापीठाची ग्लोबल झेप

## डीएमआयएचईआरचे नामकरण करण्यास यूजीसीची मंजुरी; आरोग्य शिक्षण संशोधनासाठी जागतिक दर्जाचे सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार

**वर्धा जनमाध्यम :** दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च या अभिमत विद्यापीठाच्या नावात आता बदल होणार आहे. विद्यापीठाचे नामकरण अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च असे करण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजुरी दिली आहे. या नामकरणासोबतच सावंगी येथील विद्यापीठाला जागतिक पातळीवर नेण्याचा निर्धार संस्थेने व्यक्त केला आहे. आरोग्य शिक्षण, आधुनिक उपचारपद्धती, संशोधन आणि नवतंत्रज्ञानासाठी जागतिक दर्जाचे सेंटर ऑफ एक्सलन्स उभारण्याची तयारी सुरू झाली आहे.



शनिवारी सावंगी मेघे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे, अदाणी समूहाचे चीफ सर्व्हिसेस ऑफिसर रवींद्र मेहेरे आणि विद्यापीठ सल्लागार डॉ. राजीव बोरले यांनी संस्थेच्या पुढील वाटचालीची माहिती दिली. मेघे आणि अदाणी समूहाच्या परस्पर सामंजस्यातून हा बदल झाल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, नामकरण झाले तरी दत्ता मेघे यांचा वारसा आणि संस्थेची ओळख कायम राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**वैद्यकीय महाविद्यालयापासून बहुविषयक विद्यापीठापर्यंत-** दत्ताजी मेघे यांनी १९९० मध्ये सावंगी येथे जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजच्या माध्यमातून संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर दंतचिकित्सा, नर्सिंग, आयुर्वेद, फिजिओथेरपी, फार्मसी, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत संस्थेचा विस्तार झाला. २४ मे २००५ रोजी संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळाला. २२ मार्च २०२६ रोजी दत्ता मेघे यांचे निधन झाले. त्यांच्या स्वप्नाला पुढे नेत संस्थेचा विस्तार जागतिक स्तरावर करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

**दहा ते पंधरा वैद्यकीय महाविद्यालयांचे लक्ष्य-** भविष्यात विद्यापीठाच्या माध्यमातून दहा ते पंधरा वैद्यकीय महाविद्यालये उभारण्याच्या दिशेने काम केले जाणार असल्याचे डॉ. वाघमारे यांनी सांगितले. सावंगी येथे कर्करोग रुग्णालयाची सुमारे आठ मजली इमारत उभारण्याचे नियोजन आहे. जगभरातील अत्याधुनिक कर्करोग उपचार आणि संशोधन सुविधा येथे उपलब्ध करण्याचा प्रयत्न राहणार आहे. नागपूरच्या वानाडोंगरी येथील वैद्यकीय महाविद्यालयाचे दत्ता मेघे वैद्यकीय महाविद्यालय हे नाव कायम राहणार असून, नव्याने सुरू होणाऱ्या दंत महाविद्यालयालाही दत्ता मेघे यांचे नाव दिले जाणार आहे.

**पाच वर्षे दरवर्षी २०० कोटींचे बळ**

सावंगी आणि नागपूर येथील वैद्यकीय संस्थांना पुढील पाच वर्षे दरवर्षी प्रत्येकी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. म्हणजेच दोन्ही संस्थांना मिळून दरवर्षी २०० कोटी रुपयांचे आर्थिक बळ मिळणार आहे. या निधीतून वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि आरोग्यसेवा अत्याधुनिक करण्यावर भर दिला जाणार आहे. अदाणी समूहाचे रवींद्र मेहेरे यांनी आरोग्य वारी, महा आरोग्य शिबिरे आणि आरोग्य अमृत महोत्सवासह सामाजिक उपक्रमांचा विस्तार करण्याची भूमिका मांडली. ग्रामीण आणि आरोग्यसेवेपासून वंचित घटकांपर्यंत दर्जेदार उपचार पोहोचविण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. विश्वस्त म्हणून सागर मेघे आणि राघव मेघे कायम राहणार असून, दत्ता मेघे यांच्या वारशाला आधुनिक तंत्रज्ञान आणि मोठ्या आर्थिक पाठबळाची जोड देत सावंगी संस्थेची जागतिक झेप निश्चित करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# दुष्काळी वर्ध्याची पाहणी करणार बावनकुळे; आज आढावा बैठक

**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज, २७ सप्टेंबर रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीची पाहणी करून ते प्रशासनाकडून नुकसानीचा आढावा घेणार आहेत. मंत्री बावनकुळे सकाळी ११ वाजता जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी करतील. यावेळी पिकांची स्थिती, पावसातील खंड आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती घेतली जाणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळजन्य परिस्थितीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत जिल्ह्यातील पीक परिस्थिती, नुकसान, पंचनामे तसेच दुष्काळग्रस्त भागासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत प्रशासनाकडून माहिती घेतली जाणार आहे.

वर्धा जिल्ह्यात खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस यासह विविध पिकांवर प्रतिकूल हवामानाचा परिणाम झाला आहे. दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणीनंतर शेतकऱ्यांसाठी कोणत्या उपाययोजना जाहीर होतात याकडेही लक्ष राहणार आहे.

# दुरंतो एक्स्प्रेसवर दगडफेक; एसी डब्याची काच फुटली


## काचेचे तुकडे प्रवाशांच्या अंगावर आणि खाद्यपदार्थांत

### बोरखेडी-बुटीबोरीदरम्यान थरार

**वर्धा जनमाध्यम :** नागपूरहून मुंबईकडे जाणाऱ्या दुरंतो एक्स्प्रेसवर बोरखेडी-बुटीबोरीदरम्यान गुरुवारी रात्री दगडफेक झाल्याची धक्कादायक घटना घडली. अचानक झालेल्या दगडफेकीत वातानुकूलित डब्याच्या खिडकीची काच फुटली. फुटलेल्या काचेचे तुकडे प्रवाशांच्या अंगावर तसेच खाद्यपदार्थांमध्ये पडल्याने डब्यात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेचा थरारक क्षण एका प्रवाशाच्या भ्रमणध्वनीत चित्रित झाला आहे.

२५ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ८ वाजून २७ मिनिटांनी ही घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. एका प्रवाशाकडून भ्रमणध्वनीवर चित्रफीत तयार केली जात असतानाच अचानक दगड वेगाने खिडकीच्या काचेवर आदळला. क्षणार्धात काच फुटली आणि दगड डब्यात येऊन पडला. काचेचे असंख्य तुकडे प्रवाशांच्या चेहऱ्यावर आणि अंगावर उडाले. काही तुकडे प्रवाशांच्या खाद्यपदार्थांमध्येही पडल्याचे चित्रफितीत दिसून येते.

या घटनेत चार मित्र जखमी झाल्याचा दावा संबंधित प्रवाशाने केला आहे. डब्यात लहान मुलांसह अनेक कुटुंबे प्रवास करीत होती. दगड अन्य ठिकाणी आदळला असता परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकली असती, अशी प्रतिक्रिया प्रवाशाने व्यक्त केली.



दुरंतो एक्स्प्रेस रात्री ८ वाजून ५५ मिनिटांनी वर्धा रेल्वे स्थानकावर पोहोचल्यानंतर प्रवाशांनी खाली उतरून रेल्वे पोलिसांना घटनेची माहिती दिली. चौकशी आणि आवश्यक प्रक्रियेनंतर एक्स्प्रेस सुमारे अर्धा तास वर्धा स्थानकावर थांबवण्यात आली. त्यानंतर ती पुढील प्रवासासाठी रवाना झाली.

घटनेची चित्रफीत समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रेल्वे प्रशासनाने दगडफेकीची गंभीर दखल घेऊन घटनेमागील व्यक्तींचा शोध घ्यावा आणि रेल्वे मार्गालगत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.


## जाहिर नोटिस

माझे पक्षकार श्री. गजानन राजाभाऊ पेढेकर हे मौजा – म्हसाळा, ता. व जि. वर्धा, मौजा क्र. ११०,पी.एच. क्र. २२ फील्ड सर्व्हे क्र. ५२/२ प्लॉट क्र. ४२, यामधील उत्तर बाजूचा भाग, क्षेत्रफळ ७७.७५ चौ.मी., ग्रामपंचायत म्हसाळा हद्दीत येणाऱ्या मिळकतीचे मालक व कब्जेदार असून, सदर मिळकतीवर घराचे बांधकाम केलेले आहे.सदर मिळकतीच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : ९ मीटर रुंदीचा लेआउट रस्ता,पश्चिमेस : फील्ड सर्व्हे क्र. ५३ उत्तरेस : भूखंड क्र. ४३ दक्षिणेस : भूखंड क्र. ४२ चा उर्वरित भाग सदर प्लॉट क्र. ४२ मधील उत्तर बाजूचा भाग, क्षेत्रफळ ७७.७५ चौ.मी., हा श्रीमती रिटा राहुल बावणे यांनी माझे पक्षकार श्री. गजानन राजाभाऊ पेढेकर यांना दिनांक १९/१०/२०१५ रोजीच्या नोंदणीकृत विक्रीखताद्वारे विकला असून, सदर विक्रीखत दस्त क्र. ५२३४/२०१५, दुय्यम निबंधक, वर्धा यांचे कार्यालय येथे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे.सदर मिळकतीशी संबंधित पूर्वीचे दिनांक ३०/०४/२०१४ रोजीचे नोंदणीकृत लिंक विक्रीखत, दस्त क्र. २४३/२०१४याची मूळ प्रत माझे पक्षकारांकडून हरविलेली/गहाळ झालेली असून, सर्वतोपरी शोध घेऊनही सदर मूळ दस्तऐवज मिळून आलेला नाही.

माझे पक्षकार यांनी सदर मिळकतीच्या अनुषंगाने इंडिया शेल्टर यांचेकडे कर्जासाठी अर्ज केलेला असून, सदर कर्ज व्यवहारासाठी सदर मिळकत तारण ठेवण्याच्या अनुषंगाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर मिळकतीबाबत अथवा वरील नमूद व्यवहारांबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी, हरकत, बोजा, धारणाधिकार, गहाण, तारण, अडसर, भार किंवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क अथवा हितसंबंध असल्यास, तसेच दिनांक ३०/०४/२०१४ रोजीचे दस्त क्र. २४३/२०१४ चे मूळ विक्रीखत किंवा इतर संबंधित मूळ दस्तऐवज कोणास सापडले असल्यास अथवा कोणाच्या ताब्यात असल्यास, अशा व्यक्तीने आपला दावा/हरकत त्यासंबंधीच्या कागदपत्रांसह सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३ (तीन) दिवसांच्या आत खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात सादर करावी.

**ॲड. आर.आर.तिवारी, वर्धा**
**मो. ९९२२४२६१६८**

## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार नामदेव महादेव राउत यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणेः मौजा रिमडोह, मौजा नं. १४८, ता. हिंगणघाट जि. वर्धा ग्राम पंचायत आजंती च्या हद्दीतील शेत सर्वे कं. ४८/१ विठोबा नगरी-२ मधील प्लॉट कं. १५ व प्लॉट कं. ४८/१/१५ (सातबारा प्रमाणे) ज्याची एकूण आराजी १०१६.८२ चौ. फुट म्हणजेच ९४.५० चौ. मी. (विक्रीपत्राप्रमाणे) असुन त्याची चतुःर्सिमा :-

पुर्वेसः ९ मीटर रूंदीचा ले आउट रोड
पश्चिमेसः शेत सर्व्हे नं. ४८/२ सॅक्शन ले आउट,
उत्तरेसः प्लॉट नं. १४
दक्षिणेसः प्लॉट नं. १६

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २७,९५,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# गणेशोत्सवानंतर जुहू समुद्र किना-यावरून ३४ टन कचरा संकलित

## स्वच्छता मोहिमेत अमृता फडणवीस, अजय देवगण यांचा सहभाग



**मुंबई/प्रतिनिधी :**गणेशोत्सवानंतर मुंबईच्या समुद्रकिना-यांची स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी जुहू समुद्रकिना-यावर शनिवारी पहाटे सी, शोर, शाईन-२०२६ या विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या स्वच्छता मोहिमेत दिव्याज फाउंडेशनच्या संस्थापिका, तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस, अभिनेता अजय देवगण, शालेय विद्यार्थी, विविध संस्थांचे स्वयंसेवक आदी सहभागी झाले होते. तसेच, समुद्रकिना-यांच्या स्वच्छतेतून सुमारे ३४ टन कचरा संकलित करण्यात आला.दिव्याज फाउंडेशन, महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि मेघा श्रेय यांच्या संयुक्त विद्यमाने सी, शोर, शाईन-२०२६ ही स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती. महानगरपालिका आणि डा. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जुहू समुद्रकिना-यावरून गणेश विसर्जनानंतर संकलित करण्यात आलेल्या निर्माल्यातील फुले स्वतंत्र करून त्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. या प्रक्रियेतून अगरबत्ती तसेच अन्य उपयुक्त उत्पादने तयार करण्यात येणार आहेत.

उत्सवानंतर शहर स्वच्छ ठेवण्याची सामूहिक जबाबदारी अत्यंत महत्त्वाची असते. समुद्रकिना-यांची स्वच्छता राखण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून अविरतपणे प्रयत्न केले जातात. या प्रयत्नांना पाठबळ देण्यासाठी आणि स्वच्छता राखण्यासाठी, तसेच आपली मुंबई स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यायला हवे, असे आवाहन दिव्याज फाउंडेशनच्या संस्थापिका अमृता फडणवीस यांनी केले. जसे आपले आपल्या घरावर प्रेम असते आणि आपण ते स्वच्छ ठेवतो, त्याचप्रमाणे आपण ज्या शहरात राहतो ते शहर आणि आपला देश स्वच्छ व सुंदर ठेवणे हीदेखील आपली जबाबदारी आहे, असे अभिनेता अजय देवगण म्हणाले.मध्य रेल्वेवर रविवारी मेगाब्लाक

महानगरपालिकेने केलेल्या विविध प्रयत्नांमुळे यंदा मोठ्या संख्येने गणेशमूर्तींचे समुद्रात विसर्जन न करता कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करण्यात आले. आगामी काळात प्रक्रिया केलेले पाणीच समुद्रात सोडण्याच्या दिशेने प्रयत्न होत असून, यामुळे समुद्र अधिक स्वच्छ आणि सुंदर राहण्यास मदत होईल, असे आमदार अमित साटम यांनी नमूद केले. राज्याचे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिव्याज फाउंडेशनच्या सामाजिक व स्वच्छता विषयक उपक्रमांचे कौतुक केले.समुद्र ही मुंबईची मोठी संपत्ती आहे. आपण कचरा किंवा प्लास्टिक फेकल्यास समुद्र आणि समुद्रकिनारे अस्वच्छ होतात. उत्सवानंतरही स्वच्छतेची भावना कायम ठेवत नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा न करण्याचे तसेच समुद्रकिनारे स्वच्छ राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचो आवाहन महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी केले. त्यावेळी आमदार राम कदम, स्थानिक नगरसेविका सीमा सिंग, सह आयुक्त डा. भाग्यश्री कापसे, सहायक आयुक्त (के पश्चिम विभाग) चक्रपाणी अल्ले आदी उपस्थित होते.

# SIR मधून नाव वगळल्यास अधिकारी घरोघरी जाउन कागदपत्रे गोळा करतील

- वादानंतर निवडणूक आयोगाचा निर्णय;
- आतापर्यंत 13.37 कोटी नावे वगळली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** एसआयआर संदर्भातील वादाच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, ज्यांची नावे वगळण्यात आली आहेत, ते आपली नावे समाविष्ट करण्यासाठी अर्ज करू शकतात. अधिकारी घरोघरी जाउन त्यांची कागदपत्रे गोळा करतील आणि ती निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर अपलोड करतील. प्रादेशिक निवडणूक अधिकारी यावर निर्धारित वेळेत निर्णय घेतील. हा निर्णय शनिवारी दिल्लीतील निर्वचन भवन येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि दोन्ही निवडणूक आयुक्त, डा. सुखबीर सिंग संधू व डा. विवेक जोशी उपस्थित होते.आतापर्यंत, एसआयआर दरम्यान ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मसुदा मतदार याद्यांमधून १३३.७ दशलक्ष नावे वगळण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाच्या मते, देशात ९७९.८ दशलक्षपेक्षा जास्त मतदार आहेत, जे एसआयआरमध्ये वगळण्यात आलेल्या मतदारांच्या अंदाजे १४% आहेत.



दिल्ली-महाराष्ट्रात ३० ऑक्टोबरपर्यंत दावा-हरकत दाखल करता येणार

बैठकीत निर्णय घेण्यात आला की, दिल्ली आणि महाराष्ट्रात दावा व हरकत दाखल करण्याची तारीख ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. दिल्लीतील वादांचा निपटारा ३० नोव्हेंबरपर्यंत, तर महाराष्ट्रातील वादांचा निपटारा १० नोव्हेंबरपर्यंत करावा लागेल.गोव्यात ज्या मतदारांची नावे वगळली गेली आहेत, तिथे ब्लॉक अधिकारी घरोघरी जाउन फार्म-६ जमा करतील. SIRमध्ये तुमचे नाव यादीत नसेल किंवा वगळले गेले असेल, तर फार्म-६ द्वारे नाव समाविष्ट करण्याचा दावा करता येतो. आयोगाने सांगितले की, फार्म-६ वर कोणतीही हरकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने फार्म-६ कायम ठेवला आहे.

# दहा दिवसांत 29 लाख 77 हजार 670 भाविकांची केली आरोग्य तपासणी




**मुंबई/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रम राबविण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमातून राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये ५३ हजार ८६२ आरोग्य शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये दहा दिवसांत सुमारे २९ लाख ७७ हजार ६७० भाविकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रु ग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने सार्वजनिक आरोग्य विभाग, शासकीय व निमशासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्थांची आरोग्य यंत्रणा, सार्वजनिक गणेश मंडळे आणि सामाजिक संस्थांचे सहकार्य आणि लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांपासून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच ग्रामीण भागात आरोग्य शिबिरे घेण्यात आली. त्यामुळे भाविकांना घराजवळच प्राथमिक आरोग्य तपासणीची सुविधा मिळाली.भाविकांना आरोग्य तपासणीसाठी दूर जावे लागू नये आणि आजारांचे वेळेत निदान व्हावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शिबिरांमध्ये हृदयरोग, किडनीविकार, कर्करोग, मधुमेह, संसर्गजन्य आजार, मेंदूचे गंभीर आजार, बालरोग यांसह विविध आजारांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. आरोग्यविषयक समस्या आढळलेल्या भाविकांना पुढील तपासणी व उपचारासाठी तज्ज्ञ डाक्टर तसेच संबंधित रु ग्णालयांकडे पाठविण्यात आले.शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रु ग्णालये, शहरी आरोग्य यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्थांची आरोग्य यंत्रणा तसेच धर्मादाय रु ग्णालयांतील डॉक्टर व आरोग्य कर्मचा-यांचे सहकार्य या उपक्रमाला मिळाले. पुढील उपचारांची गरज असलेल्या पात्र रु ग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच इतर संबंधित शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**विभागनिहाय आकडेवारी-**विदर्भात ९ हजार ८३४ शिबिरांमध्ये ५ लाख ९४ हजार ६३६ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मराठवाड्यात ७ हजार ६३१ शिबिरांमध्ये ४ लाख ५६ हजार ८६३, ठाणे-पालघर भागात ६ हजार १७ शिबिरांमध्ये ३ लाख १७०, कोकणात ३ हजार २४९ शिबिरांमध्ये १ लाख ३७ हजार १४८, उत्तर महाराष्ट्रात ५ हजार ८३८ शिबिरांमध्ये २ लाख ८८ हजार ९४०, तर पश्चिम महाराष्ट्रात १२ हजार ४२४ शिबिरांमध्ये ७ लाख ६६ हजार ७६२ भाविकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर, पुढील उपचारासाठी पाठविण्यात आलेले संदर्भित रु ग्ण ५ हजार ९९३ आहेत.

**सलग दुस-या वर्षी श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद-**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रमाला यंदा दुस-या वर्षी राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गणेशोत्सवाच्या काळात भाविकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा देण्यात आली. ३६ जिल्ह्यांमध्ये ५३ हजारांहून अधिक शिबिरांत सुमारे २९ लाखांपेक्षा अधिक नागरिकांची तपासणी झाली. आरोग्यविषयक समस्या आढळलेल्या नागरिकांना पुढील तपासणी व उपचारासाठी योग्य ठिकाणी पाठविण्यात आले. विविध यंत्रणा, गणेश मंडळे, सामाजिक संस्था आणि आरोग्य कर्मचा-यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविता आला, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रु ग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली.

# भाजपाला गंभीर परिणाम भोगावे लागतील

## कुणाल घोष यांच्यावरील हल्ल्यानंतर ममता बॅनर्जी संतापल्या

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगालच्या हुगळी जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे ममता बॅनर्जी यांच्या रॅलीसाठी चाललेले तृणमूल काँग्रेसचे आमदार कुणाल घोष यांच्या कारवर हल्ला करण्यात आला. त्यांच्या गाडीची तोडफोड करण्यात आली असून दगड आणि अंडी फेकण्यात आली. ममता बॅनर्जी यांच्या रॅलीला उपस्थित राहता येउ नये, म्हणूनच हे सर्व करण्यात आल्याचा आरोप कुणाल घोष यांनी केला आहे. या सर्व प्रकाराने आपल्याला रोखता येणार नाही, असा इशारा आमदार कुणाल घोष यांनी दिला.माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कुणाल घोष यांच्यावरील हल्ल्यावरून पश्चिम बंगाल सरकारवर जोरदार टीका केली. तसेच याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला आहे. पश्चिम बंगालमध्ये जे काही घडत आहे ते अत्यंत दुर्दैवी असल्याचं ममता बॅनर्जी म्हणाल्या. ते लोकांना बाहेर पडू देत नाहीत. ते आम्हाला आमच्या घरातून बाहेर पडण्यापासून रोखत आहेत. मी यापूर्वी असा प्रकार कधीही पाहिला नाही असं म्हणत टीका केली. 'भाजपाचे कार्यकर्ते आणि गुंडांनी रस्ते अडवले आहेत. पोलीस कुठेही दिसत नाहीत. हे सर्व पोलीस प्रशासनाच्या पाठींब्याने सुरू आहे. भाजपाच्या गुंडांनी हे सर्व केलं असून लोकशाहीत हे अजिबात मान्य नाही. आमचे आमदार आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्याच्या घराचीही तोडफोड करण्यात आली आहे. कुणाल घोष यांच्या गाडीचं नुकसान करण्यात आलं असून त्यांच्यावर हल्ला झाला आहे. जीटी रोडपासून ते उत्तरपाडापर्यंत लोकांना येण्या-जाण्यापासून रोखले जात आहे' असं ममता म्हणाल्या.



# भारताला एका दिवसात कबड्डीत दोन गोल्ड

## एशियन गेम्समध्ये महिला व पुरु ष संघ चॅम्पियन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताने आज आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपले दुसरे सुवर्णपदक जिंकले. पुरु ष कबड्डी संघाने



अंतिम सामन्यात इराणला ४०-३४ ने पराभूत करून आशियाई क्रीडा स्पर्धेत १०व्यांदा पदक पटकावले. यापूर्वी, महिला कबड्डी संघानेही इराणला ३७-३४ ने पराभूत करून सुवर्णपदक जिंकले होते. सातव्या दिवशी भारताने आतापर्यंत दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य पदकासह एकूण पाच पदके जिंकली आहेत. शनिवारी, स्क्वाशमध्ये दोन भारतीय खेळाडू प्रथमच अंतिम फेरीत पोहोचले. १८ वर्षीय अनाहत सिंगने महिला एकेरीच्या अंतिम फेरीत, तर अभय सिंगने पुरु ष एकेरीच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले. भारताने आतापर्यंत चार सुवर्ण, ११ रौप्य आणि १३ कांस्य पदकांसह एकूण २८ पदके जिंकली आहेत.लांब पल्ल्याचा धावपटू सावन बरवाल याने पुरु ष मॅरेथानमध्ये २ तास, ११ मिनिटे आणि ३७ सेकंदांची वेळ नोंदवत रौप्य पदक जिंकले. भारताने या प्रकारात ४४ वर्षांनंतर पदक जिंकले आहे; यापूर्वी भारताने १९८२ मध्ये दिल्ली येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्य पदक जिंकले होते.

**शूटिंगमध्ये भारताचे ११ वे पदक, रौप्य मिळाले** महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री-पोझिशन्स प्रकारात भारतीय संघ दुस-या स्थानावर राहिला. या संघात आशी चौकसे, तिलोत्तमा सेन आणि विदर्शा विनोद यांचा समावेश होता. शूटिंगमधील भारताचे हे ११ वे पदक आहे; याआधी देशाने एक सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कांस्य पदके जिंकली होती.

# ट्रिगर-1चे कागदी घोडे नको,

## रबीसाठी तातडीने रोख मदत द्या !

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्य सरकारने महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांमध्ये (सुमारे ७५ टक्के भागात)ट्रिगर-१ अंतर्गत कोरडा दुष्काळ जाहीर केला असला, तरी या केवळ कागदी घोषणांनी शेतक-यांचे अश्रू पुसले जाणार नाहीत, अशी रोखठोक प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. शासनाच्या निर्णयाचे विश्लेषण करताना राजू शेट्टी म्हणाले, पावसाने पाठ फिरवल्यापासूनच आम्ही राज्यात अधिकृत दुष्काळी ट्रिगर लागू करण्याची मागणी करत होतो. आता सरकारने २६५ तालुक्यांत केवळ ट्रिगर-१ लागू केला आहे. ट्रिगर-१चा अर्थ सलग २१ दिवस पावसाचा खंड पडल्यामुळे एकूण पावसाची तूट तपासून प्रत्यक्ष शेतीचा सर्वे करणे असा होतो. मात्र हा सर्वे प्रशासनाने लालफितीच्या कारभारात न अडकवता अत्यंत जलद गतीने केला पाहिजे आणि अहवाल येताच त्याची तात्काळ अंमलबजावणी झाली पाहिजे.

**रबी हंगाम वाचवण्यासाठी हीच ती सुवर्णसंधी-** हवामानाचा अंदाज आणि आगामी रब्बी हंगामाविषयी बोलताना त्यांनी महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित केला. सध्या बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असून, येत्या आठवडाभरात राज्यात अनेक ठिकाणी पावसाची दाट शक्यता वर्तवली जात आहे. हा परतीचा पाउस



शेतक-यांसाठी रब्बी पिकांच्या दृष्टीने अत्यंत संजीवनी ठरू शकतो.

**शेतातून करपलेले पीक काढण्यासाठी पैसा हवा-** परंतु रब्बीची पेरणी करायची असेल तर आधी शेतात उभे असलेले करपलेले खरीप पीक उपटून बाहेर काढावे लागेल, जमीन नांगरून तयार करावी लागेल. या मशागतीसाठी आज शेतक-याच्या खिशात दमडी शिल्लक नाही. त्यामुळे सरकारने तातडीने शेतक-यांच्या खात्यात रोख मदत वर्ग केली पाहिजे.केवळ दुष्काळ घोषित करून चालणार नाही, तर आगामी रब्बी हंगामासाठी शेतक-यांना मोफत किंवा अनुदानावर दर्जेदार बियाणे आणि खते पुढील चार ते आठ दिवसांत उपलब्ध करून दिली पाहिजेत, तरच या पावसाचा बळीराजाला फायदा होईल. शासनाच्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर शंका उपस्थित करताना राजू शेट्टी म्हणाले, शासनाने निर्णय जाहीर केले तरी ते जमिनीवर कसे उतरतात, याबद्दल माझ्या मनात मोठी साशंकता आहे. मागच्या वर्षी अतिवृष्टीनंतर स्वतः मुख्यमंत्री आले, ३१ हजार कोटींचे पॅकेज जाहीर झाले; पण सामान्य शेतक-याच्या हाती काहीच मिळाले नाही. तसा खेळ यंदा होउ नये एवढीच प्रार्थना. शासनाने केवळ कर्जाचे पुनर्गठन किंवा वसुलीला स्थगिती देण्याचा दिखावा करू नये. ज्या शेतक-यांचे खरीप पीक १०० टक्के वाया गेले आहे, त्यांनी त्या पिकासाठी घेतलेले संपूर्ण बँक कर्ज शासनाने थेट माफ करून संपवून टाकले पाहिजे, तरच बळीराजाला खरा आणि कायमस्वरूपी दिलासा मिळेल. शासनाने आता कागदी नियम आणि अटींच्या जंजाळात वेळ न दवडता युद्धपातळीवर यंत्रणा राबवून शेतक-यांच्या थेट बँक खात्यात भरपाई जमा करावी, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे.

# प्रसुतीनंतर महिलेचा मृत्यू

## डॉक्टरांच्या हलगर्जीपणाच्या आरोपावरून रुग्णालयात नातेवाइकांची तोडफोड

**अकोला :** शहरातील रणपिसे नगर परिसरातील एका रु ग्णालयात प्रसुती झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर संबंधित रु ग्णाचे कागदपत्रे देण्यासही टाळाटाळ केली. त्यामुळे संतापाचा उद्रेक होउन नातेवाईकांनी रु ग्णालयाची तोडफोड केली. संबंधित डाक्टरांच्या कथित हलगर्जीपणामुळे महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या घटनेनंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.रणपिसे नगर परिसरातील यज्ञा रु ग्णालयात एका महिलेला प्रसुतीसाठी दाखल केले होते. काल महिलेची प्रसूती झाली. महिलेने बाळाला जन्म दिला. मात्र, प्रसुतीनंतर महिलेला मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्याचे सांगण्यात आले. प्रकृती गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी मल्टिस्पेशालिटी रु ग्णालयात हलविण्यात आले. त्याठिकाणी उपचार सुरू असतानाच महिलेचा मृत्यू झाला.प्रसुतीनंतर महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी संतप्त झालेल्या नातेवाईकांनी उपचारासंदर्भातील कागदपत्रांची मागणी संबंधित डाक्टरांकडे केली. मात्र, डाक्टरांकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत आणि कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. त्यामुळे संतप्त झालेल्या नातेवाईकांनी रु ग्णालयाची तोडफोड केली. रु ग्णालयावर दगडफेकही केली. या घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. परिस्थिती नियंत्रण आणली. वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी घटनास्थळ गाठून नातेवाईकांची समजूत काढली.



# ज्ञानेश कुमार यांना हटवण्यासाठी 'INDIA' आघाडीकडून महाभियोगाची तयारी! 30 सप्टेंबरला दिल्लीत महत्त्वाची बैठक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात महाभियोगाचा प्रस्ताव आणण्यासाठी विरोधी पक्षांची इंडिया आघाडी आक्रमक झाली आहे. यासंदर्भात पुढील रणनीती आखण्यासाठी आघाडीने ३० सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील क?न्स्टिट्युशन क्लब येथे महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीत मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील प्रस्तावावर खासदारांच्या स्वाक्ष-या गोळा केल्या जाण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त ?क़्च्ज या वृत्तसंस्थेने दिले आहे.

**निवडणूक आयोगातील अंतर्गत मतभेदांमुळे खळबळ**

द इंडियन एक्सप्रेसने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून निवडणूक आयोगात अंतर्गत तीव्र मतभेद समोर आले आहेत. उर्वरित दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी १० महिन्यांत तब्बल १४ वेळा या प्रक्रियेतील विविध मुद्द्यांवर आपले आक्षेप नोंदवले होते. या खुलाशांनंतर विरोधकांनी निवडणूक आयुक्तांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. विरोधी पक्षांनी ज्ञानेश कुमार यांच्या तात्काळ राजीनाम्याची आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी लावून धरली आहे.

तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि माकपचे सरचिटणीस एम. ए. बेबी यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. या चर्चेदरम्यान निवडणूक आयोगाच्या मुद्द्यावर रणनीती ठरवण्यासाठी तात्काळ बैठक घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला, ज्यावर सर्व नेत्यांचे एकमत होउन ३० सप्टेंबर ही




तारीख निश्चित करण्यात आली. या घडामोडींमुळे पश्चिम बंगालमध्ये एकमेकांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी असलेले तृणमूल काँग्रेस आणि माकप राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा एकाच मंचावर आले आहेत.

**बैठकीची प्रमुख ३ उद्दिष्टे**

३० सप्टेंबरच्या या बैठकीत प्रामुख्याने तीन महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहेः संसदेत पदच्युतीचा प्रस्तावः मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात संसदेत प्रस्ताव आणणे आणि त्यासाठी खासदारांच्या स्वाक्ष-यांची मोहीम राबवणे. राजीनाम्याची मागणी व चौकशीः ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याचा दबाव वाढवणे आणि निवडणूक आयोगाच्या वादग्रस्त निर्णयांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी लावून धरणे. देशव्यापी आंदोलनाची रूपरेषाः आगामी विधानसभा निवडणुका असलेल्या राज्यांमध्ये (उत्तर प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंड) व्यापक आंदोलनाची रणनीती आखणे.

**दिग्गजांची उपस्थिती-** या बैठकीला काँग्रेस नेते राहुल गांधी, सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, अभिषेक बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह आघाडीतील प्रमुख घटक पक्षांचे नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर डीएमकेने (क़्ग़्) आघाडीपासून काहीसे अंतर ठेवले आहे. काँग्रेसने तमिळनाडूत विजय यांच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा दिल्याने डीएमके या बैठकीला उपस्थित राहणार की नाही, याबद्दल अद्याप स्पष्टता नाही.भाकप (माले) लिबरेशनचे नेते दीपंकर भट्टाचार्य यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ही बैठक केवळ इंडिया आघाडीपुरती मर्यादित न ठेवता सर्व विरोधी पक्ष, नागरी समाजाचे घटक, विचारवंत आणि आम जनतेला यात सहभागी करून घेतले पाहिजे. आपल्या लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थेसमोर यापूर्वी कधीही एवढे मोठे संकट आले नव्हते. तसेच डाव्या पक्षांनी २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान या मुद्द्यावर देशव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांनीही शुक्रवारी विविध राज्यांत निदर्शने केली.

**भाजपाची टीकाः** सत्ताधारी भाजपाने विरोधकांचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. पराभवाच्या भीतीतून लक्ष विचलित करण्यासाठी विरोधक अशी आंदोलने करत असल्याचा पलटवार भाजपने केला आहे.

**निवडणूक आयोगाची बाजूः** निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, संस्थात्मक चर्चेदरम्यान वेगवेगळी मते असणे ही एक सामान्य प्रक्रिया आहे. आयोगाचे सर्व निर्णय आणि आदेश वैधानिक प्रक्रियेनुसार व तिन्ही आयुक्तांच्या सर्वसंमतीनेच घेण्यात आले आहेत.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## निवडणूक संशय

**नि**वडणूक आयोगाच्या चार भिंतीआड दडलेली गुपिते आणि अंतर्गत मतभेद आता देशाच्या लोकशाहीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहेत. मतदार यादी, SIR, Form-६ आणि डिजिटल मतदार व्यवस्थापनासारख्या निवडणुकीच्या मूलभूत प्रक्रियांवर आयोगातीलच दोन निवडणूक आयुक्तांनी वारंवार लेखी आक्षेप नोंदवणे आणि काही निर्णय आपल्या माहितीशिवाय किंवा सहमतीशिवाय घेतल्याचे नमूद करणे, ही केवळ प्रशासकीय विसंगती म्हणून दुर्लक्षित करता येणारी बाब नाही. राहुल गांधी यांनी सातत्याने उपस्थित केलेल्या 'वोटचोरी' च्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हे आक्षेप समोर आल्याने या आरोपांची स्वतंत्र आणि सखोल चौकशी करण्याची गरज अधिक तीव्र झाली आहे. कारण प्रश्न आता केवळ मतदारांची नावे वगळली किंवा जोडली गेली का, एवढाच उरलेला नाही; प्रश्न असा आहे की, भारताच्या निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचे निर्णय नेमके कोण घेत होते, कोणाच्या संमतीने घेत होते आणि त्या निर्णयांची घटनात्मक जबाबदारी नेमकी कोणाची होती ? निकाल फिक्स होत आहेत का? या प्रश्नांची वस्तुनिष्ठ, पारदर्शक आणि सार्वजनिक उत्तरे मिळणे ही केवळ प्रशासकीय गरज नाही, तर भारतीय लोकशाहीवरील जनतेचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठीची घटनात्मक आवश्यकता आहे.टी. एन. शेषन यांच्या काळात मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या अधिकारांबाबत निर्माण झालेल्या वादावर T. N. Seshan v. Union of India या ऐतिहासिक निकालात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, निवडणूक आयोग ही बहुसदस्यीय संस्था असून निवडणूक आयुक्तांना निर्णयप्रक्रियेत आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांचे मत अंतिम मानून इतर आयुक्तांना निष्प्रभकिंवा केवळ शोभेचे बाहुले बनवणे संविधानाशी सुसंगत नाही. या तत्त्वाचे वर्णन CEC ne 'First Among Equals' म्हणजे 'समानांमधील प्रथम', असे करण्यात आले. मुख्य निवडणूक आयुक्त हे आयोगाचे अध्यक्ष असले तरी ते इतर आयुक्तांपेक्षा घटनात्मकदृष्ट्या सर्वशक्तिमान नाहीत. बहुसदस्यीय संस्थेचा अर्थच असा की निर्णयप्रक्रियेत मतभेदांना स्थान असेल आणि सामूहिक निर्णयाला महत्त्व असेल. पहिल्यांदा मतदार म्हणून नोंदणी करणाऱ्या नागरिकांसाठीच्या form-६ या अर्जात नवीन मतदाराला त्याचे स्वतःचे, आई-वडिलांचे किंवा आजी-आजोबांचे नाव मागील SIR च्या मतदार यादीत होते की नाही, हे सांगावे लागते. हा कॉलम औपचारिकरीत्या अनिवार्य नसला तरी त्याचे उत्तर दिल्याशिवाय ऑनलाइन अर्ज पुढे जात नाही. संधू आणि जोशी यांनी या बदलावर आक्षेप घेतला. Form-६ हा वैधानिक स्वरूपाचा अर्ज असल्याने त्यात बदल करण्यासाठी Registration of Electors Rules, १९६० मध्ये सुधारणा करणे गरजेचे असून त्याचा अधिकार सरकारला आहे आयोगाला नाही. Representation of the People Act आणि संबंधित नियमांनुसार मतदार यादी तयार करण्याची आणि त्यातील नोंदींबाबत निर्णय घेण्याची जबाबदारी मतदार नोंदणी अधिकारी म्हणजे ERO यांच्यावर आहे. तो स्थानिक पातळीवरील वैधानिक अधिकारी असतो. संपूर्ण मतदार यादीवर एका व्यक्तीचे किंवा केंद्रीय यंत्रणेचे नियंत्रण राहू नये म्हणून ही रचना जाणीवपूर्वक विकेंद्रित ठेवलेली आहे. परंतु ECINet च्या माध्यमातून मतदार यादी व्यवस्थापनातील डिजिटल प्रवेशाचे नियंत्रण दिल्लीतील केंद्रीय पातळीवर वाढत असल्याबाबत संधू आणि जोशी यांनी आक्षेप घेत कॅबिनेट सचिवांकडे याबाबत पत्रव्यवहार केला आहे. निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार, २७.१६ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली होती आणि त्यापैकी २२ लाखांहून अधिकांनी अपील केले. एकूण ३८.३१ लाख अपिले दाखल झाली; त्यापैकी १६.१० लाख अपिले निवडणूक आयोगाने केली. हा निर्णय कोणी घेतला? आम्हाला तर त्याची माहिती नाही असा आक्षेप संधू आणि जोशी यांनी नोंदवल्याने SIR वर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मार्च २०२३ मध्ये Anoop Baranwal v. Union of India प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त यांच्या नियुक्तीसाठी पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेली समिती निश्चित केली होती. पण केंद्र सरकारने Chief Election Commissioner and Other Election Commissioners Act, २०२३ आणून सरन्यायाधीशांच्या जागी पंतप्रधानांनी नामनिर्देशित केलेल्या केंद्रीय मंत्र्याचा समावेश केला. परिणामी नियुक्ती समितीत सरकारचे दोन प्रतिनिधी आणि विरोधी पक्षनेता असा असमतोल तयार झाला. गैरप्रकाराला मुभा देण्यासाठीच संरक्षण निवडणूक आयुक्तांना अधिकृत कर्तव्यांशी संबंधित नागरी व फौजदारी कारवाईपासून संरक्षण देणारे कलम २०२३ च्या कायद्यात शेवटच्या टप्प्यात, १२ डिसेंबर २०२३ रोजी दुरुस्तीद्वारे समाविष्ट करण्यात आले. या बिलाच्या मंजुरीवेळी लोकसभेतील १०० खासदारांना निलंबित केले होते.ऑगस्ट २०२३ मध्ये तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्याविरोधात तेलंगणातील एका प्रकरणात गुन्हा नोंदवण्याचे निर्देश देण्यात आले होते; त्यामुळेच ही सुधारणा करण्यात आली का ?भारतासारख्या विशाल लोकशाहीत निवडणूक आयोगावरचा विश्वास हा निवडणुकीच्या निकालापेक्षा मोठा विषय आहे. सरकारे येतात-जातात, पक्ष सत्तेत येतात आणि जातात; परंतु निवडणूक आयोगाची संस्थात्मक विश्वासार्हता दीर्घकाळ टिकली पाहिजे. पण देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या एककल्ली एककेंद्री वागण्यामुळे निवडणूक आयोग निर्णय घेणारी सामूहिक घटनात्मक संस्था राहणार आहे की निर्णयांचे केंद्रीकरण होणारी प्रशासकीय यंत्रणा ? हा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रश्नाचे उत्तर एखाद्या पक्षाने, नेत्याने किंवा निवडणूक आयुक्ताने देणे पुरेसे नाही. त्याचे उत्तर संविधान, कायदा, पारदर्शक प्रक्रिया आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाद्वारे दिले पाहिजे. दोन निवडणूक आयुक्तांचे १४ लेखी आक्षेप, Form-६ मधील बदल, EROच्या डिजिटल प्रवेशाबाबतचे निर्णय, पश्चिम बंगालमधील SIR आणि महाराष्ट्रातील ४७ लाख वाढीव मतदार, या सर्व प्रश्नांची उत्तरे आता केवळ निवेदनांतून आणि भाजप नेत्यांच्या वक्तव्यांतून नाही, तर अधिकृत कागदपत्रे आणि निर्णयनोंदी सार्वजनिक करून दिली पाहिजेत. 'वोटचोरी' आणि मतदार यादीतील अनियमिततेच्या आरोपांची संयुक्त संसदीय समितीमार्फत स्वतंत्र, निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी झाली पाहिजे आणि संबंधित सर्व नोंदी संसदेसमोर ठेवण्यात आल्या पाहिजेत. चौकशी पूर्ण होईपर्यंत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर ठेवावे.

# पापाचे घडे भरले !

**फुटीर एकनाथ शिंदे यांचाच शिवसेना हा मूळ पक्ष असल्याचे सांगून त्यांच्याकडे धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह सोपवणे, अजित पवार यांनाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बहाल करीत शरद पवार यांच्याकडून घड्याळ हे निवडणूक चिन्ह हिसकावून घेणे या निवडणूक आयोगाने खुलेआम केलेल्या पापांच्या मालिकेत आता आणखी एक भर पडली आहे.**



**प.** बंगालच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी १९९८ मध्ये तृणमूल काँग्रेस (टीएमसी) स्थापन करताना स्वतः रेखाटलेले 'फुले व गवत' हे पक्षचिन्ह त्यांच्याकडून २८ वर्षांनी हिरावून घेतलेले आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि निवडणूक आयोग यांच्या संगनमताने झालेल्या या पापांचा घडा आता भरला आहे. तो फुटणार कधी आणि कसा, एवढेच स्पष्ट व्हायचे आहे.

प. बंगालमधील विधानसभेच्या निवडणुकीत भाजप पहिल्यांदा सत्तेत आणल्या गेला. २०७ जागा जिंकल्या, तर तृणमूल काँग्रेसला अवघ्या ८० जागा मिळाल्या. 'राष्ट्र प्रथम'च्या बाता मारणाऱ्या भाजपने १२ वर्षांत 'सत्ता प्रथम' हेच धोरण ठेवले आहे. त्यासाठी कोणत्याही थराला तो जातो. विरोधी पक्षांचे तुकडे करणे, त्यांना आमिषे दाखविणे, जो ऐकणार नाही त्यांच्यावर ईडी, सीबीआय, पोलिसांच्या धाडी टाकणे, त्यांना तुरुंगात डांबणे असे प्रकार करून वरून साजुक स्वच्छ प्रतिमेचा आव आणणे, हा यांचा धंदा आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना आणि त्यातून आलेली लोकशाही यांना त्यांच्या विकासात अडथळे आणणारी वाटते. धर्मनिरपेक्षता यांच्या शब्दकोशातच नाही. त्यामुळे एकेकाला संपवणे हा धडक कार्यक्रम त्यांनी हाती घेतला आहे. भाजपच्या आसुरी भुकेचा फटका सर्वप्रथम शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना बसला. दुसरा फटका 'जाणता राजा' असे बिरुद लागलेले शरद पवार यांना बसला. अर्थात, पवारांच्या कुटुंबातले अर्धे लोक भाजपशी दोस्ती करून पदे घेऊन बसले असल्याने महाराष्ट्राला पवार कुटुंबीय आता केवळ संधीसाधू वाटायला लागले आहेत. पवारांचा राजकारणातील एकेकाळचा दबदबा जमीनदोस्त झाला आहे. घड्याळ चिन्ह त्यांच्याकडे नसले तरी ते कुटुंबातच आहे.' तू मारल्यासारखे कर, मी रडल्यासारखे करतो' असा त्यांचा तबला डग्गा लोकांना नकोसा झाला आहे. महाराष्ट्रात दिल्लीच्या महाशक्तीने हादरा दिल्यानंतरही न झुकणारा, ठामपणे उभा राहिलेला पक्ष म्हणजे मूळ शिवसेनाच आहे. ममता बॅनर्जींच्या बाबतीतही हीच कहाणी आहे. त्यांनी स्वतः पक्ष उभारला. सिंचन केले. डाव्यांशी सतत संघर्ष केला. बंगाली जनमानसात ममता दीदी कुटुंबातील व्यक्ती झाल्यात. त्या केवळ राजकारणी नाहीत, तर स्व-शिक्षित चित्रकार आहेत. त्यांनी अनेक गद्य-पद्य पुस्तके लिहिली आहेत. कवितासंग्रहांसाठी पुरस्कारही मिळाले आहेत. त्या गीतकार आहेत. सिंथेसायझरही वाजवतात. प. बंगालमध्ये विधानसभेच्या पोटनिवडणुकीत त्यांचे, खुद्द त्यांनी रेखाटलेले पक्षाचे चिन्ह गोठवून निवडणूक आयोगाने आपण जनतेचे नव्हे तर फक्त मोदी सरकारचे एकनिष्ठ चाकर आहोत हे पुन्हा एकदा दाखवून दिले.

### का गोठवले चिन्ह?

हे चिन्ह १९९८पासून पक्षासोबत होते. गवतातून उगवणाऱ्या दोन हिरव्या कळ्या, फुले हे एकता, सलोखा आणि तृणमूली राजकारणाचे प्रतीक मानले जात होते. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूलच्या पराभवानंतर महाराष्ट्रातल्या टेक्स्ट बुकनुसार पक्षात फूट पाडण्यात आली. फुटीर गटाने ममता बॅनर्जी यांच्याकडे असलेले संबंधित पक्षनाव, चिन्ह आणि मालमत्तेवर गद्दारांचा दावा सुरू झाला. अरूप रॉय, ऋतब्रत बॅनर्जी यांच्या गद्दार गटाने आपणच 'मूळ' तृणमूल काँग्रेस असल्याचा दावा करून नंदीग्राम, रेजीनगर या ठिकाणी होऊ घातलेल्या पोटनिवडणुकीत उमेदवार उभे केले. आयोगाने १७ सप्टेंबर रोजी अंतरिम आदेश काढून दोन्ही गटांना 'ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि पक्षचिन्ह वापरण्यास मनाई केली. दोन्ही गटांना नवीन नावे आणि मुक्त चिन्हांचे पर्याय सादर करण्यास सांगितले. १८ सप्टेंबर रोजी आयोगाने पोटनिवडणुकीसाठी तात्पुरती व्यवस्था केली. ममता बॅनर्जी यांना ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस असे नाव देत फुटबॉलपटू हे पक्षचिन्ह दिले. बंडखोर गटाला 'डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस असे नाव देत लिफाफा' हे चिन्ह दिले. अंतिम निर्णय पूर्ण सुनावणीनंतर होईल असे निवडणूक आयोग सांगतो. ममता बॅनर्जी यांनी या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हानही दिले आहे. १९९८ नंतर पहिल्यांदाच हे चिन्ह मतपत्रिकेवर नसणे हा ममता बॅनर्जींच्या ओळखीला धक्का आहे. त्यांनी याला 'लोकशाहीचा काळा दिवस' म्हटले आहे. ममता गटाच्या उमेदवारांना 'फुटबॉलपटू' वर प्रचार करावा लागेल. हा निर्णय ममता यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या वेदनादायक आहे.

### उमेदवाराची माघार...

नंदीग्राममध्ये भाजपचे विद्यमान मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी जिंकले होते. त्यांनी भवानीपूर ही जागाही जिंकली होती. त्यांनी भवानीपूर राखून नंदीग्राम सोडली, त्यामुळे तिथे पोटनिवडणूक लागली. भाजपला साम-दाम-दंडाचा वापर करून ती जिंकायचीच आहे. दुसरी जागा रेजीनगरची आहे, इथे आम जनता उन्नयन पार्टीचे हुमायून कबीर निवडणूक जिंकले होते. त्यांनी नवदा ही जागाही जिंकली होती. त्यांनी ती राखून रेजीनगर सोडली. नंदीग्रामची निवडणूक जिंकून सुवेंदू अधिकारी यांना धडा शिकविण्याचा संकल्प ममता बॅनर्जींनी केला होता. परंतु त्याआधीच ममतादीदींच्या उमेदवारास माघार घ्यायला लावण्यात अधिकारी यशस्वी झाले. संचिता प्रधान डे यांनी १८ सप्टेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेतला. यापूर्वी त्या सुर्वेंदू अधिकारी यांना भेटल्या होत्या. उमेदवाराला धमक्या मिळाल्याने माघार घेतली असे आरोप होत आहेत. माघारीनंतर ममतांनी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे जाहीर केले. त्यानंतर एका तासात काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान यांना पोलिसांनी अटक केली. प्रधान हे २००७च्या नंदीग्राम जमीन अधिग्रहणविरोधी आंदोलनातील महत्त्वाचे कार्यकर्ते होते. त्यांच्यावर २००७ पासूनची १२ प्रकरणे आहेत. ही सर्व प्रकरणे हल्दिया मुख्य न्यायिक दंडाधिकारी न्यायालयात प्रलंबित आहेत. आरोपपत्रेही तयार झालेली नाहीत. २०२१ आणि २०२३ चे चार अजामीन वॉरंट्स अंमलात आणल्याचे पोलीस सांगतात. प्रधान यांना प्रचारासाठी फारसा वेळ उरलेला नाही. राहुल गांधी आणि ममता बॅनर्जींनी याला राजकीय सूड आणि लोकशाहीची हत्या म्हटले. काँग्रेसने उमेदवार मागे घेतला नाही, त्यांच्यासाठी प्रचार सुरू राहणार आहे. गेल्या बारा वर्षांत भारतात अनेक प्रमुख राजकीय पक्ष फोडण्यात आलेत. यात मुख्यतः महाराष्ट्र, बिहार, पंजाब, आंध्र-तेलंगणा, पश्चिम बंगाल आदी राज्यांतील पक्षांचा समावेश आहे. याचा फायदा भाजपला झाला आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, लोक जनशक्ती पार्टी ही 'ऑपरेशन लोटस' या भारतीय राजकारणाचा प्रत्यक्षात चिखल करणाऱ्या रण (अ) नीतीची जिवंत उदाहरण आहे. मध्य प्रदेशात ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या २२ समर्थकांसह काँग्रेस सरकार पडले. भाजप सरकार आले. २०१९मध्ये कर्नाटकात १७ आमदार तोडून जेडीएस-काँग्रेस सरकार पाडले. महाराष्ट्राचा सत्तासंघर्ष असाच आहे. गोवा, मणिपूरमधेही भाजपने हाच राडा केला. राज्ये मोठी असो की छोटी असोत प्रत्येक राज्यात केवळ भाजपचे सरकार असावे हा मोदी आणि शहांचा प्रण असतो.

भारतीय निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावर पाच मिनिटांचे एक गाणे दिसते. 'मैं भारत हूं... हम भारत के मतदाता है' देशातील बहुभाषांतील हे गीत देशवासीयांमध्ये मतदानाबाबत उर्जा आणि लोकशाहीबाबत प्रेम निर्माण करते. त्यात भारताच्या राष्ट्रपती, सरन्यायाधीश मतदानाचे आवाहन करतात. नेते-अभिनेते मतदानाची शाई लागलेले बोट दाखवतात. मोबाईलमध्ये रिंग वाजते अन् निवडणूक आयोगाचा नॅशनल आयकॉन सचिन तेंडुलकर आपल्याशी मतदानासंदर्भात अलगद संवाद साधतो. तेव्हा बलशाली लोकशाहीबाबत प्रत्येकाला अभिमान वाटतो. परंतु संपूर्ण निवडणूक पर्व ज्यांच्या खांद्यावर असते तो 'निवडणूक आयोग' खरच पारदर्शक आहे का? गेल्या चार वर्षांपासून निवडणूक आयोग अगदी मस्तवाल झाला आहे. महाराष्ट्राचा सत्तासंघर्ष ते आता प. बंगालमध्ये दिसलेली निवडणूक आयोगाची भूमिकेमुळे संपूर्ण देशात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. एका विशिष्ट राजकीय पक्षाला लाभ पोहोचविण्यासाठी आयोगाकडून अशी कृती होते हे देशातील मतदारांचे मत झाले आहे. याबाबत सर्वत्र चर्चा झडतात. एकेका मुद्यांवर केवळ राजकीय पक्षच नव्हे तर सामान्य लोकही निवडणूक आयोगाचे लक्तरे टांगतांना दिसतात.

आयुक्तांच्या नियुक्तीपासूनच भारतीय निवडणूक आयोग संशयाच्या भोवऱ्यात आहे. आदर्श आचारसंहिता सांगणाऱ्या आयोगाची वागणूक ऐन निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांच्या नेत्यांबाबत सापत्न असल्याचे दिसून येते. प्रचारसभांमध्ये आचारसंहितेचा भंग करणारे नेते कोणत्या पक्षाचे आहे हे पाहूनच आयोगाकडून कारवाई केल्या जात असल्याचे आरोप सातत्याने होत असते. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९१ (अ) मध्ये भारताच्या सर्व नागरिकांना भाषण आणि अभिव्यक्तीच स्वातंत्र्य आहे. परंतु विरोधी पक्षातील नेत्यांनी शासकीय धोरणांवर टीका केली तर हे योग्य नाही. त्याला आवर घाला म्हणून निवडणूक आयोगाकडून बजावण्यात येते. वर्षभरापूर्वी राहुल गांधी यांनी १८ सप्टेंबरला एक पत्रकार परिषद घेऊन भारतीय निवडणूक आयोग वोटचोरांचे रक्षण करतो असा घणाघात केला होता. यापूर्वी ७ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांनी निवडणूक आयोगाची पोलखोल केली होती. या दोन्ही पत्रकार परिषदा भारतीय लोकशाहीला हादरे देणाऱ्या होत्या. स्वायत्त संस्थांनी भारतीय लोकशाहीचे रक्षण करणे अभिप्रेत असताना या संस्था देशासाठी भक्षक ठरत असल्याचे राहुल गांधी यांनी दाखवलेले चित्र अत्यंत विदारक ठरले. 'द ईसीआई फाइल्स' नावाने त्यांनी आयोगाचे घोळ उघडे केले मात्र पुढे झाले काय? मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राहुलच्या मुद्यांवर खुलासा करण्याचे सोडून सराईत राजकारण्यांप्रमाणे उडवाउडवीची उत्तरे दिली.

विरोधकांनी मुख्य निवडणूक आयुक्त, ईडी, सीबीआय यांना प्रश्न विचारलेले सत्ताधाऱ्यांना जराही सहन होत नाही. ज्यांच्यावर प्रश्न केलेत त्यांच्याकडून उत्तराची अपेक्षा असते, परंतु संस्थेपेक्षा सत्ताधारीच अस्वस्थ होतात आणि विरोधकांचे लचके तोडण्याच्या भूमिकेत दिसतात. जणू काही स्वायत्त संस्थांनी यांच्यावर चौकीदाराची जबाबदारी सोपवली आहे. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये 'वोटचोरी' कशी झाली याबाबत असंख्य उदाहरणे दिलीत. मोदी कपटाने सत्तेत बसले आहेत, हे राहुल गांधी सातत्याने सांगत आहेत. वर्षभर त्यांनी मतदारयाद्यांचे संशोधन केले. निवडणूक आयोगाने भाजपला सत्तेत आणण्यासाठी कसे कारस्थान रचले हे राहुल यांनी पुराव्यासह दोन्ही वेळा देशाला दाखवले आहे. राहुल देशाची दिशाभूल करतात असे ज्ञानेश कुमारांकडून उत्तर मिळत असते. आतापर्यंत त्यांनी एकाही आरोपाची शहानिशा करून 'सत्य' मांडण्याचे धाडस दाखवले नाही. खरे तर भाजपला शंभर टक्के सहकार्य करण्यासाठी मोदी-शहांनी ज्ञानेश कुमार हे विरोधकांच्या मानगुटीवर बसवलेले मुख्य निवडणूक आयुक्त आहेत. निवडणूक आयुक्तांची निवड हाच वादाचा मुद्दा झाला आहे. मोदींनी आपल्या सोयीने निवडप्रक्रिया बदलली. निवड समितीतील पंतप्रधान, विरोधी पक्षनेता आणि सरन्यायाधीश यापैकी सरन्यायाधीशाला हटवले आणि त्याऐवजी मंत्रिमंडळतातील एका सदस्याला घेतले. सरकारला वाटेल त्याला मुख्य निवडणूक आयुक्त केला जातो. राहुल गांधी यांनी ज्ञानेश कुमार यांच्या निवडीला विरोध केला होता. परंतु उपयोग होणार नव्हताच. आता हेच ज्ञानेश कुमार मोदी सरकारची इमाने इतबारे सेवा करीत असल्याचे देशवासीयांना दिसून येत आहे.

इजा बिजा तिजा या न्यायाने शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आता तृणमूल काँग्रेस यांची शिकार ज्या मालकांच्या इशाऱ्यावरून निवडणूक आयोगाने केलेली आहे, त्या मालकांच्याही पायाखालची जमीन सरकवणारे वातावरण देशात आहे. शिशुपालाच्या अपराधाचे घडे भरले की त्यांच्याबरोबर ज्ञानेश कुमार आणि कंपनीलाही लोकशाहीशी केलेल्या प्रतारणेची शिक्षा भोगावीच लागणार आहे. सब का नंबर आयेगा !

**-विकास झाडे**

## यंदाही उंच गणेश मुर्त्या समुद्र किनाऱ्यावरच !

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी गिरगाव चौपाटीच्या किनाऱ्यावर कितीतरी उंच गणेशमूर्त्या विसर्जनाविना उभ्या होत्या तर कितीतरी मुर्त्या किनाऱ्यावर कोसळून छिन्न विच्छिन्न अवस्थेत पडलेल्या होत्या. ज्या श्री गणेशाला दहा दिवस मनोभावे पुजले जाते, त्याच्या चरणी नवस केले जातात, त्याच्या आगमनासाठी सुंदर सजावट केली जाते, वाजत गाजत त्याची मिरवणूक काढली जाते अशा गणेश मूर्तींची झालेली अवहेलना पाहून मनाला वेदना होतात. उंच मुर्त्यांचे दर्शन घेण्यासाठी देश विदेशातून लाखो भाविक दरवर्षी मुंबईत येत असतात. मात्र याच उंच मुर्त्या दुसऱ्या दिवशी समुद्राच्या किनारी पाहिल्यावर गणेश मूर्ती ही शोभेची आणि प्रदर्शनाची वस्तू बनू लागली आहे का असा प्रश्न पडतो. काही मंडळे आपल्या उंच मुर्त्या तराफ्यावरून खोल समुद्रात नेऊन त्यांचे विसर्जन करतात. लालबागच्या राजाचे विसर्जन तर सर्वांचेच डोळे दिपवणारे असते. यंदा मुंबईच्या राजाचे विसर्जन तर अत्यंत राजेशाही पद्धतीत डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. अशा मूर्त्यांना मग क्रेनच्या आधारे खाली पाडून त्यांना भग्न करावे लागते. ज्या गणेशाच्या नावाने १० दिवस उत्सव साजरा केला जातो त्याचा केव्हढा हा अवमान. गणेशोत्सव हा मौजेचा नव्हे तर श्रद्धेचा उत्सव आहे; मात्र हल्ली आपल्या मंडळाची मूर्ती किती उंच आहे हे दाखवण्याची स्पर्धा मंडळांमध्ये रंगताना पाहायला मिळते ज्यामध्ये श्रद्धेला सोयीस्करपणे तिलांजली दिली जाते. उंच गणेशमूर्त्या किनाऱ्यावर सोडून पळ काढणाऱ्या, त्यांचे योग्य पद्धतीने विसर्जन न करणाऱ्या मंडळांवर खरेतर कारवाई करून त्यांना पुढील वर्षी उंच मूर्ती आणण्यास प्रतिबंध घातला पाहिजे.

**-मोक्षदा घाणेकर**

## अत्याचार प्रतिबंधक कायदा

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ हा भारतीय न्यायव्यवस्थेतील एक अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे. समाजातील वंचित आणि शोषित घटकांवर होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक अत्याचार रोखणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. शतकानुशतके चालत आलेला जातीय भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी आणि वंचितांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी हा कायदा अत्यंत कडक बनवण्यात आला आहे. या कायद्यांतर्गत पीडितांना तातडीने दिलासा देणे, आर्थिक साहाय्य करणे आणि अशा प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी विशेष न्यायालये उपलब्ध करून देण्याची ठोस तरतूद करण्यात आली आहे. मात्र, कायद्याचा धाक राहावा यासाठी समाविष्ट करण्यात आलेल्या अत्यंत कठोर प्रक्रियांमुळे, गेल्या काही वर्षांत या कायद्याच्या दुरुपयोगाबाबत वेळोवेळी न्यायालयांमध्ये गंभीर प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. विशेषतः अटकपूर्व जामीन मिळण्यातील कायदेशीर अडचणी, प्राथमिक चौकशीविना थेट प्रथम माहिती अहवाल दाखल करण्याची सक्ती आणि त्यानंतर होणारी त्वरित अटक या तरतुदींवर सातत्याने आक्षेप घेतले गेले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या या सविस्तर आणि सखोल स्पष्टीकरणामुळे भारतीय न्यायव्यवस्थेत एक अत्यंत महत्त्वाचा, संवेदनक्षम आणि आदर्श समतोल प्रस्थापित झाला आहे. एका बाजूला, ज्यांच्यावर खरोखरच अन्याय झाला आहे, अशा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या पीडितांना या कायद्याचे भक्कम संरक्षण मिळत राहील, याची खात्री यातून मिळते. तर दुसऱ्या बाजूला, भारतीय संविधानाच्या कलम २१ अन्वये देशातील प्रत्येक नागरिकाला बहाल करण्यात आलेल्या 'जीवन आणि स्वातंत्र्याच्या अधिकारानुसार', कोणत्याही निरपराध व्यक्तीला खोट्या आरोपांखाली विनाकारण तुरुंगात जावे लागणार नाही, याची कायदेशीर हमीदेखील न्यायालयाच्या या हस्तक्षेपाच्या अधिकारामुळे मिळाली आहे. थोडक्यात सांगायचे तर, कायद्याचा मूळ हेतू आणि वंचितांचे संरक्षण अबाधित राखतानाच, सुडाच्या भावनेतून होणाऱ्या खोट्या तक्रारींवर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे हे सविस्तर निरीक्षण देशातील सर्व न्यायालयांसाठी आणि पोलीस प्रशासनासाठी अत्यंत मार्गदर्शक ठरणार आहे.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,**

## निवडणुक आयोग आणि विरोधकांचा नरेटिव्ह

भारतीय राजकारणात गेल्या काही वर्षांत एक नवा ट्रेंड पाहायला मिळत आहे.निवडणुकीच्या निकालानंतर किंवा प्रक्रियेदरम्यान निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित करणे. सत्ताधारी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय आणि संघटनात्मक ताकदीसमोर विरोधक निष्प्रभ ठरत असताना, निवडणूक आयोगाला कटघरात उभे करणे हा विरोधकांचा नवा राजकीय हातखंडा बनला आहे का, यावर सध्या मोठी चर्चा सुरू आहे.

एका दृष्टिकोनानुसार, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भाजपविरोधात वातावरणनिर्मिती करूनही जेव्हा प्रत्यक्ष निवडणुकीत यश मिळत नाही, तेव्हा विरोधकांमध्ये असहाय्यता निर्माण होते. पंतप्रधान मोदींचे नेतृत्व, भाजपची भक्कम संघटनात्मक बांधणी आणि कल्याणकारी योजनांचा प्रभाव यांमुळे भाजपला वारंवार जनादेश मिळतो. अशा वेळी स्वतःचा पराभव स्वीकारण्याऐवजी किंवा आपल्या धोरणांमधील त्रुटी शोधण्याऐवजी, 'ईव्हीएम' आणि निवडणूक आयोगावर शंका उपस्थित करून पराभवाचे खापर घटनात्मक संस्थांवर फोडले जाते. यामुळे स्वतःच्या कार्यकर्त्यांचे मनोबल टिकवून ठेवणे आणि मतदारांसमोर आपली असहाय्यता झाकणे विरोधकांना सोपे जाते. दुसऱ्या बाजूने, स्वतःची राजकीय अपयशे झाकण्यासाठी लोकशाहीत कोणत्याही घटनात्मक संस्थेला प्रश्न विचारणे हा आपला घटनात्मक अधिकार असल्याचा कांगावा विरोधकांकडून केला जातो. परंतु, केवळ निवडणुका जिंकता येत नाहीत म्हणून देशातील सर्वोच्च आणि स्वायत्त संस्थांवर सातत्याने अविश्वास दाखवणे हे राजकीय अपरिपक्वतेचे लक्षण मानले जाते.लोकशाहीचा पाया हा पराभवाचे प्रामाणिक आत्मपरीक्षण आणि घटनात्मक संस्थांवरील विश्वासावर आधारलेला असतो. विरोधकांनी संस्थांना कटघरात उभे करून आपली असहाय्यता झाकण्याऐवजी, जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी ठोस धोरणे आणि मजबूत संघटनात्मक बांधणीवर भर देणे हाच समृद्ध लोकशाहीचा खरा मार्ग आहे.

**अविनाश देशपांडे**

रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# ब्लास्टिंगच्या ट्रॅक्टर मधील सिलेंडरचा भीषण स्फोट..!

## दोघांचा मृत्यू, सात गंभीर जखमी, उमरखेड-ढाणकी मार्गावरील थरारक घटना डिटोनेटर असल्याच्या शक्यतेने परिसरात खळबळ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २६ :** ब्लास्टिंगच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रॅक्टरला वेल्डिंगचे काम सुरू असताना टायरजवळील हवेच्या सिलेंडरचा भीषण स्फोट झाल्याची घटना शनिवारी (दि.२६) सकाळी साडेअकराच्या सुमारास उमरखेड–ढाणकी मार्गावरील किसान वेल्डिंग वर्कशॉप समोर घडली.

स्फोटाची तीव्रता एवढी होती की, ट्रॅक्टर जवळ उभे असलेले काही जण अक्षरशः हवेत उडाले. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून सात जण गंभीर जखमी झाले आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांनाही किरकोळ दुखापती झाल्याची माहिती आहे. या दुर्घटनेत अविनाश केशव बेले (३२, रा. बाळदी) आणि सय्यद शाहजेब सय्यद अनिस (१५, रा. उमरखेड) यांचा मृत्यू झाला. जखमींमध्ये सै. उमेर सै. अनिस (१७), वासीद खान रशीद खान (३२), शेख जावेद शेख बाबू (१९), सै. जोहान सै. मोबीन (१४), सलमान खान शेरुखान (३४) तसेच ट्रॅक्टर मालक आप्पाराव बोक्से (५४) आणि त्यांचा मुलगा वैभव बोक्से यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच-२९ व्ही-२५२८ क्रमांकाचा ब्लास्टिंगच्या कामासाठी वापरला जाणारा ट्रॅक्टर वेल्डिंगसाठी वर्कशॉपमध्ये आणण्यात आला होता. वेल्डिंगचे काम सुरू असतानाच टायरजवळील सिलेंडरचा अचानक स्फोट झाला. स्फोटामुळे परिसरातील वाहनांच्या काचा फुटल्या आणि मोठा आवाज झाल्याने नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नगरसेवक साजिद जहागीरदार आणि काँग्रेसचे सोनू खतीब यांनी जखमींना तातडीने मालवाहू वाहनातून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले. गंभीर जखमींपैकी पाच जणांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले असून इतरांवर उमरखेड उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

> **स्फोट नेमका कशामुळे?**
>
> **विहिरी व खदानींमध्ये छिद्रे पाडून ब्लास्टिंग करण्यासाठी संबंधित ट्रॅक्टरचा वापर केला जात असल्याची माहिती आहे. ट्रॅक्टरमध्ये ब्लास्टिंगसाठी वापरले जाणारे डिटोनेटर असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, स्फोटात नेमके कोणते साहित्य होते आणि दुर्घटनेचे मूळ कारण काय, हे पोलिसांच्या तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.**

घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे पाटील, ठाणेदार शंकर पांचाळ, सपोनी व्यंकट गंगलवाड आणि सपोनी लक्ष्मी मलकुवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. ट्रॅक्टरमध्ये ब्लास्टिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या डिटोनेटरचा साठा होता का, याचीही पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनात पोलिसांकडून तपासणी केली जात आहे. संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नागरिकांना घटनास्थळापासून दूर केले. या घटनेमुळे उमरखेड शहरात खळबळ उडाली असून, शाळा-महाविद्यालयांच्या वर्दळीच्या रस्त्यालगत ब्लास्टिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याची वाहतूक व हाताळणी कितपत सुरक्षित आहे, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. आमदार किसनराव वानखेडे, नितीन भुतडा, संतोष जैन आणि संदीप ठाकरे यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली व मृतांच्या नातेवाईकांचे सांत्वन केले.

# जनुन्यात शेतात गांजाची लागवड, २२ झाडे जप्त..!

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, ३५ वर्षीय इसमाविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २६ :** तालुक्यातील मौजा जनुना येथील शेतशिवारात गांजाची लागवड केल्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उघडकीस आणला. या कारवाईत गांजाची २२ झाडे जप्त करण्यात आली असून, संतोष किसन लोहटे (वय ३५, रा. जनुना, ता. पुसद) याच्याविरुद्ध पुसद ग्रामीण पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२४ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या यवतमाळ कॅम्प पुसद पथकाला जनुना शेतशिवारात गांजाची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना अवगत केल्यानंतर पथकाने जनुना येथे पंचांसमक्ष कारवाई केली. यावेळी संतोष लोहटे याच्या ताब्यातील शेतात गांजाची २२ झाडे आढळून आली. या झाडांची अंदाजे किंमत २४ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले असून, पंचांसमक्ष मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अंमली औषधी व मनप्रभावी पदार्थ अधिनियमाच्या कलम ८(ब), २०(अ)(i) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. शेतशिवारातच अमली पदार्थांची लागवड होत असल्याचा प्रकार समोर आल्याने ग्रामीण भागातील अवैध अमली पदार्थांच्या व्यवहारावर पोलिसांनी लक्ष केंद्रित करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते व पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# दुष्काळाची पाहणी,मंत्री पोहोचले शेतकऱ्यांच्या बांधावर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभूळगाव , दि. २६ :** दुष्काळ सदृश्य स्थितीची पाहणी करण्या करिता यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड, आदिवासी विभागाचे मंत्री ना. डॉ.अशोक उईके, आमदार राजू तोडसाम, आमदार किसन वानखडे यांनी बाभूळगाव तालुक्यातील गवंडी, सारफळी, घारफळ व शिदी भागातील शेतातील सोयाबीन, तूर, कपाशी आदि पिकांची शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले.

तालुक्यात पावसाच्या लहरीपणा मुळे तोंडावर आलेले सोयाबीनचे पीक हातून गेले दाना बारीक झाला. तुर व कपाशी ची झाडे करपून गेली याचा उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला सोबतच बळीराजा एवढा खर्च करून आर्थिक अडचणीत आला. दुष्काळ सदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या पिकावर झालेल्या परिणामाची प्रत्यक्ष पाहणी करून उपाय योजना करण्यात संबंधात अधिकाऱ्यां कडून माहिती जाणून घेण्यात आली.

शासन स्तरावर शेतकऱ्यांना काय मदत देता येईल यासाठी हा पाहणी दौरा होता असे सांगण्यात आले. या वेळी तहसीलदार मीरा पागोरे, नायब तहसीलदार दिलीप बदकी, तालुका कृषी अधिकारी ऋतिका डेरे, राळेगाव विधान सभा प्रमुख सतीश मानलवार, शिवसेनेचे जिल्हा उप प्रमुख सचिन महल्ले, राजू पांडे, नितीन परडखे, सुधीर कडूकार, अनिकेत पोहोकार, आशिष सोळंके, संजय राठी, अभय तातेड, गोलू राठी, नागेश ठाकरे, दिलीप वाघमारे, नरेंद्र बोबडे शिवसेना, भारतीय जनता पार्टी चे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दारूबंदीच्या शहरात बिनपरवाना दारूविक्रीचा आरोप..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उत्पादन शुल्क विभागाची तत्परता कुठे?**



**दिग्रस, दि. २६ :** दिग्रस शहरात दारूबंदी असतानाही जुन्या दारव्हा रोडवरील सातबारा फॅमिली रेस्टॉरंट परिसरातील एका हॉटेलमध्ये कोणताही अधिकृत परवाना नसताना देशी-विदेशी दारूची खुलेआम विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दिवसाढवळ्या तसेच रात्री उशिरापर्यंत मद्यविक्री होत असल्याचा दावा असून, यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. गणेश विसर्जन काळात नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यावर प्रशासनाचा भर असताना, कथित बेकायदा दारूविक्रीकडे संबंधित यंत्रणेचे लक्ष आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

या ठिकाणी अल्पवयीन मुलांचा वावर वाढत असल्याने पालकांनीही चिंता व्यक्त केली आहे. सदर हॉटेलकडे FL-३ किंवा CL-३ प्रकारचा वैध परवाना आहे का, याची अधिकृत माहिती उत्पादन शुल्क विभागाने जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. परवाना नसल्यास तत्काळ कारवाई करून गुन्हा दाखल करावा तसेच परिसरात नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभाग यवतमाळ व दिग्रस पोलिसांशी संपर्क साधला असता प्रतिक्रिया मिळू शकली नाही. मात्र, दारव्हा विभागाचे उत्पादन शुल्क अधिकारी दीपक तसरे यांनी दूरध्वनीवरून, "मी दारव्हा येथे आहे. ड्राय डे असल्याने लगेच कारवाई करणार," असे सांगितले.

## थोडक्यात



### व्यसनाला नकार, सामाजिक बांधिलकीचा स्वीकार,रासेयो दिन साजरा

**व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेत विद्यार्थ्यांनी दिला सामाजिक परिवर्तनाचा संदेश**

**राळेगाव :** कला व वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. अनिल दौलतकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथपाल डॉ. सुरेश फुलकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर व्यसनमुक्ती अभियानांतर्गत उपस्थित विद्यार्थी व स्वयंसेवकांनी सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. अध्यक्षीय भाषणात प्रा. दौलतकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ उपक्रमांची व्यासपीठ नसून विद्यार्थ्यांच्या सामाजिक व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे डॉ. फुलकर यांनी महाविद्यालयातील रासेयोच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. धीरज गोबरे यांनी केले. प्रा. विशाल कातडे यांनी आभार मानले. यावेळी रासेयो स्वयंसेवकांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### जैवविविधतेच्या अभ्यासाला मिळणार नवी दिशा

**महाविद्यालयात वनस्पती व प्राणीशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन..**

**झरी-जामणी :** राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने वनस्पती व प्राणीशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन तसेच तज्ज्ञ व्याख्यान २३ सप्टेंबर रोजी ICT सभागृहात उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. आर. एन. देशमुख होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून केळापूर येथील शिवरामजी मोघे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अमर जे. वंजारी, तर IQAC प्रतिनिधी प्रा. प्रणव टी. भोयर उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, निरीक्षण कौशल्य, संशोधनवृत्ती आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. यावेळी डॉ. वंजारी यांनी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता परिसरातील जैवविविधतेचे प्रत्यक्ष निरीक्षण व दस्तऐवजीकरण करण्याचे आवाहन केले. मंडळाच्या माध्यमातून तज्ज्ञ व्याख्याने, परिसंवाद, प्रश्नमंजुषा, पोस्टर सादरीकरण, निसर्गभ्रमंती, क्षेत्रभेटी व जैवविविधता नोंदणीसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. प्रा. विकास एम. कोठारे व प्रा. संतोष जी. अत्राम यांनी कार्यक्रमाचे समन्वय केले.



### बांधावर पोहोचले राष्ट्रवादीचे पदाधिकारी, नुकसानीचा घेतला थेट आढावा..!

**यवतमाळ :** दुष्काळसदृश परिस्थिती आणि पिकांचे संभाव्य नुकसान यामुळे शेतकरी अडचणीत सापडले असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी केली. तिवसा, कामठवाडा, नरकुंड व वरजाई परिसरातील शेतांमध्ये भेट देत पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची स्थिती व नुकसानीची माहिती जाणून घेतली. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या निर्देशानुसार हा पाहणी दौरा घेण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. महाराष्ट्र महिला प्रदेश उपाध्यक्षा क्रांतीताई धोत्रे (राऊत), विवेक देशमुख, लाला भाऊ राऊत, संदेश राठोड, महेश किसनराव राठोड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पिकांचे नुकसान, पावसाची स्थिती आणि शेतीसमोरील अडचणी याबाबत शेतकऱ्यांनी व्यथा मांडल्या. प्रशासनाकडून आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले. पार्वतीबाई राठोड, गणेश राठोड, गजानन गुल्हाने, अशोक मडावी, संतोष चव्हाण, राम आत्राम यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# बौद्ध महिला हक्कांसाठी आज परिषद..! संविधानिक अधिकारांवर होणार मंथन

## मनुस्मृती दहन दिन आणि हिंदू कोडबिलाच्या मुद्द्याला जोडून विविध मागण्यांवर ठराव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २६ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून बौद्ध महिला हक्क, संविधानिक अधिकार आणि प्रतिनिधित्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी रविवारी, दि. २७ सप्टेंबर रोजी यवतमाळात बौद्ध महिला हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सेलिब्रेशन हॉल, सरकारी दवाखान्या समोर येथे दुपारी ४ वाजता ही परिषद होणार आहे. डॉ. आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीचे दहन करून जात-वर्णव्यवस्थेविरोधात संघर्षाची भूमिका मांडली. तसेच हिंदू कोडबिलातील तरतुदींना अपेक्षित मान्यता न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर २७ सप्टेंबर १९५१ रोजी केंद्रीय कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. या ऐतिहासिक संदर्भातून परिषदेत स्त्री-मुक्ती आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर विचारमंथन करण्यात येणार आहे. बौद्धांचा संविधानिक दर्जा, जात की वर्ग, बौद्ध महिलांचे हक्क, बौद्ध महिलांच्या पोटी जन्मलेल्या अपत्यांच्या जात विषयक प्रश्नां सह Special Marriage Act-१९५४, समान नागरी कायदा, बौद्ध विवाह पद्धती, विवाह नोंदणी, धर्मांतर विषयक कायदा, महिला आरक्षण व प्रतिनिधित्व, बौद्धांची स्वतंत्र जनगणना, उपवर्गीकरण आणि क्रीमीलेयर आदी विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. परिषदेत केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणाऱ्या विविध मागण्यांचे ठरावही मांडले जाणार आहेत. करुणा मून यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या परिषदेला डॉ. स्नेहल उके स्वागताध्यक्ष आहेत. प्रा.पुष्पलता वानखेडे,प्रमुख मार्गदर्शन रमेश जीवने,करणार असून इंजि. दीपक नगराळे यांच्यासह विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. रूपाताई कुळकर्णी बोधी यांचा 'बौद्ध महिला जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

# खड्ड्यांनी घेतला जीव, तरीही नगर परिषद झोपेतच!- संतोष बोरेले

## नवदुर्गोत्सवापूर्वी शहरातील समस्या युद्धपातळीवर सोडवा अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २६ :** यवतमाळ शहरातील खड्डेमय रस्ते, अस्वच्छता, कचरा, बंद पथदिवे, मोकाट जनावरे आणि अन्य नागरी समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात. प्रशासनाने दुर्लक्ष कायम ठेवल्यास आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते संतोष बोरेले यांनी नगर परिषदेला दिला आहे.

शहरातील प्रमुख मार्गांसह शाळा, महाविद्यालये, दवाखाने, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच विविध प्रभागांतील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. खड्ड्यांमुळे अपघात वाढत असून नागरिकांना आर्थिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप बोरेले यांनी केला. ११ सप्टेंबर रोजी वाघापूर येथील वीरेंद्र शालिकराव कराळे (३७) यांचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोरील खड्ड्यात दुचाकी आदळून अपघात झाला. उपचारादरम्यान २३ सप्टेंबर रोजी त्यांचा मृत्यू झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या नवदुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात लाखो भाविक येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रमुख मार्गांवरील खड्डे बुजविणे, कचरा व गवत हटविणे, डास प्रतिबंधक फवारणी, बंद पथदिवे सुरू करणे, पिण्याचे पाणी व सार्वजनिक शौचालयांची व्यवस्था करणे, अतिरिक्त सफाई कामगारांची नियुक्ती करणे आणि मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. घनकचरा व्यवस्थापनाच्या कंत्राटाबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला असून, शहरातील अस्वच्छतेला जबाबदार अधिकाऱ्यांवर निश्चित जबाबदारी ठरवावी, अशी मागणी बोरेले यांनी केली आहे. नवदुर्गोत्सवापूर्वी सर्व उपाययोजना युद्धपातळीवर पूर्ण न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# पोटात राहिला गॉज अखेर पीडितेला १३ लाखांची नुकसान भरपाई..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २६ :** सिझेरियन शस्त्रक्रियेदरम्यान पोटात गॉज राहिल्याने त्रस्त झालेल्या उमरखेड येथील पीडित महिलेला अखेर न्याय मिळाला. धोंगडीपुरा येथील सौ. पायल गायकवाड यांची उत्तरवार उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीदरम्यान सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर सतत पोटदुखी, उलट्या व अस्वस्थतेचा त्रास सुरू राहिला.

उपचार करूनही वेदना कमी न झाल्याने पुसद येथील मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये तपासणी केली असता पोटात परकीय वस्तू आढळून आली. त्यानंतर तातडीने पुन्हा शस्त्रक्रिया करून पोटात राहिलेला गॉज काढण्यात आला. या प्रकारामुळे वैद्यकीय निष्काळजीपणाचा गंभीर आरोप पुढे आला. मानसिक व आर्थिक त्रास सहन केल्यानंतर पीडितेने सामाजिक कार्यकर्त्या शबाना खान यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या पुढाकाराने ॲड. अरमान शेख आंबेजोगाईकर यांनी प्रकरणाचा पाठपुरावा करून यवतमाळ ग्राहक मंचात दावा दाखल केला. २१ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या आपसी समझोत्या नंतर विमा कंपनीमार्फत पीडितेला १३ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले.

# यवतमाळच्या समस्यांचा आता रीलमधून पंचनामा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** खड्डेमय रस्ते, तुंबलेल्या नाल्या, कचऱ्याचे ढीग, बंद पथदिवे, डासांचा प्रादुर्भाव, मोकाट जनावरे, भटक्या कुत्र्यांचा त्रास आणि विस्कळीत पाणीपुरवठा अशा नागरी समस्यांनी यवतमाळ शहरातील नागरिक त्रस्त असल्याच्या पार्श्वभूमीवर आता या समस्यांचा डिजिटल पंचनामा करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा यवतमाळ नगर परिषदेचे गटनेते व नगरसेवक डॉ. निरज वाघमारे यांनी 'कुठे नेऊन ठेवलंय यवतमाळ माझं?' या संकल्पनेतून 'जनजागृती रील स्पर्धा २०२६' आयोजित केली आहे. या स्पर्धेत नागरिकांनी आपल्या परिसरातील नागरी समस्यांचे वास्तव मोबाईल कॅमेऱ्यात कैद करून रीलच्या माध्यमातून मांडायचे आहे. समस्येचे ठिकाण, तीव्रता आणि त्याचा नागरिकांना होणारा त्रास प्रभावीपणे दाखविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी ११ हजार १११ रुपये, द्वितीय ७ हजार ७७७ रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी ५ हजार ५५५ रुपये पारितोषिक ठेवण्यात आले आहे. रील सादरीकरणाची मुदत २५ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर २०२६ असून निकाल १२ ऑक्टोबरला जाहीर होणार आहे. रील पोस्ट करताना Instagram वरील @ drnirajwaghmare या अकाउंटला Collab Invite पाठविणे आवश्यक आहे. नागरी समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून त्यावर तातडीने उपाययोजना व्हाव्यात, हा उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# मैदानात जिल्हा परिषद शाळेचा दबदबा!

## पांढरकवडा स्कूल संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आगेकूच



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २६ :** तालुकास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, पांढरकवडा संघाने आपल्या खेळाची ताकद दाखवत विजेतेपद पटकावले. डॉ. यार्डी शाळा, उमरी येथे १७ वर्षांखालील मुलांच्या गटातील ही स्पर्धा झाली.

अंतिम सामन्यात जिल्हा परिषद शाळेने इरा इंग्लिश मीडियम स्कूलचा ३-० असा एकतर्फी पराभव करत जिल्हास्तरीय स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले. कर्णधार मोहम्मद हाशिर शेख याने नाणेफेक जिंकून मैदानाची निवड केली. सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा घेत जिल्हा परिषद शाळेच्या खेळाडूंनी उत्कृष्ट समन्वय आणि वेगवान खेळाच्या जोरावर तीन गोल नोंदवले. प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही. प्रशिक्षक सैय्यद अक्रम अली यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने हे यश मिळवले. प्राचार्य अंगिरस निबुदे व मतीन सर यांचेही मार्गदर्शन लाभले. या विजयामुळे पांढरकवडा शहरातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# अचलपूर शहरातील उपजिल्हा रुग्णालयात दीड महिन्यापासून सिटी स्कॅन मशीन बंद

## उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय;आर्थिक भुर्दंड सहन करून खाजगी सिटी स्कॅन केंद्रात रुग्णांची गर्दी

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर शहरातील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी मेळघाट , दर्यापूर तालुक्यासह अचलपूर शहरी व ग्रामीण भागातील रुग्ण मोठ्या संख्येने येतात.मात्र येथे असलेली सिटी स्कॅन मशीन गेल्या दीड महिन्यापासून बंद आहे.संपूर्ण राज्यात शासकीय रुग्णालयातील या मशीनचे मेंटेनन्स चे कंत्राट असलेल्या कंपनीने देयक तखीत असल्याने नादुरुस्त अवस्थेत अचलपूर उपजिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन केंद्र बंद असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अचलपूर



उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ.सुरेंद्र ढोले यांनी दिली.

यामुळे रुग्णांना परतवाडा शहरातील खाजगी सिटी स्कॅन केंद्राचा शोध घ्यावा लागत आहे.आणि आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.एकीकडे राज्य शासन याबाबत कोणता तोडगा काढते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.अचलपूर शहरातील उपजिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन केंद्रात तपासणी साठी दररोज रुग्णांची गर्दी असते. पण संबंधित कर्मचारी सिटी स्कॅन मशीन नादुरुस्त असल्याने केंद्र बंद असल्याचो रुग्णांना सांगतात.यामुळे ही तपासणी महत्वाची असल्याने अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात गेल्या दीड महिन्यापासून सिटी स्कॅन केंद्र बंद असल्याने याचा मानसिक व आर्थिक फटका रुग्णांचा नातेवाईकांना सहन करावा लागत आहे.जवळपास ३५- ते ४० रुग्ण दररोज सिटी स्कॅन केंद्रात तपासणीसाठी येते पण स्थानिक उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने पाठपुरावा करूनही तोडगा निघू शकला नाही. यामुळे या केंद्रात दररोज येणाऱ्या रुग्णाची संख्या पाहता अचलपूर उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने पर्यायी व्यवस्था म्हणून खाजगी सिटीस्कॅन केंद्राशी तात्पुरत्या स्वरुपात रुग्णाच्या सुविधेच्या दृष्टीने करार का केला नाही ? याबाबत परवानगी साठी जिल्हा पातळीवर पाठपुरावा करण्यात आला आहे का ? आणि ही समस्या कायमस्वरूपी कधी मार्गी लागणार ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.

■ या संदर्भात आमच्या प्रतिनिधीने शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आ.बच्चू कडू यांच्या शी संपर्क साधून प्रतिक्रिया घेतली असता,त्यांनी या प्रकरणाबाबत संपूर्ण माहिती संबंधित अधिकाऱ्याकडून शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे विधानपरिषद आ.बच्चू कडू यांनी सांगितले.

■ या संदर्भात राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. आणि तत्काळ सिटी स्कॅन ची बंद असलेली सुविधा पूर्वरत सुरू करण्याची मागणी केली आहे. आमचा पाठपुरावा सुरू आहे. सोबतच राज्यात संबंधित कंपनीचे सिटीस्कॅन केंद्राचे मेंटेनन्स ची सेवा बंद असल्याने रुग्णांना याचा फटका बसत असल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून खाजगी सिटीस्कॅन केंद्राची नेमणूक उपजिल्हा रुग्णालयाकडून व्हावी यासाठी जिल्हाशलचिकित्सक यांच्याशी चर्चा करणार आहे.

**-आ.प्रवीण तायडे,** अचलपूर विधानसभा मतदारसंघ.

## दिव्यांगांसाठी तालुकास्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबवले जात आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये दिव्यांगांसाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ३० सप्टेंबरपासून हे शिबीरे आयोजित करण्यात येणार आहे.

तालुका पातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या या शिबिरांच्या माध्यमातून दिव्यांगांना थेट प्रमाणपत्र मिळवणे सोपे होणार आहे. अमरावती आणि भातकुलीसाठी बुधवार, ३० सप्टेंबर रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, गुरुवार, १ ऑक्टोबर रोजी ग्रामीण रुग्णालय, चांदूर रेल्वे, मंगळवार, ६ ऑक्टोबर रोजी ग्रामीण रुग्णालय, नांदगाव खंडेश्वर, गुरुवार८ ऑक्टोबर रोजी ग्रामीण रुग्णालय, चांदूर बाजार, शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर, मंगळवार, १३ ऑक्टोबर रोजी ग्रामीण रुग्णालय, तिवसा, गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर, शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी, शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी येथे सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे शिबीर होणार आहे.

दिव्यांग व्यक्तींनी यापूर्वीच दिव्यांग प्रमाणपत्र किंवा यूडीआयडी कार्ड प्राप्त केले असल्यास त्यांनी या शिबिरास उपस्थित राहू नये. तसेच कॅन्सर, हृदयरोग, क्षयरोग आणि इतर गंभीर, दुर्धर आजारांनी ग्रस्त असणाऱ्या रुग्णांनी या शिबिरासाठी उपस्थित राहू नये, तसेच दिव्यांगांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी केले आहे.

## धोकादायक वळणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; अपघातानंतरच जाग येणार का?

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरातील वर्धा–पुलगाव–देवगाव–चांदूर रेल्वे–अमरावती या प्रमुख मार्गावर रेल्वे पुलाचे काम होऊन तब्बल दोन ते अडीच वर्षांचा कालावधी लोटला आहे. मात्र, पुलाच्या परिसरातील एका धोकादायक वळणाचा प्रश्न अद्यापही कायम असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालक आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.शहराच्या दिशेने येणाऱ्या वाहनांना सोनगाव, कळमगाव तसेच अमरावतीच्या दिशेने वळताना समोरून येणारी वाहने स्पष्टपणे दिसत नसल्याने या ठिकाणी अपघाताची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे.

या मार्गावरून लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी नियमितपणे प्रवास करतात. मग हे धोकादायक वळण त्यांच्या निदर्शनास का आले नाही? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या या मार्गावर एवढी गंभीर परिस्थिती असताना अद्याप ठोस उपाययोजना का करण्यात आली नाही, याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अपघात घडल्यानंतर, एखादा निष्पाप जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा सवाल आता नागरिकांकडून केला जात आहे.



लाखो रुपयांचे वेतन घेणारे अभियंते आणि संबंधित विभागाचे अधिकारी या रस्त्याच्या सुरक्षिततेची पाहणी करत नाहीत का? पुलाचे बांधकाम करताना वाहतुकीची दिशा, वळणाची रचना आणि समोरून येणाऱ्या वाहनांची दृश्यमानता यांचा विचार करण्यात आला होता का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.नागरिकांनी या धोकादायक वळणाबाबत लक्ष वेधल्यानंतर तरी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित लोकप्रतिनिधी जागे होणार का? अपघात होण्याची वाट न पाहता या ठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना करणे गरजेचे आहे.

या ठिकाणी योग्य दिशादर्शक फलक, रस्त्यावरील सुरक्षा व्यवस्था, आवश्यक ते बॅरिकेडिंग तसेच वाहनचालकांना समोरून येणारी वाहने स्पष्टपणे दिसतील अशा उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.प्रशासनाने आता तरी या धोकादायक वळणाची गंभीर दखल घ्यावी आणि एखादा अपघात घडण्यापूर्वीच ठोस उपाययोजना करावी. अन्यथा उद्या काही अनर्थ घडल्यानंतर जबाबदारी कोणाची? हा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

## विदर्भ कुंभार समाज सुधार समितीतर्फे आज पदवीधर सत्कार व जीवन गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावती यांच्या वतीने दहावी, बारावी व पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थिनींचा सत्कार, तसेच कला, क्रीडा, सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवांचा सत्कार सोहळा रविवार, २७ सप्टेंबर रोजी सकाळी १०:०० पासून संत गोरोबा भवन, शशी नगर, बडनेरा रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात देविदासजी सोनाजी काळकर (माजी अध्यक्ष, विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावती व मारोतराव खंडूजी शेंडोकार (थोर समाज सेवक, आकोट) यांना 'जीवन गौरव पुरस्कार (२०२६)' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावतीचे अध्यक्ष सुधाकर शेंडोकार राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखरी बावनकुळे,आ. रविभाऊ राणा, माजी खासदार नवनीत राणा, भाजप ओबीसी मोर्चा अध्यक्ष म.रा. तथा वर्धा जिल्हा भाजप अध्यक्ष संजयभाऊ गाते, सरचिटणीस, सकल कुंभार समाज विकास परिषद, महाराष्ट्र प्रदेश सुभाष टेटवार, नगरसेवक तथा गटनेता, नगर परिषद, दर्यापूर प्रदीपभाऊ मलीये राहणार आहेत. याप्रसंगी श्री संत गोरोबा काका समाजोन्नती बहुउद्देशीय समिती, अमरावतीचे माजी अध्यक्ष पंजाबराव काकडे, श्री संत गोरोबा काका समाजोन्नती बहुउद्देशीय समिती, अमरावतीचे अध्यक्ष सुरेश नांदूरकर, श्री संत गोरोबा काका समाजोन्नती बहुउद्देशीय समिती, अमरावतीचे सचिव डॉ. श्रीराम कोल्हे, विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावतीचे माजी अध्यक्ष डॉ. संजय सावळीकर, विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावतीचे माजी अध्यक्ष देविदास काळकर, विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावतीचे माजी अध्यक्ष देविदासजी धामणकर, श्री संत गोरोबा काका नागरी सहकारी पतसंस्था, अमरावतीचे अध्यक्ष भगवानजी जामकर, विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, वर्धाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव जवळेकर, संत गोरोबा काका बहुउद्देशीय समिती, दर्यापूरचे सचिव तथा सुप्रसिद्ध बिल्डर अरूणभाऊ चोंडके यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. तरी सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक व समाजबांधवांना या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विदर्भ कुंभार समाजातर्फे करण्यात आले आहे.

## अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा; कुमकुम मोहोडची एशियन गेम्समध्ये भरारी

**अमरावती/का.प्र.**

जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर सर्वसाधारण कुटुंबातून आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेणाऱ्या अमरावतीच्या कुमकुम मोहोड हिची एशियन गेम्ससाठी भारतीय संघात निवड झाली आहे. आज २६ सप्टेंबर रोजी जपानमध्ये ती एशियन गेम्सच्या मैदानात उतरणार असून, तिच्या कामगिरीकडे अमरावतीसह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. कुमकुमच्या या ऐतिहासिक यशामुळे अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कुमकुमने २०१८ मध्ये धनुर्विद्या खेळाला सुरुवात केली. घरची आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असल्याने सुरुवातीच्या काळात महागडे धनुर्विद्या साहित्य घेणे तिला शक्य नव्हते. त्यामुळे तिने लाकडी धनुष्यावर सराव सुरू केला. मात्र, साधनांची कमतरता तिच्या ध्येयाच्या आड आली नाही. लाकडी धनुष्याच्या जोरावरच तिने राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्राला अनेक पदके मिळवून दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी रिकर्व्ह प्रकारात खेळणे आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन डांगे यांनी २०२२ पासून कुमकुमला रिकर्व्ह प्रकाराचा सराव सुरू करून दिला. हा निर्णय तिच्या क्रीडा कारकिर्दीतील महत्त्वाचा टर्निंग पॉईंट ठरला.



रिकर्व्ह प्रकारात पदार्पण केल्यानंतर कुमकुमने राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करत पदकांची मालिकाच सुरू केली. त्यानंतर चीन येथे झालेल्या वर्ल्डकपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत तिने टीम इव्हेंटमध्ये देशाला सुवर्णपदक मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच टर्की वर्ल्डकपमध्ये मिक्स्ड डबल प्रकारातही तिने भारताच्या खात्यात सुवर्णपदकाची भर घातली.

कुमकुमच्या या यशामागे तिचे वडील अनिल मोहोड आणि आई रूपाली मोहोड यांची खंबीर साथ आहे. सध्या कुमकुम अमरावतीच्या मनीबाई गुजराती हायस्कूलमध्ये इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत आहे. तिच्या क्रीडा प्रवासात शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली देव, क्रीडाशिक्षिका तथा छत्रपती पुरस्कार विजेत्या स्वाती बाळापुरे आणि छत्रपती पुरस्कार विजेते मंगेश व्यवहारे यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. महाराष्ट्र आर्चरी संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे आणि सचिव प्रमोद चांदुरकर यांनीही तिला वेळोवेळी प्रोत्साहन दिले आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविणारे प्रशिक्षक प्रफुल डांगे यांच्या मार्गदर्शनाला कुमकुमच्या यशात विशेष महत्त्व आहे.'लाकडी बो'पासून सुरू झालेला कुमकुमचा प्रवास आता एशियन गेम्सपर्यंत पोहोचला आहे. तिच्या या प्रेरणादायी वाटचालीमुळे अमरावतीकरांची मान अभिमानाने उंचावली असून, जपानच्या मैदानावर कुमकुम आपल्या अचूक निशाण्याने भारताचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास तिचे प्रशिक्षक, क्रीडाशिक्षक आणि सहकारी खेळाडूंनी व्यक्त केला आहे.


# पीक नुकसानीचे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करा

## संत्रा-केळी उत्पादकांसाठी स्वतंत्र पंचनामे व विशेष मदतीची प्रहारची मागणी

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

चांदूरबाजार तालुक्यात कमी-अनियमित पाऊस, प्रतिकूल हवामान, अतिवृष्टी तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाच्या आदेशानुसार सुरू असलेले पीक नुकसानीचे सर्वेक्षण तातडीने,पारदर्शक व वस्तुनिष्ठ पद्धतीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून द्यावा,अशी मागणी प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली.

तालुक्यात विशेषतः संत्रा व केळी पिकांचे मोठे नुकसान झाले असून, संत्रा बागांमध्ये फळगळ व फळांची पडझड



झाल्याने उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. ही बारमाही पिके असल्याने नुकसानीचा परिणाम केवळ चालू हंगामापुरता मर्यादित न राहता पुढील दोन वर्षांच्या आर्थिक नियोजनावर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सर्वेक्षणात प्रत्यक्ष शेतातील नुकसानीची पिकनिहाय व गावनिहाय नोंद घ्यावी, संत्रा व केळी उत्पादकांचे स्वतंत्र पंचनामे करावेत,तसेच झाडांची संख्या,उत्पादन क्षमता, फळगळ,पडझड, उत्पादन खर्च व अपेक्षित उत्पादनातील घट यांची वस्तुनिष्ठ नोंद करावी,अशी मागणी करण्यात आली.

तसेच पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीक विम्याचा लाभ, दुष्काळसदृश परिस्थितीतील सवलती तसेच पुढील हंगामासाठी बियाणे,खते व कृषी निविष्ठांसाठी उपलब्ध योजनांचा लाभ मिळवून द्यावा. संत्रा व केळी उत्पादकांच्या दीर्घकालीन नुकसानीचा विचार करून विशेष आर्थिक मदत व पुनर्वसन पॅकेजचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

**तहसील कार्यालयात निवेदन**


प्रहारचे तालुकाप्रमुख दिनेश आमझरे,प्रदीप बंड यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी सुरेश गणेशकर,बाळासाहेब भुजबळ,संतोष किटुकले, समर्थ डवरे, श्रीकृष्ण आवारे, संजय गोमकाळे, संकल्प आढऊ, विश्वजीत देवतळे, वेदांत मातकर यांच्यासह प्रहारचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते. निवेदनाची प्रत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री तथा पालकमंत्री, कृषिमंत्री, जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना देण्यात आली.

**केळीची घड देत तहसीलदारांचे लक्ष वेधले**

चांदूरबाजार तालुक्यात केळी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेचे पदाधिकारी व शेतकऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देताना प्रतिकात्मक स्वरूपात केळीची घड भेट देत प्रशासनाचे लक्ष वेधले. प्रत्यक्ष शेतशिवारातील नुकसानीची पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व पात्र शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## संक्षिप्त

### पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन



**अमरावती -** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी अधिक्षक निलेश खटके विधी अधिकारी नरेंद्र बोहरा यांच्यासह अन्य अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.


### महानगरपालिकेत पंडीत दीनदयाळ उपाध्याय जयंती साजरा



**अमरावती -** पंडीत दीनदयाळ उपाध्याय जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्य उपमहापौर सचिन भेंडे यांचे हस्ते पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. यावेळी अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर,सभागृह नेता चेतन गावंडे, नगरसेविका सुरेखा लुंगारे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख,अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर,मुख्यलेखापरीक्षक श्यामसुंदर देव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, सतिश ताथोड, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### टाकरखेडा-साऊर मार्गावर अपघाताचा धोका वाढला

**टाकरखेडा संभू -** साऊर मार्गाची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या भेगा आणि रस्त्याच्या दोन्ही



बाजूंनी वाढलेल्या झाडांच्या फांद्या यामुळे वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. रस्त्यावर आलेल्या फांद्यांमुळे समोरून येणारे वाहन स्पष्टपणे दिसत नसल्याने वाहनचालकांना वाहने चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे.या मार्गावर झाडांच्या फांद्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावर झुकल्या आहेत. त्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. समोरून एखादे वाहन अचानक आल्यास त्याचा अंदाज येत नसल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे.नुकताच या मार्गावर दोन युवकांचा अपघात झाल्याची घटना घडली.संभाव्य अपघात टाळण्यासाठी रस्त्यावरील झाडांच्या फांद्यांची तातडीने छाटणी करून रस्त्यावरील भेगा व खराब भागाची दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे.या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने नागरिक,शेतकरी,विद्यार्थी व वाहनचालकांची ये-जा असते. त्यामुळे संबंधित विभागाने केवळ अपघात झाल्यानंतर उपाययोजना न करता, त्यापूर्वीच धोकादायक ठिकाणांची पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जि.प अमरावती येथे पंडित दीनदयाल उपाध्याय जयंता



**अमरावती -** पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात आज अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुलकर्णी यांच्या हस्ते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन केले. त्यानंतर कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास प्रशासन अधिकारी संजय मुंद्रे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने, विजय कविटकर व विजय कोठाले, स्वीय सहाय्यक परमेश्वर राठोड, वरिष्ठ सहाय्यक विलास मेदूकर, कनिष्ठ सहाय्यक विशाल कुळसंगे, सांख्यिकी सहाय्यक प्रयोग भोंडे, वरिष्ठ सहाय्यक राहुल काळमेघ, परिचर युसुफ शहा यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी कनिष्ठ प्रशासन अधिकारी विजय कविटकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या कार्य व विचारांचे स्मरण करीत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### अचलपुरात गणरायाला भावपूर्ण निरोप

**अचलपूर -** भक्तांनी यथाशक्ती मनोभावे केलेली पूजा स्वीकारून गणपती बाप्पा आपल्या भक्तांचा निरोप घेतला. अनंत चतुर्दशीनिमित्त लाडक्या गणरायाच्या विसर्जनासाठी शिवसेना आणि प्रहार पक्षाच्या वतीने अचलपूर शहरातील प्रसिद्ध अमिनाथ



मंदिराच्या परिसरातील नदीपात्रात कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली होती.यावेळी शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आ. बच्चू कडू यांनी सुद्धा भेट दिली.यावेळी विधानपरिषद आ.बच्चू कडू यांनी भाविक - भक्तांशी संवाद ही साधला.यावेळी प्रहार पक्षाचे बल्लू जवंजाळ,माणिक देशपांडे,राजेश खोलापुरे,माजी नगरसेवक बंटी ककरानीया, गिरधर चरपटे,शिवसेना पक्षाचे प्रितेश अवघड,शहराध्यक्ष आतिश अहिर,विवेक महल्ले, अशपाक खान,वैभव बोबडे, विलास सुंडेवाले, हेमंत सुंडेवाले आदी उपस्थितीत होते.

# सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारा नेतागिरीचा 'मायक्रो' अवतार!



**इतरांची पोरे वापरायची आणि स्वत:ची राखायची, ही विचारसरणी इथल्या राजकीय मानसिकतेत मुरलेली आहे. मोठे पद, निवडणुकीचे तिकीट, सन्मान हे फक्त नेत्याच्या मुलांनाच मिळते. सामान्य तरुण मात्र या नादात स्वत:चे भविष्य उद्ध्वस्त करून बसतात. राजकारणातील वाढती मायक्रो-लीडरशिप आणि बॅनरबाजीमुळे तरुणाईचा गैरवापर होत असून सामाजिक सलोख्याला तडा जात आहे.**

देशाचे नेतृत्व करणारा एक प्रमुख नेता ते एका चाळीमधील एखाद्या गल्लीत पुढेपुढे करणारे अनेक 'स्वयंघोषित नेते' इथपर्यंतचे पर्यंतचे स्थित्यंतर हे राजकारणाने लोकशाहीचा केलेला विस्तार वा विकेंद्रीकरण वा स्वातंत्र्य नव्हे, तर रसातळापर्यंत वाहत चाललेला सत्तास्वार्थकरणाचा गलिच्छ प्रवाह होय. राजकारण हे असे गल्लीबोळ्यात शिरले आणि राजकारणाकडे करिअर म्हणून बघण्याचा अवकाश अमर्याद वाढला. राजकारणातील 'माया' हीच या आकर्षणामागील प्रमुख आदर्श, प्रोत्साहन, प्रेरणा होय. सरकारी आकडेवारीला कधीच न दिसणारी परंतु प्रत्यक्षात मात्र नाक्यानाक्यावर जागतिक समस्यांवर बाता करत बसलेली बेरोजगारी ही या क्षेत्राचे विशेष बळ.

राजकीय प्रसारासाठी स्वीकारल्या गेलेल्या मायक्रो-मॅनेजमेंटला अगदी घराघरात घुसून आपले अस्तित्व दाखवून देणे अपरिहार्य ठरत आहे. त्यासाठी त्या शेवटच्या स्तरावर आपले 'फुट सोल्जर्स' ठाण मांडून बसलेले असणे आवश्यक झाल्याकारणाने, राजकीय पक्ष आता वेळचवेळ असणाऱ्या गल्लीगल्लीतल्या उत्साही तरुणांना पक्षाचा झेंडा नाचवण्यासाठी दाणे टाकत असतात. साहेबाचा माणूस म्हणून होणारी ओळख आणि त्या जोरावर तेथील चार घरांमध्ये करता येणारा फुकटचा रूबाब हा त्यांना मग इतर साऱ्यापेक्षा भारी वाटू लागतो.

पद नाही पत नाही पण स्वत:च स्वत:चा बॅनर बनवून त्यावर स्वत:च्या फोटो शेजारी अगदी वरपर्यंतच्या नेत्यांचे फोटो लावून स्वत:ची हवा निर्माण करणे, त्याला जग जिंकल्याची अनुभूती देऊन जाते. राजकारणच धंदा राजकारणच नोकरी म्हणजे राजकारणाच्या माध्यमातून आणि समाजकारणाच्या नावाखाली पैसा काढून आपली उपजीविका चालवणे, हा आता व्यवसाय झाला आहे. यामुळेच हे क्षेत्र अप्रत्यक्षपणे आज आपल्या देशातील सर्वाधिक 'रोजगार' देणारे ठरले आहे. पण याच्या दुष्परिणामांची व्याप्तीदेखिल तितकीच अफाट असल्याने, यातून चांगले होण्याऐवजी वाईटच अधिक होत आहे.

प्रतिभा, विद्वत्ता, सुसंस्कार यातून निर्माण झालेला आदर आणि या अशा आदर्श नेतृत्वाखाली कार्य करण्याचा लोकांचा आग्रह, ही पूर्वीच्या राजकीय नेतेगिरीची ओळख होती. परंतु आज मात्र दहशत व पैशाची ताकद या दोन गोष्टीच राजकीय यशाची पालखी उचलताना दिसतात. दहशत, पैसा, राजकीय यश यांचे संयोजन परस्परावलंबन आज इतके घट्ट घनिष्ठ झाले आहे की एकाविना दुसरा शक्य नाही अशी आजची परिस्थिती आहे. दहशतीच्या बाहूंत गुन्ह्यांचे अलंकार असतात आणि सहज मिळणाऱ्या अमर्याद पैशांना भ्रष्टाचाराचा गंध असतो. राजकीय यशासाठीच्या शर्यतीत जो याचा अतिरेक करतो तो अधिक पात्र ठरतो, ही आजची दुर्दैवी शोकांतिका आहे.

पूर्वी हे सारे एका विशिष्ट वरच्या स्तरावरच अधिक होत होते आणि त्यामुळे बहुतांश समाज हा या सगळ्या अनितीपासून दूर असे, ज्यामुळे हे दुर्गुण खाली सर्वसामान्य स्तरावर झिरपेपर्यंत विरळ होत. याच कारणांमुळे गेल्या दोन दशकांपूर्वीपर्यंत तरी अभ्यास मेहनत हीच यशाची गुरुकिल्ली मानली जात असे. परंतु, बिनकामाचा ईझीमनी मिळवून देणारे राजकारण हा आज एक प्रतिष्ठित पर्याय उपलब्ध झाला असल्याकारणाने आजचा तरूण मोठ्या संख्येने या दुनियादारीत गुरफटला जात आहे. या सगळ्या गर्दीतून फक्त काही खास जणांच्याच गळ्यात प्रतिष्ठित पदांची माळ पडते.

उरलेल्या बहुतेकांच्या तोंडाला केवळ निर्थक पदांची पानं पुसली जातात. हा शेवटचा पदाधिकारी कार्यकर्ता स्तर कधीच पूर्ण न केल्या जाणाऱ्या आश्वासनांवर आशेवर टिकवला जातो. त्याशिवाय त्याला त्याच्या चार पावलांच्या कार्यक्षेत्रात इकडे तिकडे तोंड मारून भ्रष्टाचाराने पैसे मिळविण्याची मुभा संरक्षण दिले जाते. मतदारसंघ राखण्यासाठी कार्यकर्ते सोबत टिकविण्यासाठी पैसा लागतो आणि त्यासाठी मोठे नेते मोठे हात मारतात तर याचेच अनुकरण करणारा तळाचा पदाधिकारी मग चिरीमिरीतून का होईना पण स्वत:चा खिसा जड ठेवण्याचा खटाटोप करत असतो. भ्रष्टाचार आज 'कॅन्सर' प्रमाणे पसरलेला दिसतो, त्याचे एक प्रमुख कारण व स्रोत हे होय.

पक्ष प्रसारासाठी सर्वच पक्ष ज्या आक्रमकतेने संघटन बांधणी करताहेत ते पाहता, या खालच्या शेवटच्या स्तरावर राजकारणाचा अगदी चिखल झाला आहे. कुणाचा पाय कुठे आणि कशात, काही कळत नाही. प्रत्येक गल्लीत डझनभर पक्षांचे कार्यकर्ते पदाधिकारी जर असतील तर तेथील सर्वसामान्य रहिवासी मतदाराची किती ओढाताण/मज्जा होत असावी याचा विचार करा! प्रत्येकजण प्रत्येकाला आपल्या बाजूस खेचण्याच्या कसोशीने प्रयत्न करत असतो. यातून होणारे समज गैरसमज, रुसवे फुगवे, राग लोभ यांमुळे समाज म्हणून आवश्यक असणारे एकजुटीचे खेळीमेळीचे वातावरण बिघडते.

घराघरात पक्ष शिरतो आणि सोबत शिरते राजकारण. लोक याआधी पक्षापक्षांतील मतभेदांचा इतका वैयक्तिक बाऊ करत नसत. पण आता तसे होताना जाणवत आहे. आज प्रत्येक नागरिक हा या पक्षाचा मतदार/त्या पक्षाचा समर्थक म्हणुनही ओळखला जातो आणि त्यातून त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि त्याच्याशी संवादाची पद्धत बदलत आहे. आज राजकारण केवळ राजकारण्यांपर्यंत सीमित राहिलेले नाही तर प्रसारमाध्यमांकडून त्याला दिल्या जात असलेल्या अवाजवी, निर्थक, निरंतर महत्त्वामुळे ते निर्लज्ज व फाजीलपणे प्रत्येकाचे मन दुषित करण्याचे काम करत आहे. पक्षापक्षांतील चढाओढीत समाजात दुही निर्माण होत आहे. मारामारी, खुन, बदनामीची कटकारस्थाने वगैरेंत झालेली वाढ ही याचीच परिणती होय.

पूर्वी एक विभाग म्हणुन तेथील सर्वांचा एकच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी वगैरेचा उत्सव साजरा व्हायचा. परंतु आता तसे राहिलेले नाही. प्रत्येक पक्षाचा आपला वेगळा कार्यक्रम साजरा होतो. सणोत्सवांमध्ये महानगरांत आज प्रत्येक दहा पावलांवर एक मंडप दिसणार. त्या प्रत्येकाच्या वेगळ्या झेंड्याखाली त्यांची वेगळी सजावट रोषणाई धांगडधिंगा पहायला मिळतो. यांची बॅनरबाजी इतकी की देशाची संपूर्ण गरिबी त्यात झाकता येईल.

या सगळ्यात सरस ठरण्यासाठी चालणारी स्पर्धा मग जाणीवपूर्वक वा अनावधानाने संस्कार संस्कृती परंपरेची अक्षरश: वाताहात करत आहे. 'काही तरी वेगळे इतरांहून भारी' करून दाखवायच्या नादात आज असभ्यपणाचा, अश्लीलतेचा कळस गाठला जात आहे आणि या सगळ्या गोष्टी राजकीय पक्षांच्या व्यासपीठावरून आणि त्यांच्या आश्रयाखाली होत आहेत हे कोणीही नाकारणार नाही. धर्म धर्म करत, हे अधर्म करत आहेत. समाजाची विचारसरणी बिघडवत आहेत. कशासठी? सत्तेसाठी आणि त्यातून भ्रष्टाचाराच्या खोऱ्याने ओढता येणाऱ्या अपरंपार पैशांसाठी.

विकसित देशांतील नागरिक हे तेथील राजकीय परिस्थितीशी पूर्णपणे अवगत असतात. सरकार प्रशासन त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडत असते आणि नागरिक आपल्या कर्तव्यांमध्ये चुकणार नाही, याबाबत दक्षता बाळगतात. देशवासी स्वत:च्या प्रगतीतून राष्ट्र विकास घडवत असतात आणि लोकांनी त्यांची स्वप्ने पूर्ण करावीत यासाठी सरकार आवश्यक त्या सेवा सुविधा सहाय्य पुरवत असते. तिथेदेखिल निवडणुका होतात. राजकीय चुरस रंगते परंतु आपल्यासारखा घराघरात शिरून माथी भडकवण्याचा लोचटपणा तिथे होत असल्याचे कधी ऐकू येत नाही. राजकीय पक्षांच्या नादी लागून इथले तरुण घोषणाबाजी बॅनरबाजी टाईमपासमध्ये आपले तारुण्य हरवून बसवत आहेत आणि जेव्हा चूक लक्षात येते तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

आज कोणत्या मोठ्या नेत्याची मुले वर्गणी काढताना, खुर्च्या मांडताना, झेंडे लावताना दिसतात? इतरांची पोरे वापरायची आणि स्वत:ची राखायची, ही विचारसरणी इथल्या राजकीय मानसिकतेत मुरलेली आहे. मोठे पद निवडणुकीचे तिकीट प्रतिष्ठित सन्मान हे नेत्याच्या मुलांना घरच्यांनाच मिळते. कार्यकर्त्याला वडापाव व कटिंग चाय आणि निवडणुकीच्या वेळी रायता बिर्याणी दिली जाते. त्यापलीकडे मिळाली तर हमालीची पदे मिळतात, जी आयुष्यभर पोकळ मोठेपणात अडकवून ठेवतात.

भविष्यात कामी न येणाऱ्या या असल्या बेकार दिखाऊपणात आज अनेक तरूण आपला उमेदीचा काळ घालवून बघताहेत. हे पाप आजच्या राज्यकर्त्यांचे राजकारण्यांचे. हे जेवढे पसरत आहेत तेवढा हा समाज बरबाद होत आहे. यांच्यापासून स्वता सावध राहणे व इतरांना सावध करणे अत्यावश्यक आहे. आपल्या घरापासून वस्तीपासून फूट पाडणाऱ्या राजकारणाला व सामाजिक स्वास्थ्य बिघडवणाऱ्या नेतागिरीचे मायक्रो अवतार दूर ठेवणे गरजेचे आहे.

**-अजित कवटकर**

## त-ड-का

### सुट्टी वर्तमानपत्राची..!

प्रातकाली वर्तमानपत्र
गेटजवळ येऊन पडते
जगी कुठे काय घडले
इंतभूत वार्ता आम्हा
मिळते.
चहासोबत बातम्या
आम्ही चघळतो
सुटी असली पेपरला
की हिरमोड होता!
विविध प्रकारची स्तंभ
आमचे ज्ञान करती
अद्यावत
म्हणून वर्तमान पत्राविना
वाचकांना नाही बरे
करमत!



**प्रा. अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

## हातात हात... विश्वासाचा, आपुलकीचा आणि विकासाचा!

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि आमदार प्रतापदादा अडसड यांचे नाते म्हणजे केवळ राजकारणातील दोन व्यक्तींमधील संबंध नव्हेत; तर विश्वास, आपुलकी, आदर आणि मार्गदर्शनाची एक सुंदर परंपरा आहे.

अमरावती जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट आमदार प्रतापदादा अडसड यांनी घेतली. यावेळी दोघांमध्ये झालेल्या चर्चेचे छायाचित्र अनेक गोष्टी शब्दांविना सांगून जाते. मुख्यमंत्र्यांनी प्रतापदादांचा हात हातात घेतलेला हा क्षण केवळ एका बैठकीचा क्षण नाही; तो विश्वासाच्या नात्याचा जिवंत भाव आहे. प्रतापदादा अडसड यांच्यासाठी देवेंद्रजी केवळ राज्याचे मुख्यमंत्री नाहीत, तर मार्गदर्शक, आधार आणि मोठ्या भावाच्या भूमिकेत उभे राहणारे नेतृत्व आहेत. तर देवेंद्रजींसाठी प्रतापदादा हे केवळ एक आमदार नाहीत; आपल्या विचारांशी, कार्याशी आणि जनतेच्या प्रश्नांशी जोडलेला विश्वासू सहकारी आहेत, अशी भावना त्यांच्या राजकीय सहवासातून अनेकदा व्यक्त होताना दिसते.

**दोन पिढ्यांची मैत्री...**

एका नात्याची पुढची पिढी या नात्याची मुळे आजची नाहीत. एकीकडे स्व. गंगाधरराव फडणवीस आणि दुसरीकडे आदरणीय अरुणभाऊ अडसड विदर्भाच्या राजकारणात कार्यकर्त्यांची जडणघडण, संघटन आणि सार्वजनिक जीवनात योगदान देणाऱ्या या दोन ज्येष्ठ नेतृत्वांचा परस्पर सहवास होता. त्या पिढीने जपलेली मैत्री, विश्वास आणि वैचारिक जवळीक पुढच्या पिढीतही वेगळ्या रूपाने पुढे आलेली दिसते. म्हणूनच आज देवेंद्रजी आणि प्रतापदादा एकत्र दिसले की, अनेक जुन्या कार्यकर्त्यांना त्या जुन्या नात्यांची आठवण होते. काळ बदलला, जबाबदाऱ्या बदलल्या, राजकारणाची व्याप्ती बदलली; पण माणसांमधील विश्वासाचा धागा मात्र कायम राहिला, अशी भावना त्यांच्या सहकाऱ्यांकडून आज व्यक्त केली जाते आहे.

**'माझा लहान भाऊ' ही केवळ हाक नाही, तर आपुलकीची भावना...**

प्रतापदादा अडसड यांना प्रेमाने 'माझा लहान भाऊ' म्हणून संबोधले जाणे ही समर्थकांच्या दृष्टीने विशेष जिव्हाळ्याची बाब आहे. कारण राजकारणात पदे येतात-जातात; परंतु विश्वासाचे नाते सहज निर्माण होत नाही. प्रतापदादा मतदारसंघातील प्रश्न घेऊन मुख्यमंत्र्यांकडे जातात, तेव्हा ते केवळ राजकीय मागणी घेऊन जात नाहीत, तर आपल्या भागातील जनतेचा आवाज घेऊन जातात. आणि देवेंद्रजी त्या प्रश्नांकडे लक्षपूर्वक पाहतात, चर्चा करतात आणि प्रशासनाच्या माध्यमातून त्यावर कार्यवाही करण्याचा प्रयत्न करतात, यातून लोकप्रतिनिधी आणि राज्य नेतृत्व यांच्यातील समन्वयाचे चित्र दिसते.

**विकासासाठी आग्रह आणि नेतृत्वाचा आधार..**

प्रतापदादांच्या राजकीय कार्यपद्धतीत मतदारसंघातील विकासकामे, शेतकरी आणि स्थानिक प्रश्न यांना महत्त्व दिले जाते, या प्रश्नांसाठी राज्याच्या नेतृत्वाशी सातत्याने संवाद साधण्याची त्यांची पद्धत आहे. विकासकामांसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय पाठपुराव्यात देवेंद्रजींचे मार्गदर्शन आणि सहकार्य त्यांना सातत्याने मिळाले आहे. याच नात्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे 'शब्दाला किंमत' प्रतापदादा एखादा प्रश्न घेऊन देवेंद्रजींकडे गेले की त्याकडे आपुलकीने आणि गांभीर्याने पाहिले जाते, त्यामुळेच दोघांमधील संबंधांकडे केवळ राजकीय समीकरण म्हणून न पाहता विश्वास आणि संवादाचे नाते म्हणून पाहिले जाते.

आजचा हातात हात घेतलेला तो क्षण...

अमरावती विमानतळावरील हा प्रसंग म्हणूनच विशेष ठरतो. समोर राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांच्यासमोर मतदारसंघातील प्रश्न घेऊन उभे असलेले आमदार प्रतापदादा अडसड. पण त्या क्षणी दिसते ती केवळ औपचारिक राजकीय भेट नाही. जनतेच्या प्रश्नांसाठी संवादाचे आणि सहकार्याचे पूल मजबूत असणे महत्त्वाचे असते. देवेंद्रजी आणि प्रतापदादा यांच्या सहवासातील हा क्षण त्या संवादाचे प्रतीक म्हणून पाहता येतो.

नातं जुनं... विश्वास नवा...
आणि ध्येय एकच — विकास!

**- वैभव देशमुख**




## करपलेली शेती, हरपलेली संवेदना



दुष्काळाची व्याख्या कागदावर ठरते; त्याच्या झळा मात्र शेतकऱ्याच्या शेतात जाणवतात. बैठकांचे सत्र, व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना सूचना आणि भविष्यातील मदतीच्या पॅकेजची आश्वासने यामुळे शेतकऱ्यांच्या आजच्या अडचणी दूर होणार नाहीत. उभी पिके करपल्यानंतर मदत मिळणार असेल तर त्या मदतीचा उपयोग किती ? खरीप हंगामातून हातात काहीच पडणार नाही आणि त्यामुळे रब्बीच्या पेरणीसाठी भांडवलही उरणार नाही. म्हणून मदत आत्ताच हवी.

मोसमी वारे केवळ पावसाचे ढग घेऊन येत नाहीत; ते शेतकऱ्यांसाठी स्वप्नेही घेऊन येतात. दरवर्षी नव्याने पाहिली जाणारी आणि अनेकदा अपूर्णच राहणारी स्वप्ने. यंदा तरी शेतीतून चार पैसे अधिक मिळावेत, कर्जाचा डोंगर काहीसा हलका व्हावा, मुलांचे शिक्षण-लग्न यांसारख्या जबाबदाऱ्या पार पडाव्यात, डोक्यावर हक्काचे आणि चांगले छप्पर उभे राहावे, अशी मनोराज्ये शेतकरी रचत असतो. पण निसर्गाचा लहरीपणा आणि व्यवस्थेची उदासीनता यांचा मेळ बसला की, मनात मांडे आणि पदरात धोंडे, अशीच अवस्था त्याच्या वाट्याला येते.

यंदा एल निनोमुळे सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमानाची शक्यता वर्तवण्यात आली होती. जून कोरडा गेला. जुलैमध्ये मात्र चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या. सालाबादप्रमाणे पेरणी झाली. बियाणे, खते, खुरपणी, कीटकनाशके यांवर खर्च झाला. या खर्चासाठी अनेकांनी कर्ज काढले. मात्र ऑगस्टपासून पावसाने ओढ दिली. तापमान वाढले आणि फुलोऱ्यात येतानाच पिके करपू लागली. फुले गळाली. अनेक भागांत सोयाबीनला शेंगाच लागल्या नाहीत. बोंडे धरण्यापूर्वीच कापूस सुकू लागला. आता पाऊस पडला तरी त्याचा पिकांना फारसा फायदा होईल, अशी स्थिती उरलेली नाही.

ज्या भागांत तुलनेने चांगला पाऊस झाला, तिथेही उत्पादकता सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. नफा तर दूरच; केलेला उत्पादनखर्चही निघणे कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी कठीण झाले आहे. परिणामी यंदाही शेतकरी कर्जाच्या विळख्यात अधिक अडकण्याची शक्यता आहे. मागील वर्षी खरीप पिकांच्या काढणीच्या वेळी अतिवष्टीने हातातोंडाशी आलेले पीक हिरावून घेतले. आता त्याच भागात पाण्याअभावी पिके करपू लागली आहेत. आधीच नैराश्याच्या छायेत असलेल्या ग्रामीण भागात शेतकरी आत्महत्यांचा धोका त्यामुळे अधिक गंभीर झाला आहे.

कापूस, सोयाबीन, तूर, उडीद, मका, ऊस आणि मूग ही राज्यातील खरीप हंगामातील प्रमुख पिके. कमी-अधिक प्रमाणात या सर्वच पिकांना पावसाच्या तुटीचा फटका बसला आहे. राज्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा १७ टक्के कमी पाऊस झाला आहे. निम्म्याहून अधिक जिल्ह्यांमध्ये ही तूट ३० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. सोलापूर आणि बीडमध्ये तर सरासरीपेक्षा ५० टक्क्यांहून कमी पाऊस झाला आहे. पण या आकडेवारीतून ग्रामीण महाराष्ट्राचे खरे चित्र समोर येत नाही. जुलैमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने हंगामाची एकूण सरासरी तुलनेने समाधानकारक दिसते. प्रत्यक्षात अल्प काळात झालेल्या या पावसामुळे हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढीच धरणे भरली. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक धरणांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत कमी पाणीसाठा आहे. हा साठा प्रामुख्याने पिण्याच्या पाण्यासाठी राखून ठेवावा लागणार आहे. अत्यल्प पावसामुळे भूजलपातळीतही अपेक्षित वाढ झालेली नाही. सप्टेंबरमध्येच अनेक विहिरींचे तळ दिसू लागणे हे आगामी संकटाचे गंभीर संकेत आहेत. खरीप हंगामातील पिके हातातून गेली आहेत.

मान्सूनचा हंगाम अद्याप संपलेला नसला तरी काही गावांत आतापासूनच टँकरने पिण्याचे पाणी पुरवावे लागत आहे. आगामी संकटाची तीव्रता समजून घेण्यासाठी एवढेच पुरेसे आहे. आत्तापर्यंत आकाशाकडे टक लावून पाहणारा शेतकरी आता मायबाप सरकारकडे आशेने पाहत आहे. दुष्काळाच्या झळा जाणवू लागल्या असतानाही त्याचे पुरेसे प्रतिबिंब सार्वजनिक चर्चेत दिसत नाही. पुणे, नाशिक आणि मुंबई परिसरात तुलनेने चांगला पाऊस झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रात परिस्थिती आलबेल असल्याचा समज निर्माण झाला असावा. प्रसारमाध्यमांच्या प्राधान्यक्रमांवरही प्रश्न उपस्थित होतात. ग्रामीण भागातील करपणाऱ्या शेतीपेक्षा शहरी भागातील गणेशोत्सवाला अधिक प्रसिद्धी मिळत असेल, तर राज्यासमोरील वास्तव झाकोळले जाणे स्वाभाविक आहे.

प्रशासकीय पातळीवरही परिस्थितीचे गांभीर्य पुरेसे जाणवत नसल्याचे चित्र आहे. दुष्काळाचा सामना करण्यासाठी यंत्रणा हलवण्याऐवजी 'दुष्काळ आहे की दुष्काळसदृश परिस्थिती' यावर काथ्याकूट सुरू आहे. मुख्यमंत्री आणि मंत्र्यांनी बांधावर जाऊन शेतकऱ्यांना आधार देण्याची गरज असताना प्रशासन अहवाल आणि बैठकींच्या फेऱ्यांत अडकलेले दिसते. महसूल विभागाने दुष्काळग्रस्त जिल्ह्यांचा आढावा घेऊन अहवाल मागवला असला, तरी संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी कागदी घोडे पुरेसे नाहीत. उभी पिके करपल्यानंतर मदत मिळणार असेल तर त्या मदतीचा उपयोग किती? खरीप हंगामातून हातात काहीच पडणार नाही आणि त्यामुळे रब्बीच्या पेरणीसाठी भांडवलही उरणार नाही. म्हणून मदत आत्ताच हवी. पंचनाम्यांच्या प्रदीर्घ प्रक्रियेची किंवा ऑक्टोबरची वाट न पाहता हेक्टरी तातडीची मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा मार्ग सरकारने स्वीकारायला हवा. मदतीला होणारा विलंब हा पुढील हंगामाच्या अडचणीचे रूप घेऊ शकतो. दुष्काळी वर्षात पिके वाळली की शेतकऱ्यांची भिस्त दुग्धव्यवसायावर वाढते. जनावरे सांभाळून वर्ष काढण्याचा प्रयत्न केला जातो. पण चाऱ्याचा प्रश्न आतापासूनच गंभीर होत आहे.

सरकारने याच वर्षी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली आहे. मात्र सध्याच्या अस्मानी संकटाची तीव्रता लक्षात घेता बँका आणि सोसायट्यांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली तातडीने थांबवण्याची गरज आहे. संकटाच्या काळात वसुलीचा तगादा वाढला तर शेतकऱ्यांवरील आर्थिक आणि मानसिक ताण अधिक वाढेल. हा ताण वाढत गेला तर त्याचे परिणाम केवळ शेतकऱ्यापुरते मर्यादित राहणार नाहीत; ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा त्याने अधिक कमकुवत होईल. बळीराजा अन्नदाता आहे. पण आज तोच आपली शेती आणि संसार वाचवण्यासाठी झगडत असताना शासन यंत्रणा फायलींच्या मंजुरीत अडकलेली दिसत असेल, तर ही विसंगती दूर करणे आवश्यक आहे. निसर्गाच्या लहरीपणावर माणसाचे नियंत्रण नसते. मात्र निसर्गाने निर्माण केलेल्या संकटाची तीव्रता कमी करणे, संकटग्रस्त नागरिकांपर्यंत वेळीच मदत पोहोचवणे आणि पुढील संकटाची तयारी करणे, हे शासनाच्या हातात असते.

दुष्काळाची व्याख्या कागदावर ठरते; त्याच्या झळा मात्र शेतकऱ्याच्या शेतात जाणवतात. म्हणूनच यंदाच्या परिस्थितीकडे केवळ पावसाच्या आकडेवारीतून पाहण्याची वेळ संपली आहे. शेतात काय उरले आहे, विहिरीत किती पाणी आहे, जनावरांसाठी किती चारा आहे आणि पुढील पेरणीसाठी शेतकऱ्याच्या हातात किती पैसा आहे, या प्रश्नांतून दुष्काळ मोजण्याची वेळ आली आहे. नियम आवश्यक आहेत; पण नियमांमागे माणूस हरवता कामा नये. शेतकरी आज आश्वासनाची नव्हे, तर वेळेत मिळणाऱ्या आधाराची वाट पाहत आहे. शासनाने हा फरक ओळखून निर्णय घेतला, तर दुष्काळाचे संकट कदाचित टळणार नाही; पण त्याची झळ नक्कीच काही प्रमाणात कमी करता येईल.

**-राजेंद्र जाधव**

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# शब्द दिला अनब विसर्जनाच्या दिवशीच जीआर काढला!

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून शेतकऱ्यांना दिलासा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन संवाद साधला, त्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या आणि 'उद्या जीआर काढतो' असा शब्द दिला. त्यानंतर गणेश विसर्जनाच्या दिवशीही मंत्रालयीन पातळीवर हालचाली गतिमान ठेवत शासन निर्णय काढून दिलेला शब्द पूर्ण केल्याबद्दल आमदार रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. 'शब्दाला पक्के देवा भाऊ' अशा शब्दांत सावरकर यांनी मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेचे कौतुक केले.

वाशिम जिल्ह्यातील मानोरा आणि कारंजा परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी थेट संवाद साधला होता. या संवादादरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी आणि अपेक्षा मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या. त्यावर तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन देत फडणवीस यांनी 'उद्या जीआर काढतो', असा शब्द दिला होता. त्यानंतर संबंधित शासन निर्णय जारी झाल्याने दिलेल्या शब्दाची पूर्तता झाली असल्याचे सावरकर यांनी म्हटले आहे. गणेश विसर्जनाचा

### आमदार रणधीर सावरकरांकडून अभिनंदन



दिवस असल्याने राज्यभरात उत्सवाचे वातावरण असतानाही शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता मंत्रालयीन पातळीवर निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत निर्णय घेण्यासाठी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देऊन शासन निर्णय काढण्यात आल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याचा दावा सावरकर यांनी केला.

**'शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार'**

कर्जमाफी, वीजमाफी, शेतकऱ्यांच्या सातबारा कोरा करण्यासंदर्भातील निर्णय, महिलांच्या सबलीकरणासाठी घेतलेली पावले तसेच शेतकऱ्यांच्या पांदण रस्त्यांसारख्या प्रश्नांवर सरकारने निर्णय घेतल्याचे सावरकर यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात सरकार त्यांच्या पाठीशी असल्याचे विविध निर्णयांतून दिसून येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पश्चिम विदर्भातील शेतकरी नैसर्गिक संकटांसह विविध अडचणींना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत मदतीबाबत केवळ आश्वासन न देता शासन निर्णयाच्या माध्यमातून प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढाकार घेतल्याचे सावरकर यांनी म्हटले.

**'दिवाळी काळी होऊ नये' यासाठी निर्णय**

शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना आवश्यक त्या मदतीपासून वंचित राहावे लागू नये, तसेच आगामी दिवाळी त्यांच्या अडचणींमुळे काळी होऊ नये, यासाठी शासनाने पावले उचलली आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ चर्चेचा बाजार न करता प्रत्यक्ष निर्णय घेण्यात आल्याबद्दल आमदार रणधीर सावरकर आणि खासदार अनुप धोत्रे यांनी शासनाचे आभार मानले.

**उपमुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळाचे अभिनंदन**

या निर्णयासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच मंत्रिमंडळातील उपसमितीचे प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे आणि समितीच्या सर्व सदस्यांचेही आमदार रणधीर सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांनी अकोला, पश्चिम विदर्भ आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने अभिनंदन केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून दिलेला शब्द अल्पावधीत पूर्ण केल्याने शासनाच्या निर्णय प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण होत असल्याचे सावरकर यांनी म्हटले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने यापुढेही संवेदनशीलतेने निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यापुढेही संवेदनशीलतेने निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# पातूरमध्ये गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात; पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाला निरोप

### ३७ गणेश मंडळांची स्थापना; ११ मंडळांचा मिरवणुकीत सहभाग, पोलिसांचा चोख बंदोबस्त

■ प्रतिनिधी | पातूर ■

धार्मिक उत्साह, भक्तिभाव आणि सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवत पातूर शहरातील गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात आणि शांततेत पार पडली. यंदा शहरात ३७ गणेश मंडळांनी गणरायाची स्थापना केली होती. अनंत चतुर्दशीच्या दिवशी झालेल्या विसर्जन मिरवणुकीत ११ गणेश मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.

विसर्जन मिरवणुकीत बालाजी गणेश मंडळ, स्वराज गणेश मंडळ, जय बजरंग गणेश मंडळ, सोपीनाथ महाराज गणेश मंडळ, लोकमान्य टिळक गणेश मंडळ, खडकेश्वर गणेश मंडळ, श्री शिवाजी गणेश मंडळ, अभिनव मित्र मंडळ, महात्मा फुले गणेश मंडळ, शिवाजी महाराज गणेश मंडळ, जय भवानी गणेश मंडळ आणि हिंदुस्तानी गणेश मंडळ सहभागी झाले होते. पारंपरिक वाद्यांच्या तालावर गणेशभक्तांनी जल्लोष केला. खडकेश्वर महाराज गणेश मंडळ तसेच श्री सिदाजी महाराज व्यायामशाळेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या विविध प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तरुणाईचा उत्स्फूर्त आणि शिस्तबद्ध सहभाग हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले.

**सीसीटीव्ही, ड्रोनद्वारे मिरवणुकीवर नजर**

विसर्जन मिरवणूक शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावी, यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष नियोजन करण्यात आले होते. शहरातील प्रमुख



मार्गांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. त्यासोबतच ड्रोनच्या माध्यमातूनही मिरवणुकीवर लक्ष ठेवण्यात आले. संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**पोलिसांचा चोख बंदोबस्त**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ठाणेदार आर. टी. जाधव, पोलीस उपनिरीक्षक गोसावी, पोलीस उपनिरीक्षक अजय वानखडे, पोलीस उपनिरीक्षक दत्ता चव्हाण, जमादार दिघोडे, जमादार डोंगरे, पवार, माजी होमगार्ड तालुका समादेशक संगीता इंगळे यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बंदोबस्ताची जबाबदारी सांभाळली. होमगार्ड तसेच अतिरिक्त पोलिस कर्मचाऱ्यांचीही मदत घेण्यात आली.

पोलिसांचे नियोजन, गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा संयम आणि नागरिकांचे सहकार्य यामुळे विसर्जन मिरवणूक कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडली. भक्तिभावाने गणरायाला निरोप देताना पातूर शहरातील धार्मिक सलोखा आणि सामाजिक एकोप्याची परंपरा यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली.

# आदर्श महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर

■ प्रतिनिधी | अकोला ■

आदर्श महाविद्यालय अकोला येथील राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग व युवा कार्यक्रम तथा खेळ मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत केंद्र, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा पंधरवाडा व राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रक्षा डवरे होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून मेरा युवा भारत केंद्र, अकोला येथील लेखाधिकारी श्री. मदन घेघाटे उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. रोशन कोरडे, महिला कार्यक्रमाधिकारी प्रा. सुप्रिया पडगीलवार तसेच विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. रोहन बुंदेले यांची उपस्थिती होती. जिल्हा सामान्य रुग्णालय, अकोला येथील रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले. 'रक्तदान हेच जीवनदान' या सामाजिक संदेशातून सामाजिक बांधिलकी व सेवाभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**जाहीर सुचना**

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, दिपक उत्तम जवंजाळ रा. लासुरा ता. शेगाव व जि. बुलढाणा, यांनी खालील वर्णनाची मालमत्ता डीसीबी बँक लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे खामगाव न.पा., खामगाव ता. जि. बुलढाणा च्या हद्दीतील शे. स. क्र. १२१/१ चे वि. उपविभागीय अधिकारी खामगाव यांच्या फाईला वरील मह. प्र. क्र. एन. ए. पी. - ३४ / खामगाव / २६/१९८४-८५ आदेश दि. १५/०७/१९८५ नुसार पारित ले-आउट नकाशातील प्लॉट क्र. १०९-ब ज्याचे एकूण क्षेत्र. १४१ चौ.मी. असून ज्यास चातुर्सिमा : पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट क्र. १००, उत्तरेस : प्लॉट क्र. १०८, दक्षिणेस : प्लॉट क्र. १०९-अ.

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे दस्त क्र. ३०५२ दि ०३/०६/२०१५ व ६३५७ दि. १८/०८/२०११ रोजीचे मुळ खरेदीखत जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले / गहाळ झाले आहे. त्याकरीता पोलीस स्टेशन खामगाव, येथे दि. २६/०९/२०२६ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन १५ (पंधरा) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन डीसीबी बँक लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २६/०९/२०२५

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

**जाहीर नोटीस**

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे मोहन गुणवंतराव खेडकर, गुणवंतराव यशवंतराव खेडकर, वासुदेव यशवंतराव खेडकर व प्रतिभा मोहन खेडकर, रा. साई नगर, डाबकी रोड, अकोला, ता. व जि. अकोला हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा अकोला यांचेकडून रु. १७,००,०००/-(सतरा लाख रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन - अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतील, वार्ड क्र. B-१०, मौजे अकोला, प्रगणे अकोला, ता. व जि. अकोला येथील अकोला महानगरपालिका घर मालमत्ता क्र. २५०५, प्लॉट क्र. १९, सर्वे क्र. ५ सदर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ १०१.४८ चौ.मिटर म्हणजेच १०९२ चौ. फूट व त्यावरील बांधकामासहीत ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस – सर्विस लेन; पश्चिमेस – रस्ता; उत्तरेस – नवघरे यांचा प्लॉट क्र. १६ ; दक्षिणेस – कवरे यांचे प्लॉट क्रमांक १४ वरील घर या प्रकारे आहेत. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. २९/०८/२०२६.

**ॲड. सा. दा. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

**जाहीर नोटीस**

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे घनशाम मल्हारी अलाट व मंगला घनशाम अलाट, रा. वार्ड क्रमांक ४, शिवनी खदान, मलकापूर कृषी नगर, अकोला, ता. व जि. अकोला हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा अकोला यांचेकडून रु. ३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन – वार्ड क्र. D-१२, मौजे शिवनी, अकोला महानगरपालिका हद्दीचे आतील, प्रगणे अकोला, ता. व जि. अकोला येथील उत्तरेकडील भागाची अकोला महानगरपालिका मालमत्ता क्र. १३०८(नवीन), ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक २५८७ (नवीन) व ७५५ (जुना), गट क्रमांक १०५, प्लॉट क्र. २४(जुना), सदर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ ५४.८३ चौ.मिटर ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस – बेबी अढाव यांची जागा; पश्चिमेस – रस्ता; उत्तरेस – रस्ता; दक्षिणेस – शुभम अलोट यांची जागा या प्रकारे आहेत. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. २६/०९/२०२६.

**ॲड. सा. दा. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

# २५० रोपांच्या लागवडीसह तेल्हाऱ्यात स्वच्छता मोहीम

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

निसर्ग संवर्धनासाठी केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संदेश देत तेल्हारा तहसील कार्यालयाच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात आले. या अभियानांतर्गत तब्बल २५० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच दोन वर्षांपूर्वी 'स्वस्तिक पॅटर्न' अंतर्गत लावण्यात आलेल्या वृक्षांच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवून वृक्षसंवर्धनाचा जागर करण्यात आला.

तहसीलदार महेश रामगुंडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात



आले. या उपक्रमाची संकल्पना व नियोजन नायब तहसीलदार विकास राणे यांनी केले. यावेळी तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वृक्षारोपण करून त्याकडे दुर्लक्ष करण्याऐवजी लावलेल्या रोपट्यांची नियमित देखभाल करणे गरजेचे आहे. दोन वर्षांपूर्वी लावलेल्या वृक्षांच्या ठिकाणी स्वच्छता करून त्यांचे संवर्धन करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला. त्यामुळे 'झाडे

**सेवा संकल्प अभियानातून वृक्षसंवर्धनाचा संदेश; दोन वर्षांपूर्वी लावलेल्या वृक्षांचीही केली स्वच्छता**

लावा, झाडे जगवा' हा संदेश केवळ घोषणेत न राहता प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला. आज लावलेले रोपटे भविष्यात सावली देणारा वृक्ष बनतो. त्याचा लाभ मानवासोबतच पक्षी व पशुपक्ष्यांनाही होतो. त्यामुळे वृक्षलागवडीसोबतच वृक्षांचे संगोपन हीच खरी पर्यावरणसेवा असल्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला.


# 'मिशन महाग्राम'ला २०२९ पर्यंत मुदतवाढ

## ग्राम विकासासाठी प्रत्येक गावाला १० लाखांचा विशेष निधी!

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा सक्षम करून गावांचा शाश्वत आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान' (मिशन महाग्राम) या महत्त्वाकांक्षी अभियानाला २०२९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या अभियानांतर्गत निवडलेल्या प्रत्येक गावातील विकासात्मक कामांसाठी १० लाख रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली असून, यातून रोजगार निर्मिती, कौशल्य विकास व शासकीय योजनांचा स्थानिक पातळीवर लाभ देणे आदी कार्य होणार आहे.

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाच्या टप्पा-२ अंतर्गत 'मिशन महाग्राम'चा कालावधी २०२२–२०२५ असा मंजूर होता; तो आता वर्ष २०२९ पर्यंत वाढविण्यास मंत्रिपरिषदेने मान्यता दिली आहे. ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक



'मिशन महाग्राम'च्या माध्यमातून गावांचा सर्वांगीण शाश्वत विकास

परिवर्तनाला गती देण्यासाठी 'मिशन महाग्राम' राबविण्यात येते. पाणी, आरोग्य, स्वच्छता, पर्यावर, कृषी, कौशल्यविकास आणि डिजिटल् कनेक्टिव्हिटी या क्षेत्रांतील विकासाला अभियानातून प्राधान्य दिले जाते. या अभियानाचा भर हा पायाभूत सुविधांच्या निर्मितीसह गावातच रोजगार आणि उपजीविकेच्या संधी निर्माण करण्यावर आहे. या मिशन अंतर्गत कौशल्यविकास कार्यक्रम, कृषी उत्पादकतेत वाढ, महिला बचत गट आणि स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याचे प्रयत्न केले जातात. ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाची अंमलबजावणी शासन, खासगी क्षेत्र आणि सामाजिक संस्थांच्या सहभागातून केली जाते. विविध विकास उपक्रमांसाठी कॉर्पोरेट कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा (सीएसआर) वापर करण्याची तरतूदही अभियानात आहे. निवडलेल्या ग्रामपंचायतीमधील विकासकामांना गती देण्यासाठी समन्वय यंत्रणा कार्यरत असून नियुक्त ग्राम समन्वयकाकडे गावाचा विकास आराखडा तयार करणे, विविध विभागांमध्ये समन्वय साधने व कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. स्थानिक गरजांचा विचार करुन गावाचा सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करणे, उपलब्ध साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करणे आणि लोकसहभागातून दीर्घकालीन विकास साधने, हे अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यासोबतच पाणी, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेती आणि उपजीविकेच्या संधी वाढविण्यावर भर दिला जातो. स्थानिक साधनसंपत्तीचा प्रभावी वापर आणि लोकसहभागातून ग्रामीण भागाचे चित्र बदलण्यासाठी 'मिशन महाग्राम' हे एक प्रभावी माध्यम ठरत असून, या मुदतवाढीमुळे अकोल्यासह राज्यातील ग्रामीण भागाच्या विकासाला अधिक गतिशीलता मिळणार आहे.

# दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतील दहावी-बारावीची परीक्षा फी माफ करा

### मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष शत्रुघ्न बिडकर यांची शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र शासनाने राज्यातील काही जिल्हे व विभाग दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. या पार्श्वभूमीवर दुष्काळाची झळ सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेची फी माफ करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष शत्रुघ्न बिडकर यांनी केली आहे.

यासंदर्भात बिडकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे तसेच शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांना निवेदन दिले आहे. सध्या दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याचवेळी राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, त्याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे.

दुष्काळामुळे शेतीचे उत्पन्न घटले असताना विद्यार्थ्यांच्या परीक्षा



शुल्काचा अतिरिक्त आर्थिक भार पालकांवर पडत आहे. त्यामुळे शासनाने दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या जिल्ह्यांतील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची बोर्ड परीक्षा फी तातडीने माफ करावी, अशी मागणी बिडकर यांनी केली. शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय लागू करावा आणि दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या ग्रामीण भागातील पालकांना दिलासा द्यावा, असेही बिडकर यांनी सांगितले.

# स्वामी विवेकानंद शाळेत बाप्पाला भावपूर्ण निरोप

### विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; लेझीम, नृत्य आणि ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमला

■ प्रतिनिधी | अकोट ■

येथील स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये दहा दिवसांपासून भक्तिभावाने विराजमान असलेल्या गणरायाला उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात निरोप देण्यात आला. गणपती विसर्जनानिमित्त आयोजित मिरवणुकीत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. ढोल-ताशांचा निनाद, 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'चा जयघोष, लेझीम पथकाचे सादरीकरण आणि विद्यार्थ्यांच्या नृत्यामुळे शाळा परिसर जल्लोषात न्हाऊन निघाला.

विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे लेझीम पथक विशेष आकर्षण ठरले. तालबद्ध पावलांनी आणि उत्साहपूर्ण सादरीकरणाने विद्यार्थ्यांनी उपस्थितांची दाद मिळवली. यासोबतच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध नृत्यांनी मिरवणुकीत रंगत भरली. लहान विद्यार्थ्यांपासून मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला. गणरायाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत शाळेत भक्तिमय वातावरण होते. बाप्पाला निरोप देताना विद्यार्थ्यांनी शाळेची प्रगती, सुख-समृद्धी आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

दरम्यान, गणेशोत्सवानिमित्त शाळेच्या वतीने भंडारा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. विसर्जनानंतर विद्यार्थी, शिक्षक व उपस्थितांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. उत्सवाला सेवाभावाची जोड देत अन्नदानाचा संदेशही यानिमित्ताने देण्यात आला. या सोहळ्यास संस्थाध्यक्ष अशोकजी मंगलानी, शाळा समितीचे चेअरमन दिलीपजी चावडा, उपाध्यक्ष पुरुषोत्तमजी मुरकुटे, उपाध्यक्ष दिलीपजी अग्रवाल, सचिव प्रा. मोबीन शेख, खजिनदार मुरलीधरजी रामनानी आणि संचालक मेहुलजी नगदीया यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक हरीश पाचकवडे, पर्यवेक्षिका ममता तायडे, पर्यवेक्षक मुकुंद उकळकर, पर्यवेक्षिका रेश्मा रघुवंशी, स्वाती जोशी, भावना देशमुख व सपना दुबे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मिरवणुकीत शिस्तबद्ध सहभाग नोंदविला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भक्ती, शिस्त, एकता आणि सांस्कृतिक परंपरांचे संस्कार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. आनंद, उत्साह आणि भक्तिभावाच्या वातावरणात झालेला हा विसर्जन सोहळा अविस्मरणीय ठरला.



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# एलनिनोच्या पार्श्वभूमीवर काळजीपूर्वक कामे करा

## पालक सचिव मिलिंद म्हैसकर यांनी घेतला दुष्काळ परिस्थिती व विकासकामांचा आढावा

**वर्धा/ जनमाध्यम**

एलनिनोच्या प्रभावामुळे पावसामध्ये खंड व तुट दिसून येत आहे. कमी पावसामुळे कापूस, तूर व सोयाबीन पिकांची परिस्थिती बदलण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य परिस्थितीचा विचार करून प्रशासनाने काळजीपूर्वक व नियोजनबद्ध पद्धतीने काम करणे आवश्यक आहे, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव तथा पालक सचिव मिलिंद म्हैसकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित संभाव्य दुष्काळी परिस्थिती व जिल्ह्याच्या विविध विकासकामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, उपवनसंरक्षक हरवीर सिंह, अपर जिल्हाधिकारी संजय तेली, उपविभागीय अधिकारी कुश मोटवाणी, भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकारी शोभिका पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी राजू रणवीर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा आढावा घेताना कापूस, तूर व सोयाबीन या प्रमुख पिकांच्या बदलत्या परिस्थितीवर प्रशासनाने लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे श्री. म्हैसकर यांनी सांगितले. जिल्ह्यातील बहुतांश तालुके दुष्काळी तालुक्यांच्या ट्रिगर-१ (प्रथम काळ) मध्ये समाविष्ट असल्याने संबंधित



यंत्रणांनी परिस्थितीचा बारकाईने आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. सिंचन क्षमतेत वाढ करण्यासाठी सुरू असलेल्या विविध योजनांचा प्रभावीपणे पाठपुरावा करण्याचे निर्देश त्यांनी जलसंधारण विभागाला दिले. आरोग्य क्षेत्राचा आढावा घेताना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळवून देण्यावर भर देण्याचे त्यांनी सांगितले. हिंगणघाट येथील दोन रुग्णालये कार्यान्वित झाल्यानंतर तसेच सेवाग्राम, सावंगी आणि इतर वैद्यकीय संस्थांमुळे वर्धा जिल्हा वैद्यकीय सुविधांचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून विकसित होत आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये आयुष्मान योजनेचा प्रभावीपणे वापर वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सांगितले. बोर वन्यजीव अभयारण्याच्या विकासासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना गती देण्याची गरज आहे. ताडोबा व पेंच या व्याघ्र प्रकल्पांवरील पर्यटकांचा वाढता प्रवाह पाहता बोर व्याघ्र प्रकल्प पुढील महत्त्वाचे व्याघ्र व वन्यजीव पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना वनविभागाला दिल्या. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी जिल्ह्यातील विविध विकास प्रकल्प, कृषी, सिंचन, आरोग्य, वनविभागासह विविध क्षेत्रातील कामांची सविस्तर माहिती पालक सचिवांना दिली. बैठकीत जिल्ह्यातील कृषी, सिंचन, उद्योग, रोजगार, आरोग्य, वन, पायाभूत सुविधा तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांनी निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करून नागरिकांना योजनांचा प्रभावी लाभ मिळवून देण्यासाठी समन्वयाने काम करण्याचे निर्देश पालक सचिवांनी दिले.

# गणपती विसर्जन आटोपून परतताना भरधाव बोलेरोची दुचाकीला धडक

## १४ वर्षीय मुलगी गंभीर जखमी; दोघांवर उपचार सुरू

**सेलू/ जनमाध्यम**

गणपती बाप्पाला निरोप देऊन दुचाकीने घराकडे परतणाऱ्या भाविकांच्या दुचाकीला भरधाव मालवाहू बोलेरो पिकअपने जोरदार धडक दिल्याची घटना केळझर येथे घडली. या अपघातात १४ वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर सावंगी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिच्यासोबत असलेला एक जणही जखमी झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, केळझर येथील संतोष तुळशीराम मोरवाल वय ४५ आणि श्रेया राजेश बडेरे वय १४ हे दोघे सकाळी गावातील नाल्यावर गणपती विसर्जन करून दुचाकीने घराकडे परतत होते. सकाळी साडेनऊच्या सुमारास बेघर वस्तीतील जुनगड रोडवर जंगली वडगावच्या दिशेने येणाऱ्या बोलेरो पिकअप क्रमांक एमएच ३२ एजे ५०३९ ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडक एवढी भीषण होती की श्रेया सुमारे दहा फूट अंतरावर फेकली गेली. तिच्या डोक्याला आणि हाताला गंभीर दुखापत झाली. संतोष मोरवाल हेही जखमी झाले. अपघातानंतर




नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णवाहिकेने सेलू ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर श्रेयाची प्रकृती चिंताजनक असल्याने तिला पुढील उपचारासाठी सावंगी येथील रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, घटनेनंतर दोन्ही पक्षांत आपसी समझोता झाल्याची चर्चा असून, पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल झालेली नसल्याचे कळते.

# निवृत्तीनाथ सावरकर गुरुजी स्मृतिगंध सोहळा आज

**सेलू/ जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्याच्या शैक्षणिक आणि संगीत क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे ज्येष्ठ शिक्षक निवृत्तीनाथ सावरकर गुरुजी यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी स्मृतिगंध समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता माहेर शांती निवास, विकास चौक, सेलू येथे हा कार्यक्रम होणार आहे.



विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान आणि संस्कारांची रुजवणूक करून अनेक पिढ्या घडविणाऱ्या सावरकर गुरुजी यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्या प्रथम स्मृतीप्रित्यर्थ स्मृती ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली आहे. द्वितीय स्मृतिदिनानिमित्त मतिमंद मुले तसेच निराश्रित आणि अपंग वृद्धांना उपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात येणार आहे.

संत सयाजी महाराज अध्यक्षस्थानी राहणार असून प्रकाश यशवंत बापट, एड. मुरलीधर भुरे, प्रकाश येंडे, अतुल शेळके आणि मायाताई शेळके प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रा. सचिन सावरकर आणि एड. वैभव भुरे हे निमंत्रक आहेत. नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# नंदा नदीत पाणी नाही; विसर्जनाचीही अपुरी सोय

## कृत्रिम विसर्जन कुंडाच्या नावाखाली लोखंडी टाकी; सिंदीत नगरपरिषद प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

**सिंदी रेल्वे/ जनमाध्यम**

शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या नंदा नदीत यंदा पाणीसाठा अत्यल्प असतानाही गणेश विसर्जनासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून पुरेशी पर्यायी व्यवस्था करण्यात आली नाही. कृत्रिम विसर्जन कुंडाच्या नावाखाली केवळ लोखंडी टाकी उभारण्यात आल्याने गणेशभक्तांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ऐन विसर्जनाच्या दिवशी झालेली ही तोकडी व्यवस्था पाहता प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



नदीत पाणी कमी असल्याची माहिती प्रशासनाला आधीपासून असतानाही गणेशोत्सवापूर्वी कृत्रिम विसर्जन कुंड, निर्माल्य संकलन केंद्रे आणि नदीकाठ स्वच्छतेचे नियोजन करणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात पुरेशी व्यवस्था नसल्याने भाविकांची गैरसोय झाली. विसर्जनस्थळी मार्गदर्शनासाठी कर्मचारीही पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

गणेशमूर्तीसोबत निर्माल्य नदीत गेल्यास नदीच्या पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक विसर्जनासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे पर्यावरणप्रेमी नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, सिंदी रेल्वे ही पूर्वी कापसाची मोठी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होती. मात्र आज कृषी शेतमालाची बाजारपेठ लुप्त होत आहे. मोहन सुरकार यांनी बाजार समितीच्या बैठकीत शहराला गतवैभव मिळवून देण्यासाठी मास्टर प्लॅन आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. मात्र संचालक मंडळाकडून ठोस उत्तर मिळाले नाही. बाजारपेठ पुनर्जीवित न झाल्यास समिती केवळ नावापुरती उरेल, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

### खापरी-मुंगापूर शिवारात बिबट्याची दहशत

# कपाशीच्या शेतात शेतकऱ्यासमोर अचानक बिबट्या, आठ दिवसांत तिसरी घटना

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील खापरी-मुंगापूर शिवारात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कपाशीच्या शेतात काम करीत असताना रितिक प्रभाकर भवरे या २५ वर्षीय शेतकऱ्यासमोर अचानक बिबट्या आल्याची घटना घडली. प्रसंगावधान राखत भवरे यांनी आरडाओरड केल्याने बिबट्याने दाट पिकांच्या दिशेने धूम ठोकली.

गेल्या आठ ते दहा दिवसांतील बिबट्या दिसण्याची ही तिसरी घटना असल्याने परिसरातील शेतकरी दहशतीखाली आहेत. सध्या कपाशी वेचणी, कोळपणी आणि फवारणीची कामे सुरू आहेत. मात्र बिबट्याच्या भीतीने मजूर शेतात जाण्यास टाळाटाळ करीत आहेत. रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देण्यासाठी जाणेही शेतकऱ्यांनी बंद केले आहे.बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेता वनविभागाने शिवारात गस्त वाढवून तातडीने पिंजरा लावावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



# मानवाधिकार समितीच्या जिल्हाध्यक्षपदी आशिष सयांकार

**वर्धा-** महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय मानवाधिकार समितीच्या वर्धा जिल्हाध्यक्षपदी आशिष गुलाबराव सयांकार यांची नियुक्ती करण्यात आली. समितीचे महाराष्ट्र राज्य संपदा अधिकारी प्रदीप गिरडकर यांच्या हस्ते सयांकार यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. सामान्य नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची माहिती देणे तसेच अन्याय आणि भेदभावाविरोधात जनजागृती करणे, हे समितीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नागरिकांना कायदेशीर आणि प्रशासकीय मार्गांची माहिती देऊन त्यांच्या तक्रारी योग्य यंत्रणेकडे मांडण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. वर्धा जिल्ह्यात मानवाधिकार विषयक जनजागृती वाढविण्यासोबतच महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, कामगार आणि विविध घटकांच्या अधिकारांबाबत जनजागृती उपक्रम राबविण्याचा मानस सयांकार यांनी व्यक्त केला. नियुक्तीबद्दल समितीच्या पदाधिकाऱ्यांसह विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.




# कर्जाचे आमिष दाखवून म्युल खाते उघडले, सायबर फसवणुकीची रक्कम वळविणाऱ्या दोघांना अटक

## वर्धा सायबर पोलिसांची कारवाई; महिलांच्या नावाने बँक खाते आणि सिमकार्डचा गैरवापर

**वर्धा/ जनमाध्यम**

कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून नागरिकांच्या नावाने बँक खाती उघडणे आणि त्या खात्यांचा वापर सायबर फसवणुकीतून मिळालेली रक्कम वळविण्यासाठी करणाऱ्या रॅकेटचा वर्धा सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी वर्ध्यातील नवीन सुरेश आहुजा वय ४२ आणि आशिष उर्फ आशू श्यामकुमार दुब्बानी वय २८ या दोघांना अटक केली आहे. आरोपींकडून नागरिकांच्या बँक खात्यांचा आणि सिमकार्डचा गैरवापर करण्यात येत असल्याचे तपासात समोर आले आहे.

महाराष्ट्र सायबर आणि १४० म्हणजेच इंडियन सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटरकडून वर्धा पोलिसांना संशयास्पद बँक खात्यांची यादी प्राप्त झाली होती. या यादीच्या आधारे वर्धा सायबर पोलिसांनी अकोला अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या वर्धा शाखेतील काही खात्यांची चौकशी सुरू केली. या खात्यांमधून संशयास्पद आर्थिक व्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले. अधिक तपास केल्यानंतर संबंधित खात्यांचा वापर सायबर फसवणुकीतील रक्कम जमा करण्यासाठी आणि पुढे वळविण्यासाठी केला जात असल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांच्या तपासानुसार आरोपींनी इतर साथीदारांच्या संगनमताने सर्वसामान्य नागरिकांना कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडलेल्या नागरिकांच्या नावाने बँक खाती उघडण्यात आली. त्यानंतर या खात्यांचा ताबा घेऊन सायबर फसवणुकीतून मिळणारी रक्कम त्यामध्ये जमा केली जात होती. जमा झालेली रक्कम इतर बँक खात्यांमध्ये वळविण्यासोबतच काही रक्कम रोख स्वरूपात काढली जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

या प्रकरणात महिलांच्या नावाने खाती उघडल्याचा प्रकारही समोर आला आहे. आरोपी आशिष उर्फ आशू दुब्बानी हा सालोड परिसरातील महिलांच्या नावाने बेकायदेशीररीत्या सिमकार्ड तयार करून देत असल्याचे तपासात आढळले. तर आरोपी नवीन आहुजा याने संबंधित महिलांच्या नावाने बँक खाती उघडून घेतली. या खात्यांचा वापर फसवणुकीतून मिळालेली रक्कम वळविण्यासाठी करण्यात आल्याचा पोलिसांचा तपास आहे.

संशयास्पद खात्यांमधील व्यवहारांची माहिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे सायबर पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली. याप्रकरणी सायबर पोलीस ठाणे वर्धा येथे अपराध क्रमांक १७/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ६१(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का आणि आतापर्यंत किती नागरिकांची फसवणूक झाली आहे याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत पाटील यांच्या दिशानिर्देशात करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक आयेशा मुल्ला, पोलीस हवालदार वैभव कट्रोजवार, अमित शुक्ला, ओमप्रकाश कोकोडे, रणजित जाधव, पोलीस शिपाई पवन झाडे, महिला पोलीस शिपाई लेखा राठोड, आरती पारीसे तसेच सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाईत सहभाग घेतला.

### खाते देणे ठरू शकते धोकादायक

कर्ज मिळवून देणे, कमिशन देणे किंवा अन्य आर्थिक आमिष दाखवून कोणालाही आपले बँक खाते वापरण्यास देऊ नये. बँक खाते, एटीएम कार्ड, ओटीपी, सिमकार्ड किंवा आर्थिक व्यवहारांचे अधिकार अनोळखी व्यक्तीला दिल्यास त्या खात्याचा वापर सायबर गुन्ह्यांसाठी होऊ शकतो. अशा प्रकारे खाते वापरले गेल्यास खातेदारही पोलिसांच्या चौकशीच्या कक्षेत येऊ शकतो. नागरिकांनी कोणत्याही संशयास्पद आर्थिक व्यवहारापासून सावध राहावे. फसवणूक झाल्यास विलंब न करता १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा जवळच्या सायबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी.

# माहिती अधिकार दिनानिमित्त देवळीत जनजागृती अभियान

**देवळी/ जनमाध्यम**

माहितीचा अधिकार हा नागरिकांच्या सशक्तीकरणासाठी महत्त्वाचा कायदा असून, २८ सप्टेंबर माहिती अधिकार दिनानिमित्त देवळीत जनजागृती अभियान राबविण्यात आले. जनमाहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने शहरातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांना निवेदन देऊन माहिती अधिकाराबाबत जनजागृती कार्यक्रम घेण्याची मागणी करण्यात आली. महासंघाचे देवळी संघटक विशाल नगराळे व मिलिंद ब्राह्मणकर यांच्या नेतृत्वात ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी आनंद घोडे, अखिलेश गावंडे, पांडुरंग डफरे, निलेश वाघ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.ग्रामीण रुग्णालय, पंचायत समिती, नगरपरिषद, तहसील कार्यालय, अन्न व नागरी पुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण व पोलीस ठाणे आदी ठिकाणी नागरिकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करावा, अशी मागणी करण्यात आली. माहिती अधिकार अर्ज प्रक्रिया, कलम ४ अंतर्गत स्वयंस्फूर्त माहिती, शासकीय योजना व विकासकामांची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध करून द्यावी, अशी भूमिका मांडली.

# आर्वी उपजिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक दंत उपचार मोफत

**आर्वी/ जनमाध्यम**

उपजिल्हा रुग्णालय, आर्वी येथील दंत विभागात अत्याधुनिक पद्धतीने एका दंतरुग्णावर यशस्वी उपचार करण्यात आला. डॉ. ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या उपचारामुळे रुग्णाला मोठा दिलासा मिळाला. रुग्णाच्या दाताचे मूळ पूर्णपणे विकसित झालेले नव्हते. त्यामुळे नेहमीच्या पद्धतीने रूट कॅनॉल उपचार करणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत तयार न झालेल्या मुळाच्या टोकाशी एमटीए म्हणजेच मिनरल ट्रायऑक्साइड ॲग्रिगेट या विशेष दंत साहित्याचा वापर करून एपिकल बॅरिअर तयार करण्यात आला. त्यानंतर रूट कॅनॉल उपचार पूर्ण करण्यात आला. खासगी उपचारासाठी साधारणतः ८ ते १० हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक खर्च येऊ शकतो. मात्र, उपजिल्हा रुग्णालयात हा उपचार रुग्णासाठी पूर्णपणे मोफत करण्यात आला. विशेष म्हणजे आवश्यक एमटीए साहित्य डॉ. ढगे यांनी स्वतःच्या खर्चाने उपलब्ध करून दिले. शासकीय रुग्णालयात अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून सर्वसामान्यांना मोफत आरोग्यसेवा देण्याच्या या उपक्रमाचे कौतुक होत असून, रुग्णाला मिळालेल्या मदतीबद्दल कर्मचाऱ्यांनी डॉ. ढगे यांचे अभिनंदन केले.

### सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित अवयवदान शिबिरास जिल्हाभर प्रतिसाद

# मृत्यूनंतरही गरजूंच्या आयुष्यात आनंद पेरण्याचा संकल्प

**वर्धा/ जनमाध्यम**

सेवा संकल्प अभियानांतर्गत आज जिल्हाभर एकाचवेळी अवयवदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. जिल्हा व तालुकास्तरावर आयोजित या शिबिरात शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित शिबिरात जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी ऑनलाईन नोंदणी करून अवयवदानाचे संमतीपत्र भरले. जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी सोमण यांच्या उपस्थितीत शिबिर घेण्यात आले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्याहस्ते अवयवदान शिबिराचा जिल्हास्तरीय शुभारंभ झाला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी राजू रणवीर, जिल्हा नियोजन अधिकारी ज्ञानेश्वर खडतकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजसिंह पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नलिनी विखे, सामान्य रुग्णालयातील बाह्य संपर्क अधिकारी डॉ.विद्या पवार, नेत्र समुपदेशक प्रफुल्ल काकडे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी स्वत: ऑनलाईन संमतीपत्र भरून अवयवदानाचा संकल्प केला. यावेळी अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांनी देखील स्वयंस्फूर्तीने पुढे येत ऑनलाईन तर काहींनी ऑफलाईन नोंदणी केली. ऑफलाईन नोंदणी केलेल्यांचे अर्ज ऑनलाईन भरल्या जाणार आहे. जिल्हा मुख्यालयासह उपविभाग व तालुका स्तरावर देखील शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात जिल्हा रुग्णालय, सर्व उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच विविध शासकीय कार्यालयांनी स्वयंस्फूर्तीने शिबिरांचे आयोजन करून अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून अवयवदानाचे संमतीपत्र भरून घेतले व मृत्यूनंतरही अवयवांची गरज असलेल्या नागरिकांच्या जीवनात आनंद पेरण्याचा संकल्प केला.जिल्हा परिषदेच्या सिंधुताई सपकाळ सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या उपस्थितीत अवयवदान शिबिर व जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले तसेच जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्रत्येकाने अवयवदानाबाबत सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. मृत्यूनंतर अवयवदानाच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते, असे पराग सोमण म्हणाले.

# श्रीधर डुकरे यांचे निधन



**सेलू-** घोराड येथील रहिवासी श्रीधर राजेराम डुकरे वय ५५ यांचे हृदयविकाराचे झटक्याने शुक्रवारी निधन झाले, त्यांचे पार्थिवावर घोराड येथील मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांचे पश्चात पत्नी दोन मुले असा आप्त परिवार आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३००**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चातर्फे 'वडनगर ते वाराणसी' सेवा संकल्प अभियानाचे भव्य आयोजन

## -भाजपा शहर जिल्हाध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच त्यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता युवा मोर्चा, अमरावती शहर जिल्हाच्या वतीने 'वडनगर ते वाराणसी' सेवा संकल्प अभियानाचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश 'सेवा, समर्पण आणि राष्ट्रनिर्माण' ही भावना जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन भव्य स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना भारतीय जनता युवा मोर्चा, अमरावती शहर जिल्हाध्यक्ष विजय उर्फ विक्की शर्मा यांनी केली. त्यांनी 'सेवा संकल्प अभियानाची' सविस्तर माहिती देत पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या गेल्या २५ वर्षांच्या सेवा, सुशासन आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्यावर प्रकाश टाकला. तसेच युवकांनी समाजसेवा व राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.



यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार डॉ. हेमांग जोशी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या 'वडनगर ते वाराणसी' सेवा संकल्प यात्रेचा उद्देश व राष्ट्रव्यापी स्वरूप याबाबत माहिती देण्यात आली. महाराष्ट्रात ही यात्रा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज दादा महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. यानंतर अमरावती शहरात भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात संभाजी महाराज चौक येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर रॅली कठोरा नाका, शेगाव नाका व विकास नगर येथे पोहोचली, जिथे महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

पुढे रॅली जयस्तंभ चौक, जवाहर गेट, गांधी चौक, राजकमल चौक मार्गे पुन्हा जयस्तंभ चौक येथे पोहोचली. येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर इरविन चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रॅलीचा समारोप हॉटेल ग्रँड मेहफिल येथे झाला. यावेळी सर्व बाईकस्वारांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, भाजपा विदर्भ संयोजक प्रा. दिनेश सूर्यवंशी, गुजरात द्वारका येथील खासदार जितेंद्रभाई खंजरिया, भारतीय जनता युवा मोर्चा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष विजय उर्फ विक्की शर्मा, भाजपा ज्येष्ठ नेते प्रा. रवींद्र खांडेकर, जयंत डेहनकर, किरण पातुरकर, भाजपा जिल्हा महामंत्री बदल कुलकर्णी, चेतन पवार, राधा कुरिल, भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा सुधा तिवारी, भारतीय जनता युवा मोर्चाचे महामंत्री कीर्तिदीप सराफ, शुभ साहू, आकाश पाटील, सुमित गुल्हाने, साहिल शर्मा, श्रवण मेहरे, योगेश श्रीवास्तव, अक्षय भोगल, आदित्य खैरकर, पीयूष श्रीवास्तव, आकाश गौड, निलेश शर्मा, संकेत शेवणे, मनीष अदविकर, अक्षय वेल्लूरकर, श्रीकांत बिजवे, भूषण हरकूट, शुभम वैष्णव, सनी डुकवानी, अनिकेत विश्वकर्मा, ऋषिकेश ठेलकर, अनिकेत वर्मा यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

या कार्यक्रमासाठी आर्थिक सहकार्य भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी, अमरावती महानगरपालिका सभागृह नेते चेतन गावंडे, चंद्रकांत जाजोदिया (मधुसूदन ग्रुप), डॉ. आशीष डगवार (आरोग्य भारती), लायन्स क्लब प्रीमियमचे अध्यक्ष ऋषभ चांडक, राजेश छाबडा तसेच भारतीय जनता युवा मोर्चा अमरावती शहर जिल्ह्याच्या संपूर्ण टीमचे विशेष सहकार्य लाभले.

# गो.सी.टोम्पे महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर संपन्न

## ६५ रक्तदात्यांचे रक्तदान; सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** गो. सी. टोम्पे महाविद्यालय, चांदूर बाजार येथे गणेश उत्सवानिमित्त सामाजिक बांधिलकी ठेवत राष्ट्रीय सेवा योजना (NSS), NCC कॅडेट्स, स्व. श्री. केशवदादा टोम्पे मोफत फिजिकल अकॅडमी संलग्नित श्री हनुमान क्रीडा मंडळ, चांदूर बाजार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला विद्यार्थी, खेळाडू, NCC कॅडेट्स तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

'रक्तदान हे श्रेष्ठदान' या सामाजिक संदेशाला प्रत्यक्ष कृतीची जोड देत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरातून गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी मोलाचे योगदान मिळाले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचे आयोजकांच्या वतीने कौतुक व आभार मानण्यात आले.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष भास्करराव टोम्पे, सचिव डॉ विजयराव टोम्पे, वैष्णवी सलामे मॅडम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र रामटेके, उपप्राचार्य डॉ नंदकिशोर गव्हाळे, डॉ संजय शेजव, डॉ मनीष सावरकर सुमतीदेवी टोम्पे इन्स्टिटयूट ऑफ फार्मासिटिकल सायन्स अँड रिसर्च चे प्राचार्य राहुल जोध, निर्मिती पब्लिक स्कूल चे प्राचार्य तुषार खोंड, पत्रकार सागर सवळे, मदन भाटे, शरद केदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी ची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



रक्तदानामुळे एखाद्या गरजू व्यक्तीचे प्राण वाचू शकतात, त्यामुळे प्रत्येक निरोगी नागरिकाने रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी संस्था अध्यक्ष श्री भाष्करदादा टोम्पे यांनी केले .

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना चे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ अतुल सरोदे महिला कार्यक्रम अधिकार डॉ मंजुषा पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ उमेश कनेरकर , NCC चे डॉ प्रशांत यावले ,स्व. श्री. केशवदादा टोम्पे मोफत फिजिकल अकॅडमी संलग्नित श्री हनुमान क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात करण्यात आलेले होते .या उपक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद सामाजिक एकतेचे आणि सेवाभावाचे दर्शन घडवणारा ठरला. याप्रसंगी गणेशउत्सवानिमित्त महाप्रसादाचे आयोजन देखील महाविद्यालयातर्फे करण्यात आले . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच रासेयो स्वयंसेवक यांनी अथक प्रयत्न केले , बंटी भाऊ पिहूलकर ,गोपाळ सूरकर ,प्रज्वल पवार (रासेयो स्वयंसेवक ) इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. पंजाबराव वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथील रक्तपेढी च्या अधिकाऱ्यांनी रक्त संकलनाचे कार्य पार पाडले.

# इतर मागास बहुजनचे शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्यासाठी बुधवारपर्यंत मुदत

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाडीबीटी १.० ते महाडीबीटी २.० पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यात विजाभज, इमाव, विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी महाविद्यालयांना बुधवार, दि. ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मधील प्रलंबित अर्जांची छाननी करणे आणि बिले डाऊनलोड करून ठेवण्यासाठी महाडीबीटी १.० पोर्टल दि. १० ते ३० सप्टेंबर या कालावधीत सक्रिय राहणार आहे. सद्यस्थितीत विद्यार्थ्यांसाठी पुन्हा अर्ज करण्याची सुविधा बंद ठेवण्यात आली आहे. डेटा स्थलांतराची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाडीबीटी २.० पोर्टलवर हे अर्ज पुन्हा भरण्यासाठी उपलब्ध केले जातील. दि. १० ते ३० सप्टेंबर दरम्यान महाडीबीटी १.० वर कोणतेही नवीन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. नवीन अर्जांची प्रक्रिया केवळ महाडीबीटी २.० वर चालणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य आणि शिष्यवृत्ती विभाग प्रमुखांनी अर्जांची काळजीपूर्वक तपासणी करून कागदपत्रांतील त्रुटींची तातडीने पूर्तता करून घ्यावी. त्रुटींची पूर्तता न करता अर्ज पुढील स्तरावर पाठवणे चुकीचे असून, त्यामुळे अर्ज नामंजूर होऊ शकतात.

३० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज निकाली निघाले नसल्यास किंवा चुकीच्या अर्जांना मंजुरी दिल्यास विद्यार्थ्यांचे होणाऱ्या नुकसानास संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य पूर्णपणे जबाबदार राहतील, असे इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक सरिता बोबडे यांनी कळविले आहे.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**


# युवक काँग्रेसच्या ३३ कार्यकर्त्यांवर गुन्हा

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विनापरवानगी आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** पालकमंत्री तथा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याबाबत केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून पुतळा जाळल्याप्रकरणी युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षांसह ३३ कार्यकर्त्यांविरुद्ध गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना मंगळवारी २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल यावले यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ३३ कार्यकर्ते सायंकाळी ४.५० वाजताच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्र आले. चंद्रशेखर बावनकुळे यांनी राहुल गांधी यांच्याबाबत पत्रकारांशी बोलताना केलेल्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीच्या निषेधार्थ कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी अचानक बावनकुळे यांचा पुतळा आणला. त्यावर ज्वलनशील पदार्थ टाकून पुतळा पेटविण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या आंदोलनासाठी पोलिसांची पूर्वपरवानगी घेण्यात आली नसल्याचेही पोलिसांनी म्हटले आहे.

अमरावती शहर पोलीस आयुक्तांनी १२ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेला प्रतिबंधात्मक आदेश लागू असताना विनापरवानगी आंदोलन केल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. या आदेशाचे उल्लंघन तसेच सार्वजनिक ठिकाणी पुतळा जाळल्याप्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात कलम २२३, २८७ बीएनएस तसेच कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात राहुल यावले यांच्यासह कार्याध्यक्ष अनिकेत ढंगले, प्रदेश महासचिव निलेश गुहे, एनएसयूआय प्रदेश उपाध्यक्ष संकेत कुलट, जिल्हा उपाध्यक्ष नितीन काळे, अमरावती विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, बडनेरा विधानसभा अध्यक्ष आशिष यादव यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांचा समावेश आहे. प्रकरणाचा पुढील तपास गाडगेनगर पोलिसांकडून सुरू आहे.

# कबड्डी स्पर्धेत सम्राट अशोक विद्यालय मांजरी म्हसला संघ विजयी

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर येथे तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या .या स्पर्धेत तालुक्यातील बऱ्याच शाळेतील संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामना सम्राट अशोक विद्यालय मांजरी म्हसला विरुद्ध शिवनी रसुलापूर यांच्यात झाला. शेवटच्या मिनिटापर्यंत श्वास रोखून धरायला लावणाऱ्या या सामन्यात मांजरी म्हसलाच्या चढाई पटूंनी (रायडर )संगम पाहुणे व आर्यन चव्हाण आणि बचाव पटू (डिफेंडर) शिवम नाटकर, नैतिक चव्हाण, अक्षय लोमटे ,धीरज शिंदे ,कृष्णा लायबर ,कुंदन यादव यांनी दाखवलेल्या अचूक ताळमेळामुळे संघाने विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयामुळे विद्यालयात व गावात आनंदाचे वातावरण आहे. संस्थेचे सचिव रवी कुमार गजभिये यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच शाळेतील अध्यक्ष व इतर सदस्यांनी व मुख्याध्यापक सागर विनोद आसरे सर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे कौतुक केले .तालुक्यातील क्रीडा शिक्षक इंगोले यांनी विजय संघाला व क्रीडा शिक्षिका सुषमा मनोहरे , स्वप्नील पाटील



, रोहित गजभे यांनी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धे करीता मनोहरे , पाटील , रोहित गजबे यांनी परिश्रम घेतले. तसेच आशिष शिंदे( माजी विद्यार्थी) याचे संघाला मार्गदर्शन लाभले.

विद्यालयाच्या वतीने कौतुक करण्यात आले . तसेच शाळेतील शिक्षिका एस. पी. गुल्हाने , प्रतिमा राऊत यांचेही सहकार्य लाभले.

# ग्रामीण नवसंशोधकांसाठी स्पर्धेचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नवसंशोधक, पारंपरिक ज्ञानधारक आणि स्थानिक पातळीवर समस्या निवारण करणाऱ्या युवकाना संधी उपलब्ध झाली आहे. 'हनी बी नेटवर्क', 'ग्यान' आणि 'गेटको' यांच्या वतीने हनी बी नेटवर्क क्रिएटिवीटी ॲण्ड इन्क्ल्यूसिव्ह इनोव्हेशन अवार्ड-इंडिया २०२५-२६ या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नाविन्यपूर्ण शोध, शेतकऱ्यांचे प्रयोग, पारंपरिक ज्ञान आणि कारागिरांच्या कल्पकतेला राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळवून दिले जाणार आहे. स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ५ लाख, द्वितीय ३ लाख आणि तृतीय २ लाख रूपये बक्षीस देण्यात येणार आहे. प्रोत्साहनात्मक पुरस्कारात १२ विजेत्यांना प्रत्येकी ५० हजाराचे पुरस्कार देण्यात येणार आहे.या स्पर्धेसाठी अर्ज करण्याची शेवटची मुदत दि. ३१ ऑक्टोबरपर्यंत आहे. यासाठी gian.org या संकेतस्थळावर अर्ज करावे लागणार आहे. अधिक माहितीसाठी hbncriia-india@gian.org यावर ईमेल करावा. तसेच gian@gian.org किंवा ६३५३५४९७८३ या क्रमांकावर संपर्क क्रमांक करावा.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१८७२/२०२६
संजय + १ वि. निल
पुढील ता.०६.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**
1. **Sanjay Kalyandas Wadhwani**
Age about 61 yrs. Occ.- Retired
R/o. Flat No. 604-A, ELSPAZIA, Zirakpur Dist. SAS Nagar, (Mohali) Punjab. 140603
2. **Vinod Kalyandas Wadhwani**
Age about 51 yrs. Occ.- Service
R/o. Housing Board Colony, Kohe, Fiza, Bhopal (M.P.)

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Kalyandas Nandiram Wadhwani** हे दिनांक **१९.१०.२०२५** रोजी अमरावती येथे मयत झाले व **Durga Kalyandas Wadhwani** या दि.२६.०४.२०२१ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Sanjay Kalyandas Wadhwani +1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Sanjay Kalyandas Wadhwani +1** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२१.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती


Shri Shivaji Education Society, Amravati
**Dr. Panjabrao Deshmukh College of Law, Morshi Road, Amravati.**

**ADMISSION OPEN NOTICE 2026-2027**

Applications are invited from eligible candidates for vacant seats after CAP Rounds, Institutional Round for against CAP Seats for Academic Year 2026-2027.

All desirous and eligible candidates shall submit their application in online mode and fill option form as per scheduled declared in CET CELL portal and prescribed format along with all necessary documents. And also visit college for more details and update.

College Code:-10001-0412 for LLB (3-Years Degree Course) (27/09/2026 to 29/09/2026)

College Code:- 10001-0812 for LLB (5- Years Degree Course) (26/09/2026 to 28/09/2026)

Cutoff Date :- LL.B. 3 Years 07/10/2026
LL.B. 5 Years [illegible]

For more details Schedule and update visit:
- [illegible]
[illegible]

Shri. Harshavardhan P. Deshmukh
President
Shri. Shivaji Education Society, Amravati

Dr. Varsha N. Deshmukh
Principal
Dr. Panjabrao Deshmukh College of Law, Amravati


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **सुशील अवधनारायण दुबे** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन - मौजे - राजापेठ,प्रगणे-बडनेरा, शेत सर्वे क्र.59/2 मधील प्लॉट क्र.14 आणि 15 ता.आणि जिल्हा अमरावती .**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **सुशील अवधनारायण दुबे** यांच्या मालकीची आहे. त्यानंतर **सुशील अवधनारायण दुबे यांनी *PNB HOUSING FINANCE LIMITED.*** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे मूळ खरेदीखत ज्याचे दि.05/12/1974 रोजीचे दस्त क्र.2814/1974** गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण/राष्ट्रीयकृत/खाजगी/ पतसंस्था/ सहकारी / इतर बॅंक बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **7 दिवसांच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता ही ***PNB HOUSING FINANCE LIMITED.*** येथे गहाण करण्यात येईल करीता ही जाहीर सूचना देत आहे.

**ठिकाण- अमरावती**
**दि.26/09/2026**

शिक्का

**आपला,**
***ADVOCATE***
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं. 9823698745**

## जाहीर सोडचिठ्ठी

**जाहीर सोडचिठ्ठी घेणार - पार्टी नं.१ - सौ.कल्याणी अनिकेत कसर**
वय २५ वर्षे, रा.सुनिलजी कडू यांच्या घरी (माहेरी) वाळकी, ता.जि.अमरावती

**जाहीर सोडचिठ्ठी देणार - पार्टी नं.२ - अनिकेत पुंडलिक कसर**
वय ३० वर्षे, रा.अहिरवाडा, ता.आर्वी, जि.वर्धा

आम्ही दोघे पार्टी नं.१ आणि पार्टी नं.२ वरील पत्त्यावर राहतो. आम्ही नात्याने पती-पत्नी आहोत. कुणाच्याही दबावात न येता, चांगल्या मानसिक अवस्थेत सामाजिक जातमान्यतेनुसार मी स्वतः पार्टी नं.१ माझे पतीला दिनांक २७ सप्टेंबर २०२६ ला जाहीर सोडचिठ्ठी देत आहे.

आमचा विवाह १ मे २०२६ ला हिंदु पध्दतीने झालेला आहे. मागील तिन महिन्यांपासून पार्टी नं.१ माहेरी राहत आहे. यापुढे दोघाही पती-पत्नीचे पटणे शक्य नाही. सततच्या सांसरिक कलहातून कुणाचीही जीवितहानी होऊ नये म्हणून याच क्षणी पार्टी नं.१ बिनशर्त घटस्फोट घेत आहे.

यापुढे दोघेही दुसरा विवाह करण्यास मोकळे झालो आहे. यापुढे दोघेही एक दुसऱ्याच्या आयुष्यात हस्तक्षेप करणार नाही. एक दुसऱ्याची सामाजिक बदनामी करणार नाही. हे पती-पत्नीचे वैवाहिक संबंधाचे नाते येथेच संपुष्टात येत आहे.

**जाहीर सोडचिठ्ठी देणार**

**पत्नी - सौ.कल्याणी अनिकेत कसर**

**स्थळ** - अमरावती जिल्हा (महाराष्ट्र राज्य)


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक २३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, **श्री संजय अर्जुनलाल बावळे, रा.अजनी ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** यांनी खाली नमूद केलेल्या शेतजमिनीची विक्री करण्याचा व्यवहार **श्री आशिष गणेशराव लोणकर, रा.संकल्प कॉलोनी, आकोट, ता.आकोट, जि.अकोला,** यांचेसोबत केला आहे. सदर व्यवहाराबाबत दोन्ही पक्षांमध्ये दिनांक **०७/०९/२०२६** रोजी **टोकण चिठठी करारनामा** करण्यात आलेला आहे.

**मिळकतीचे संक्षिप्त वर्णन :-** मौजे अजनी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती, येथील गट क्र. ६७/२ मधील ईसार चिठीत नमुद केलेले १ हे २० आर (३ एकर) क्षेत्र शेतजमीन,

**चतुःसीमा :-** पूर्वेस - भटकर यांचे शेत, पश्चिमेस - देवस्थानचे शेत, उत्तरेस- उर्वरित शेताचा भाग, दक्षिणेस- प्रभुचंद बावळे यांचे शेत. सदर व्यवहारानुसार, सदर शेतजमिनीची शासकीय मोजणी करुन, मोजणीप्रमाणे प्रत्यक्ष क्षेत्र व हद्द निश्चित करुन दिल्यानंतरच अंतिम खरेदीखत/विक्रीखत करुन देण्याचे दोन्ही पक्षांमध्ये ठरलेले आहे. सदर शासकीय मोजणी करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी शेतमालक/ विक्रेता श्री संजय अर्जुनलाल बावळे यांची राहील. तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा कर्जाचा बोजा, गहाण, तारण, शासकीय अथवा इतर कोणताही बोजा किंवा तृतीय व्यक्तीचा हक्क/हितसंबंध असल्यास तो दूर करुन, बोजामुक्त व निर्वेध मिळकत खरेदीदारास देण्याची जबाबदारी विक्रेत्याची राहील. सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, सहहिस्सा, ताबा,बोजा, गहाण, तारण, करार, विक्री व्यवहार किंवा अन्य कोणताही हक्क/हितसंबंध अथवा दावा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आंत आवश्यक कागदपत्रांसह खाली सही करणा-या अधिवक्त्याकडे लेखी हरकत नोंदवावी. निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीवर कोणत्याही तृतीय व्यक्तीचा कोणताही हक्क किंवा दावा नाही असे समजून, वरील अटीची पूर्तता झाल्यानंतर विक्रेता श्री संजय अर्जुनलाल बावळे हे खरेदीदार श्री आशिष गणेशराव लोणकर यांच्या नावे अंतिम विक्रीखत करुन देतील.

**दिनांक - २६/०९/२०२६**
**ठिकाण - अमरावती**

**ॲड.निखिल प्र.लोंदे**
**(मो.क्र.- ८३९०७६६७८८)**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२०३८/२०२६
रत्ना + ३ वि.निरंक
पुढील ता.२६.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**
1. **Ratna Dilip Raut**
Age 50 yrs. Occ.- Household
R/o. Behind M.N.C. School, Kapil Vastu Nagar, V.M.V. Amravati, Tq. & Dist. Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Bhimrao Sonpaji Jadhav** हे दिनांक २२.०५.२००० रोजी अमरावती येथे मयत झाले व **Subhadrabai Bhimrao Jadhav** या दि.०८.०४.२००२ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Ratna Dilip Raut** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Ratna Dilip Raut** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर नोटीस

**सी.आर.पी.सी.चे कलम ८२ अंतर्गत**

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**नरेश ठाकरे**
**-- वि --**
**मो.इरफान मो.युनुस नुर**

संक्षीप्त फौ.ख.क्र.५५०/२०१९ ने.ता.२९.१०.२०२६

न्यायालयाच्या समाधानासाठी हे सिध्द झाले आहे की, वर उल्लेख केलेल्या आरोपी नामे यांना नियमित नोटीस पाठविली असता त्या तामील होत नाहीत म्हणुन सी.आर.पी.सी.चे कलम ८२ अंतर्गत ही घोषणा त्याच्या विरुध्द जारी करण्यात येत आहे आणि त्यांना २९/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वैयक्तिकरित्या किंवा त्यांच्या वकिलांमार्फत दिवाणी/फौजदारी न्यायालय नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती येथे हजर राहावे.

लक्षात ठेवा की, जर तो/ती आधी उल्लेख केलेल्या दिवशी हजर राहिली नाहीत तर, वरील प्रकरणाची सुनावणी त्यांच्या अनुपस्थित कायद्यानुसार केली जाईल आणि निर्णय त्यांच्या गैरहजेरीमध्ये दिला जाईल.

संबंधिताची स्वाक्षरी आणि शिक्क्यानिशी शेरा नोंदवावा.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावती जिल्ह्यात सरसकट 'कोरडा दुष्काळ' जाहीर

## धामणगाव रेल्वे मतदारसंघातील तिन्ही तालुक्यांचा समावेश; आ.प्रतापदादा अडसड यांच्या पाठपुराव्याला यश

**अमरावती/का.प्र**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची दखल घेत अमरावती जिल्ह्यात सरसकट 'कोरडा दुष्काळ' जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातील तिन्ही तालुक्यांचाही समावेश झाला आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या विविध उपाययोजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अमरावती जिल्ह्यात अपुरा पाऊस, पावसातील खंड आणि पिकांवर झालेला प्रतिकूल परिणाम यामुळे शेतकरी अडचणीत सापडले होते. या पार्श्वभूमीवर दुष्काळी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन मदत मिळावी, यासाठी अमरावती भाजपा जिल्हाध्यक्ष (मोर्शी) आ.प्रतापदादा अडसड यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला.

धामणगाव रेल्वे मतदारसंघातील तिन्ही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश व्हावा, यासाठी आ.अडसड यांनी संबंधित प्रशासन व शासनाकडे मागणी लावून धरली होती. त्यांच्या या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, जिल्ह्यात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.



या निर्णयामुळे दुष्काळामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार विविध सवलती व मदत मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे शेतकरी वर्गातून या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.'शेतकऱ्यांच्या अडचणींच्या काळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून शासनाकडून आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील,' अशी भूमिका आ. प्रतापदादा अडसड यांनी व्यक्त केली.

# जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांचा गणवेश निधी थकीत

## पुरवठादाराच्या तगाद्याने मुख्याध्यापक त्रस्त!

**अमरावती/का.प्र**

समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश व शूज-सॉक्ससाठी मंजूर असलेला कोट्यवधी रुपयांचा निधी अद्याप शाळांच्या खात्यावर जमा न झाल्याने अमरावती जिल्ह्यासह राज्यभरातील मुख्याध्यापक हवालदिल झाले आहेत.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने दिलेल्या माहितीनुसार, २०२६-२७ शैक्षणिक वर्ष सुरू होऊन तीन महिने उलटले तरी पहिल्या गणवेशाचे प्रति विद्यार्थी ६० रुपये, दुसऱ्या गणवेशाचे पूर्ण ३०० रुपये आणि शूज-सॉक्सचे १०० रुपये असे एकूण ११ कोटी ५५ लाख १४ हजार ८३० रुपये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना मिळालेले नाहीत.

दुसऱ्या गणवेशासाठी १२६ कोटी ११ लाखांपेक्षा जास्त रक्कम अप्राप्त आहे. शासनाच्या आदेशानुसार मुख्याध्यापकांनी पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले. मात्र निधी न आल्याने कापड, शूज-सॉक्स पुरवणारे दुकानदार व शिलाई करणारे कारागीर मुख्याध्यापकांकडे रोज तगादा लावत आहेत. त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत आहे.याबाबत समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्याकडे निवेदन देऊन निधी तातडीने संबंधित केंद्रांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी केली आहे. माहितीस्तव प्रत अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनाही देण्यात आली आहे.

# यंदा शासकीय रेखा कला परीक्षेत 'हायटेक' पॅटर्न

## विद्यार्थ्यांना मिळणार डिजिटल प्रश्नपत्रिका, ब्लॅक बोर्ड वर पाहून काढावे लागणार चित्र

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळातर्फे घेतली जाणारी शासकीय रेखाकला परीक्षा २०२६ येत्या २८, २९, ३० सप्टेंबर आणि १ व २ ऑक्टोबर २०२६ रोजी निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे. यंदा मंडळाने परीक्षा पद्धतीत अत्यंत महत्त्वाचे आणि पारदर्शक बदल केले आहेत. परीक्षा सुरळीत व गैरप्रकारमुक्त पार पाडण्यासाठी केंद्रप्रमुखांना कडक नियमांचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

डिजिटल प्रश्नपत्रिका आणि 'ब्लॅकबोर्ड' पद्धतयंदाच्या परीक्षेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य होय. म्हणजे कोणत्याही परीक्षा केंद्रावर भौतिक स्वरूपात प्रश्नपत्रिका आगाऊ पाठवल्या जाणार नाहीत. सर्व परीक्षा केंद्रांच्या अधिकृत लॉगिन आयडीवर डिजिटल स्वरूपात प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्या जातील.

सकाळच्या सत्रासाठी परीक्षेच्या दिवशी सकाळी ६.०० वाजता आणि दुपारच्या सत्रासाठी सकाळी १०.०० वाजता प्रश्नपत्रिका लॉगिनवर उपलब्ध होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेची छापील प्रत दिली जाणार नाही. केंद्र संचालक किंवा पर्यवेक्षकांनी प्रश्नपत्रिकेतील प्रश्न (फक्त विषय) वर्गातील फळ्यावर स्पष्ट अक्षरात लिहून द्यायचे आहेत. विद्यार्थ्यांनी फळ्यावरील प्रश्न पाहूनच उत्तरपत्रिकेवर आपले काम करायचे आहे.साहित्याची यादी दोन दिवस आधी मिळणारपरीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या 'स्टिल लाईफ' व 'वस्तुचित्र' या विषयांच्या साहित्याची यादी परीक्षेच्या दोन दिवस अगोदर केंद्रप्रमुखांना उपलब्ध करून दिली जाईल. तसेच, परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या मुख्य सूचना उत्तरपत्रिकेवर आधीच मुद्रित केलेल्या आहेत. त्यामुळे शिक्षकांनी केवळ फळ्यावर लिहिलेला प्रश्न विद्यार्थ्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे.

**गोपनीयतेची जबाबदारी केंद्रप्रमुखांवर**


प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वी केवळ चार तास आधी मिळणार असल्याने, तिची गोपनीयता राखण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित केंद्रप्रमुखांची असेल. यामध्ये कोणत्याही स्तरावर निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद रंगनाथ दांडगे यांनी दिला आहे.

विद्यार्थ्यांनी कोणत्याही अडचणीविना परीक्षा द्यावी, यासाठी परीक्षा केंद्रांनी योग्य ती पूर्वतयारी करावी, असे आवाहन मंडळाने केले आहे.

## माजी नगराध्यक्ष व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते

# हरिशंकर अग्रवाल यांचे निधन

**अचलपूर**-अचलपूर नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी हरिशंकर अग्रवाल (८६) यांचे काल शनिवार २६ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरासह संपूर्ण अमरावती जिल्ह्यात आणि राजकीय वर्तुळात तीव्र शोक व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निधनामुळे अचलपूरच्या राजकारणातील एक अनुभवी, खंबीर आणि दिशादर्शक नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.



काँग्रेस पक्षाचे नेते हरिशंकर अग्रवाल हे केवळ अचलपूर विधानसभा मतदारसंघातच नव्हे, तर महाराष्ट्राच्या राजकारणात एक सक्रिय, अभ्यासू आणि मुत्सद्दी नेते म्हणून ओळखले जात होते. काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ कार्य-पदाधिकारी म्हणून त्यांनी प्रदीर्घ काळ सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. अचलपूर नगर परिषदेचे १९८५ ते १९८८ व १९९३-१९९४ नगराध्यक्ष असताना त्यांनी शहराच्या विकासासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले व विविध विकासकामे यशस्वीपणे राबवली.त्यांच्या राजकीय वजनाचा आणि अभ्यासू वृत्तीचा अंदाज यावरूनच येतो की, त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्राच्या अनेक तत्कालीन मुख्यमंत्र्यांसह माजी राष्ट्रपतीं, राज्यपाल, अधिकारी, विविध पक्षाचे नेते त्यांच्या परतवाडा येथील निवासस्थानी प्रत्यक्ष भेट दिली होती. या भेटींदरम्यान त्यांनी प्रादेशिक विकास,राजकीय घडामोडी आणि जनहिताच्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली होती. जनसामान्यांशी असलेली त्यांची थेट नाळ आणि सर्वपक्षीय सलोखा हे त्यांच्या नेतृत्वाचे मुख्य वैशिष्ट्य राहिले. त्यांच्या निधनाने अचलपूर-परतवाड्याच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील एक लखलखता तारा निखळला आहे. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार व कार्यकर्त्यांचा संग्रह आहे.सामाजिक व धार्मिक कार्यात स्व.हरिशंकर अग्रवाल हे नेहमी अग्रेसर रहायचे .सामान्य माणसाशी जुळलेली नाळ शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी कायम ठेवली. फिनले मील कामगाराचे प्रश्नांबाबत ही त्यांनी केंद्र व राज्य शासनस्तरावर महत्वूर्ण पाठपुरावा केला होता. हसमुख मनमिळावू व प्रेमळ स्वभावामुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. आज रविवारी अंत्यसंस्कार स्व. हरिशंकर अग्रवाल यांची अंत्ययात्रा आज रविवार २७ सप्टेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता त्यांच्या परतवाडा येथील निवासस्थानावरून निघणार असून स्थानिक स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील.

## भातकुली तालुक्यात प्रदीर्घ पावसाचा खंड; खरीप पिकांची स्थिती खालावली

# सोयाबीनच्या उभ्या पिकात रोटावेटर फिरवून शेतकरी रब्बीच्या तयारीला

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

भातकुली तालुक्यात प्रदीर्घ काळ पावसाचा खंड पडल्याने खरीप हंगामातील प्रमुख पिकांची स्थिती खालावली आहे. विशेषतः सोयाबीन, कापूस आणि तुरीच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सोयाबीनची कापणी व मळणीचा खर्चही निघण्याची शक्यता नसल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे परिसरातील काही शेतकरी सोयाबीनच्या उभ्या पिकात रोटावेटर फिरवून रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी जमीन तयार करीत असल्याचे क्षेत्रीय स्तरावर दिसून येत आहे.

भातकुली तालुक्यात खरीप हंगामात सोयाबीनचे २२ हजार २०७ हेक्टर, कापसाचे १९ हजार १२८ हेक्टर, तुरीचे ९ हजार ३६१ हेक्टर क्षेत्र पेरणीखाली आहे. याशिवाय उडदाचे ७५ हेक्टर, इतर तेलबिया पिकांचे १० हेक्टर, मक्याचे ७.२० हेक्टर आणि मुगाचे २.४० हेक्टर क्षेत्र आहे. तालुक्यातील प्रमुख पिकांमध्ये सोयाबीन, कापूस आणि तुरीचे क्षेत्र मोठे असल्याने पावसाच्या खंडाचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होण्याची शक्यता आहे.



दीर्घ पावसाच्या खंडामुळे हलक्या व मध्यम जमिनीतील उपलब्ध ओलावा झपाट्याने कमी झाला आहे. परिणामी पिकांमध्ये पाण्याचा ताण वाढला असून, आगामी काळात समाधानकारक पाऊस न झाल्यास उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. विशेषतः सोयाबीनमध्ये दाणे भरण्याची प्रक्रिया अपूर्ण राहण्याचा धोका आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची नियमित पाहणी करावी. पिकांची अवस्था, जमिनीतील उपलब्ध ओलावा आणि उपलब्ध साधनसामुग्री यांचा विचार करून कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार पुढील पीक व्यवस्थापनाचे नियोजन करावे. तांत्रिक मार्गदर्शनासाठी कृषी विभागाचे क्षेत्रीय अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी भातकुली उत्कर्षा भोसले आणि मंडळ कृषी अधिकारी टाकरखेडा संभू अमोल सराड यांनी केले आहे.

सोयाबीन : फुलोरा आणि शेंगा भरण्याची अवस्था ही सोयाबीन पिकासाठी ओलाव्याच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असते. या कालावधीत जमिनीतील ओलावा कमी झाल्याने सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे.कापूस : कापूस हे दीर्घ कालावधीचे पीक असले तरी पावसाच्या खंडामुळे पिकाची वाढ खुंटली आहे. पात्या, फुले आणि बोंडांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होऊन उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.तूर : जमिनीतील ओलावा कमी झाल्याने तुरीच्या वाढीवर तसेच फुलोरा आणि शेंगा धरण्याच्या प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असून उत्पादनात घट येऊ शकते.

# माकडांचा कळप हाकलून देत असताना शेतकऱ्यांचा विहीरीत पडून मृत्यू

## माकडांचा बंदोबस्त करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव येथे एक अत्यंत हृदयद्रावक आणि दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. आपल्या शेतातील उभ्या पिकाचे माकडांच्या कळपापासून रक्षण करत असताना, विहिरीत पडून ६७ वर्षीय वृद्ध शेतकरी बाबुराव महादेवराव गावंडे यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे सातेगाव परिसरात आणि शेतकरी वर्गात तीव्र हळहळ व्यक्त होत असून, वन्यजीवांमुळे शेतकऱ्यांच्या जिवाला निर्माण झालेल्या धोक्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत बाबुराव गावंडे यांच्याकडे पाच एकर शेती आहे. यंदा तालुक्यात पाऊस अत्यंत कमी पडल्याने हाताशी आलेली पिके आधीच कोलमडली आहेत. त्यातच गेल्या काही दिवसांपासून परिसरात माकडांच्या झुंडींनी हैदोस घातला असून, ते शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करत आहेत. वन्य प्राण्यांच्या त्रासापासून आपले उरलेसुरले पीक वाचवण्यासाठी बाबुराव गावंडे हे स्वतः शेतात गेले होते. शेतात धुमाकूळ घालणाऱ्या माकडांच्या कळपाला हाकलून लावत असताना, एका माकडाने त्यांच्यावर उडी मारुन धक्का दिल्याने ते शेतातीलच विहिरीत पडले. विहिरीत बुडून त्यांचा जागीच दुर्दैवी अंत झाला.बाबुराव गावंडे यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात घरात त्यांची पत्नी (गृहणी), बाहेरगावी असलेला एक मुलगा आणि सध्या शिक्षण घेत असलेली मुलगी असा परिवार आहे.



कुटुंबाचा मुख्य आधार आणि कर्ता माणूस गेल्याने गावंडे कुटुंबावर उदरनिर्वाहाचे आणि मुलांच्या भवितव्याचे मोठे संकट उभे राहिले आहे.या घटनेनंतर सातेगाव आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये वनविभागाच्या उदासीनतेबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे. परिसरात माकडांचा उपद्रव वाढला असून वनविभागाने तातडीने त्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी अनेक दिवसांपासून केली जात होती. मात्र, प्रशासनाकडून वेळेत पावले न उचलल्या गेल्यामुळे एका निष्पाप शेतकऱ्याला आपले पीक वाचवताना जीव गमवावा लागल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. 'एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरीकडे वन्य प्राण्यांचा सुळसुळाट, अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. शासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन मृत बाबुराव गावंडे यांच्या कुटुंबाला तातडीने मोठी आर्थिक मदत जाहीर करावी, तसेच वन्य प्राण्यांमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची भरपाई द्यावी,' अशी आग्रही मागणी सातेगाव येथील शेतकऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी केली आहे.

# जवळा शहापूर येथे नाल्यात दुचाकी कोसळून युवकाचा मृत्यू

**टाकरखेड़ा शंभू**-चांदूरबाजार तालुक्यातील जवळा शहापूर येथे गावालगत असलेल्या नाल्यात दुचाकी कोसळून २७ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, २४ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊ ते दहाच्या सुमारास घडली.मृत युवकाचे नाव निर्भय सुरेंद्र ठाकरे ऊर्फ बंटी ठाकरे (वय २७, रा. जवळा शहापूर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निर्भय ठाकरे हे रात्री काम आटोपून खरवाडी येथून दुचाकीने आपल्या गावाकडे परतत होते. गावालगत असलेल्या नाल्याजवळ त्यांची दुचाकी अचानक नाल्यात कोसळली. त्यांचा मृत्यू झाला. नाल्याला संरक्षण भिंत किंवा अन्य आवश्यक सुरक्षा व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी हा भाग वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या ठिकाणी तत्काळ संरक्षण भिंत उभारावी अशी मागणी ग्रामस्थांची आहे. ठाकरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.




## जाहीर सूचना

सर्व जनतेस व संबंधित शासकिय निमशासकीय कार्यालयास या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, मी **कल्याणी अमोल कुचे, वय ३७, ३/बी समर्पण कॉलनी पाठ्य पुस्तकालयाजवळ अमरावती, ४४४६०४** (महाराष्ट्र) माझ्या शैक्षणिक गुणपत्रिकेवर माझे नाव कल्याणी विनायकराव आवारे असे आहे तसेच माझ्या ईतर शासकीय ओळखपत्रावर उदा.आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र यावर माझे नाव कल्याणी अमोल कुचे हे असून सदर दोन्हीही नावे ही एकच असल्याचे मी जाहीर करते.

भविष्यात सर्व शैक्षणिक, न्यायालयीन व शासकीय कामकाजासाठी ही दोन्ही ही नावे माझीच ग्राह्य धरण्यात यावीत.

**दिनांक**
**स्थळ अमसावती**

**आपली नम्र**
**कल्याणी अमोल कुचे**
**३/बी समर्पण कॉलनी वि.म.विद्या मागे**
**पाठ्य पुस्तकालयाजवळ अमरावती ४४४६०४**


# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी!

## चांदूर रेल्वेत कॉकरोच जनता पार्टीचे तहसील कार्यालयामार्फत राष्ट्रपतींना निवेदन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

भारताची लोकशाही अधिक सक्षम आणि विश्वासार्ह राहण्यासाठी निवडणूक प्रक्रिया मुक्त, निष्पक्ष, पारदर्शक व विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी कॉकरोच जनता पार्टी, चांदूर रेल्वे यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन शुक्रवारी तहसील कार्यालय, चांदूर रेल्वे यांच्यामार्फत राष्ट्रपती यांना सादर करण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, निवडणूक प्रक्रियेबाबत नागरिकांच्या मनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे निरसन पारदर्शक पद्धतीने होणे गरजेचे आहे.

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

निवेदनाद्वारे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पदाचा राजीनामा द्यावा, निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करावी, निवडणूक प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता सुनिश्चित करावी तसेच मतदारांचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास कायम राहण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात, अशा चार प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी कॉकरोच जनता पार्टीचे सदस्य सागर तंबाखे, सेजल मेंढे, श्रेया वानखेडे, अलीशा धवणे, प्रा. शीतल मसोटकर, ॲड. लौकिक डोंगरे, स्वप्नील ढोमणे, प्रा. प्रफुल इंगळे, पंकज घोरपडे, स्वप्नील डोळस, हार्दिक सोनोने, शीतल मासोतकर, तेजस मेश्राम, अक्षय स्थूल, गौरव इंगोले, धीरज मेश्राम, सूरज कांबळे, यश वानखेडे आदी उपस्थित होते.


MAHATRANSCO

## SRM E-Tender Notice

MSETCL invites online bids (E-Tenders) from registered Suppliers/agencies on Mahatransco SRM portal for following tenders.

| Tender No. | Estimated cost | EMD in Rs. | Tender fees in Rs. (To be paid Online only) | Date of downloading | Due date of submission |
|---|---|---|---|---|---|
| CE/EHV/ PCO&M/ Zone/Amt/ Tech/ 2026-27/T-25 (4th Call) (RFx - 7000041440 (4th Call)) | **Balanced work of** Supply, Erection, Testing and Commissioning of additional 1 x 25MVA, 132/33 kV T/F along with HV & LV Bay equipments and all allied equipments with Civil works at 132kV Digras substation, under EHV O&M Division Yavatmal **on the Risk & Cost of M/s. Noble Enterprises, Jalgaon. (T/F will be provided by MSETCL)** | | | | |
| | Rs. 2,24,07,391.65/- | Rs. 2,24,073.91/- | Rs. 5000/- + GST (as applicable.) Non-refundable. | 23.09.2026 to 01.10.2026 | 01.10.2026, 24:00 Hrs. |

**Contact Person :- The Executive Engineer (Adm),** EHV PCO&M Zone, "A" Wing, "Prakash Sarita", 220KV S/tn Amravati Campus, Welcome Point, Morshi Road, Amravati - 444603.
**Contact No** :- (0721) 2669030 (O) / 8554989575 E-mail ID:- **ceamravati@mahatransco.in**
**Note:** Vendors are requested to check our Mahatransco site i.e. **https://www.mahatransco.in/** for further tender refloating/updating, time to time.
For further details, please visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
The tender notice for tender no. **T-25/2026-27 (RFx - 7000041440 (4th Call))** is already published on MSETCL's website.

**Sd/-**
**Chief Engineer**



MAHATRANSCO

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (SRM e-Tender) from registered agencies on MSETCL's e-Tendering website. For further details please visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

| Sr. No. | Tender No. & Description of Work |
|---|---|
| 1 | **Work of annual maintenance contract for providing of pipe type & Counter poise earthing to the towers of various 220 kV & 132 kV Lines under EHV (O&M) Circle, Akola. (1st Call) RFX No. 7000041663 Tender No.: MSETCL/SE/EHV/O&M/CRL/AKL/Tech/2026-27/T-16-AMC Line Earthing Estimated Cost = Limited to Rs. 50,00,000.00/-** |

| Publicity period of tender | Tender Available at |
|---|---|
| Start Date :- 26.09.2026 From: 00:00 Hrs onwards | https://srmetender.mahatransco.in |
| Submission Deadline : - | Tender Opening Date : - |
| 05/10/2026 @ up to 23:59 Hrs. | Technical Bid: Date : 06/10/2026, 11:00 Hrs, if possible. Price Bid: Date : 06/10/2026, 12:00 Hrs, if possible |

**Contact Person:** The Dy. Executive Engineer, EHV O&M Circle, AKOLA.
**Contact No.: 8554989534 (Dy. Executive Engineer),** e-mail id: **se1200@mahatransco.in**

1 Relevant portions of the Tender which the bidders have to fill up, would be available online on above-said website.
2. **EMD amount of Rs. 50,000.00/- and Tender Fees Rs. 500+ GST** as applicable (per tender & non- refundable) should be paid on-line only. **Payment in cash/DD will not be accepted.** Bidder can pay through credit card / Debit Card / Net Banking. The payment confirmation will be done by the Corporate Office.
3. Tender documents can be downloaded only online from above-said website.
4. Eligible bidders shall submit their bids well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
5. If the payment of tender fee and EMD by a bidder is not confirmed, then the bidder will be straight-way disqualified and his bids will not be considered for further tendering process.

**Note**: All eligible & interested bidders are mandated to get enrolled on SRM e-Tendering portal. **(https://srmetender.mahatransco.in/)**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV O&M CIRCLE, AKOLA**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# अमरावतीत बाप्पाला निरोप

## विसर्जनासाठी छत्री, वडाळी, प्रथमेश तलावावर गर्दि -कडेकोट सुरक्षा व्यवस्था







**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या गणेशोत्सवाची धामधूम आता संपण्याच्या मार्गावर आहे. दहा दिवसाचे आदरातिथ्य स्वीकारून आता बाप्पा परतीच्या मार्गावर आहे. गुरुवारपासून बाप्पाला निरोप दिला जात आहे. शहरातील प्रथमेश, छत्री,वडाळी या तीनही प्रमुख तलावांसह कृत्रिम तलावात गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या जयघोषात भाविक लाडक्या बाप्पाला निरोप देत आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने तगडा सुरक्षा बंदोबस्त ठेवला आहे. संपूर्ण विसर्जन सोहळा सीसीटीव्ही आणि ड्रोन कॅमेऱ्यांच्या निगराणीत पार पडला. शहरातील छत्री तलाव, वडाळी तलाव आणि प्रथमेश तलाव परिसरात शुक्रवारी सकाळी ८ वाजल्यापासूनच विसर्जनाला सुरुवात झाली होती. ☞(पान २ वर)

# जिप आरोग्य विभागात आढळला कालबाह्य औषध साठा



## चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषद आरोग्य विभागातील कथित हलगर्जीपणामुळे सामान्य व गरजू रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला लाखो रुपयांचा औषधसाठा कालबाह्य झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. संबंधित औषधे वेळेत आरोग्य केंद्रांमार्फत रुग्णांना वितरित न झाल्याने ती मोठ्या प्रमाणात कालबाह्य होऊन जिल्हा परिषदेच्या दोन ते तीन खोल्यांमध्ये पडून असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. शासकीय निधीतून खरेदी करण्यात आलेली औषधे रुग्णांच्या उपचारासाठी वापरण्याऐवजी कालबाह्य होईपर्यंत पडून राहिली असतील, तर हा प्रकार प्रशासनाच्या औषध व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.

एकीकडे ग्रामीण व दुर्गम भागातील आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक औषधांचा तुटवडा जाणवत असल्याच्या तक्रारी होत असताना दुसरीकडे उपलब्ध औषधे वापराअभावी कालबाह्य झाल्याचा ☞(पान २ वर)

# पैशांच्या वादातून तरुणाचा खून

## मृतदेह पोत्यात भरून टाकला धामणा शिवारात



**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवाच्या बंदोबस्तात असलेल्या गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या एका संशयास्पद माहितीने २७ वर्षीय तरुणाच्या खुनाचा उलगडा केला. पैशांच्या व्यवहारातून खून केल्यानंतर मृतदेह प्लास्टिकच्या पोत्यात भरून धामणा शिवारात टाकण्यात आला होता. मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी ऑटोच्या शोधात ☞(पान २ वर)

# प्रा.अनिल बंड जिजाऊ बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे नविन अध्यक्ष



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिजाऊ कमर्शिअल को ऑप बँक अमरावती ची व्यवस्थापन समितीची सभा नुकतीच दिनांक २२ सप्टेंबर २०२६ला बँकेच्या सभागृहात पार पडली. व्यवस्थापन समिती सभेमध्ये प्रा. अनिल बंड (संचालक व सदस्य व्यवस्थापन समिती) यांची बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या अध्यक्षपदी निवड केली. त्यांचे अभिनंदन करतांना ईजी.अविनाश कोठाळे , प्रा.अनिल बुरघाटे, डॉ.सुरेंद्र दाळु, भैय्यासाहेब☞(पान २ वर)

# अभ्यासिकेच्या टेरेसवर तरुणीच्या मानेवर चाकूने वार

## आरडाओरड होताच आरोपी पसार; लग्नासाठी धमकावल्याची तक्रार

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** अभ्यासिकेच्या टेरेसवर गेलेल्या तरुणीच्या मानेवर चाकूने वार करून तरुण पसार झाल्याची घटना नांदगाव खंडेश्वर येथील मुंगसाजी चौक परिसरात घडली. हल्ल्यात तरुणी जखमी झाली असून, घटनेनंतर आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अखेर २४ तासांच्या आत अभिषेक सुरेश बावीस्थळे (वय २५, रा. ओंकारखेडा, नांदगाव खंडेश्वर) याला पोलिसांनी अटक केली.

२४ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास तरुणी महात्मा ज्योतिबा फुले अभ्यासिकेत अभ्यासासाठी गेली होती. बाथरूमसाठी ती अभ्यासिकेच्या टेरेसवर गेल्यानंतर आरोपी तेथे आल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. त्याने चाकूने तिच्यावर वार केला. यातील एक वार मानेवर लागल्याने तिला दुखापत होऊन रक्तस्राव झाला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे तरुणीने



आरडाओरड केली. तिचा आवाज ऐकून मदतीसाठी हालचाल सुरू होताच आरोपी तेथून पसार झाल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर परिसरातील एका तरुणाने जखमी तरुणीला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, या प्रकरणाला पूर्वीच्या पाठलागाची पार्श्वभूमी असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. आरोपी काही काळापासून पाठलाग करीत होता आणि आपल्यासोबत लग्न करण्यासाठी धमकावत असल्याचा आरोप पीडितेने केला आहे. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी ☞(पान २ वर)

# अचलपूर - परतवाडात मोकाट श्वानांचे निर्बीजीकरण सुरू

## -दैनिक जनमाध्यम इम्पॅक्ट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात वाढत्या मोकाट श्वानांच्या उपद्रवामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी अचलपूर नगर परिषदेच्या वतीने मोकाट श्वानांचे निर्बीजीकरण आणि अँटी रेबीज लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. यापूर्वी अनेक वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाले होते.या मोहिमेची जबाबदारी कोल्हापूर येथील सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन या नोंदणीकृत संस्थेला देण्यात आली आहे.कल्याण मंडपम सेंटरमध्ये ही मोहीम राबवली जात आहे.

अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात गेल्या काही वर्षांपासून मोकाट श्वानांचा त्रास



वाढला आहे. अलिकडच्या काळात त्यांच्या हल्ल्यांमध्ये बालकांसह ☞(पान २ वर)

# चार सराईत आरोपी अमरावती जिल्ह्यातून हद्दपार

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी चार जणांवर तडीपारीची कारवाई केली आहे. परतवाडा व शिरखेड पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील या चौघांना अमरावती जिल्ह्याबाहेर जाण्याचे आदेश पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिले आहेत. यामध्ये परतवाड्यातील संतोष पेंदे व निखील मंडले यांना सहा महिने, तर राजुरवाडीतील कुलदीप अंभोरे व अक्षय मोहोकार यांना तीन महिन्यांसाठी जिल्हाबंदी करण्यात



आली आहे. परतवाड्यातील पेन्शनपुरा परिसरातील संतोष नंदलाल पेंदे (वय २२) आणि निखील जोगेश्वर मंडले (वय २२) यांच्याविरुद्ध अवैध शस्त्र बाळगणे तसेच शरीराविरुद्धचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांच्या प्रस्तावात नमूद करण्यात ☞(पान २ वर)

# गणपती विसर्जनादरम्यान युवकाचा बेंबळा नदीमध्ये बुडून मृत्यू

## शोध मोहिमेत तिसऱ्या दिवशी मृतदेह आढळला

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर शहरात गणपती विसर्जनाची लगबग सुरू असताना एक दुर्दैवी घटना घडली. गणपती विसर्जनासाठी बेंबळा नदीवर गेलेला युवक सुमित लीलाधर मारोटकर (वय अंदाजे २५, रा. नांदगाव खंडेश्वर) याचा बुडून मृत्यू झाला. संपूर्ण मित्रमंडळीमध्ये मुन्ना डॉन या नावाने तो परिचित होता. दिनांक २४ सप्टेंबर रोजी रात्री ७.३० वाजता दरम्यान गणपती विसर्जन आटोपल्यानंतर सर्व मंडळाचे कार्यकर्ते घरी परतले. मात्र सुमित मारोटकर रात्री



१२ वाजले तरी घरी परतला नाही. तेव्हा

युवकाचा भाऊ, वडील व मित्रमंडळी यांनी रात्री १२ वाजता बेंबळा नदीवर जाऊन बॅटरीच्या सहाय्याने शोध घेतला, परंतु तो आढळला नाही.

दुसऱ्या दिवशी परिवार व मित्रमंडळींनी ड्रोनच्या माध्यमातून शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. अखेर परिवाराने नांदगाव खंडेश्वर पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. आज दिनांक २६ सप्टेंबर☞(पान २

# अमरावती कबड्डी संघ असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदी संतोष बद्रे

## आझाद हिंद मंडळ बुधवारा येथे गणेशोत्सवात सत्कार सोहळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणात बुधवारा येथील आझाद हिंद मंडळातर्फे पदाधिकारी व शिवसेनेचे महानगर प्रमुख संतोष बद्रे यांची अमरावती कबड्डी संघ असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सामाजिक, राजकीय तसेच क्रीडा क्षेत्रात कार्यरत असलेल्या पदाधिकारी व शिवसेनेचे महानगर प्रमुख संतोष बद्रे यांच्या या निवडीबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



अमरावती कबड्डी संघ असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी☞(पान २ वर)

# कुऱ्हावासीयांची पर्यावरणपूरक घरगुती गणेश विसर्जनाला पसंती

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** पर्यावरणाचे संवर्धन आणि जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्याच्या उद्देशाने कुऱ्हा ग्रामपंचायतीने केलेल्या पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाच्या आवाहनाला ग्रामवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कुऱ्हा येथील पीपला विहार परिसरातील जयंत पंडित, प्रवीण पवार, गजानन मेश्राम तसेच करण सुजिया यांच्या कुटुंबीयांनी आपल्या घरगुती गणेशमूर्तीचे पर्यावरणपूरक पद्धतीने घरच्या घरी विसर्जन करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.



गणेश विसर्जनासाठी परिसरात सुंदररीत्या सजविण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये विधिवत पूजा-अर्चा करून गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी बालगोपालांसह महिला व पुरुषांची मोठी☞(पान २ वर)

# आष्टी येथे घराजवळ आढळला १० फूटाचा अजगर

## सर्पमित्रांकडून सुरक्षित रेस्क्यू

**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** भातकुली तालुक्यातील आष्टी येथे गोविंद गोपालराव लोखंडे यांच्या घराजवळ तब्बल ८ ते १० फूट लांबीचा अजगर आढळल्याने परिसरात काही काळ खळबळ उडाली.मिळालेल्या माहितीनुसार, लोखंडे यांच्या पाळीव 'कालू' या कुत्र्याने घराच्या दरवाजाजवळ एका ठिकाणी सतत पाहत भुंकण्यास सुरुवात केली. कुत्रा नेमका कशाकडे पाहून भुंकत आहे, हे पाहण्यासाठी मोबाईलच्या प्रकाशात पाहिले असता तेथे मोठा सापासारखा जीव आढळून आला.यानंतर पवन लोखंडे व अमोल गादे यांनी अजगर पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, अजगर मोठा व जाड असल्याने त्यांना पकडणे शक्य झाले नाही. त्यामुळे वलगाव येथील



सर्पमित्र पवन बघल्ले, विकी कूरेकर व यश ☞(पान २ वर)

# गुरुकुंज मोझरीत दुष्काळी शासन निर्णयाची होळी

## संतप्त शेतकऱ्यांचा सरकारविरोधात एल्गार

### शेतकऱ्यांच्या सर्व पिकांना हेक्टरी १ लाखांच्या मदतीची मागणी

**गुरुकुंज मोझरी/प्रतिनिधीः-** राज्य सरकारने जाहीर केलेल्या दुष्काळी सवलतीच्या शासन निर्णयावर संतप्त शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत गुरुकुंज मोझरी येथील बसस्थानकासमोर शासन



निर्णयाची होळी केली. वाळलेल्या सोयाबीनसह शासन निर्णय जाळत शेतकऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

कोरड्या☞(पान २ वर)

# आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यूने पुन्हा प्रश्नचिन्ह

## भातकुलीतील पाचवीच्या विद्यार्थिनीचा मृत्यू

## प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत चौकशी सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली येथील अनुदानित आश्रमशाळेत वास्तव्यास असलेल्या पाचवीतील आदिवासी विद्यार्थिनीचा अचानक मृत्यू झाल्याने आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आणि आरोग्य व्यवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. मेळघाटातील राणीगाव येथील या विद्यार्थिनीच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. राणीगाव येथील ही विद्यार्थिनी शिक्षणासाठी भातकुळीतील अनुदानित आश्रमशाळेत राहत होती. दरम्यान, आश्रमशाळेत असताना तिची प्रकृती अचानक बिघडली आणि त्यानंतर तिचा मृत्यू झाल्याची ☞(पान २ वर)

# राधे गणेशोत्सव मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत आदिवासी नृत्य ठरले प्रेक्षणीय

## -डिजे, गुलाल, ढोल ताशाला फाटा देत पारंपारिक पद्धतीने विसर्जन

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** शहरातील अण्णाभाऊ साठे चौकातील राधे गणेशोत्सव मंडळ दरवर्षी सामाजिक उपक्रमाने गणेशोत्सव साजरा करतात. यावर्षी या मंडळाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीतील आदिवासी नृत्य लक्षणीय ठरले असून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

गणेशोत्सव म्हंटला कि, डि.जे. वरील थिरकणारी तरूणाई गुलाल, ढोल ताशे याचा कर्णकर्कश आवाज. मात्र याला



अपवाद ठरलेले राधे गणेशोत्सव मंडळ. मागील अनेक वर्षांपासुन या नविन पद्धतीला फाटा देत ना गुलाल ना डि.जे. ना ढोल ताशे यांना वगळून वारकरी सांप्रदायिक दिंड्या, लहान मुलींचे लेझीम पथक ,आदिवासी नृत्य ,सात बैल जोड्यांचा रथ, त्यावर पूर्ण मातीची देखणे गणपती ची मुर्त विराजमान☞(पान २

सारांश
जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय
❑ रविवार, २७ सप्टेंबर २०२६ ❑ E-paper - www.janmadhyam.com

# सई ताम्हणकरची जबरदस्त सीरिज!

सध्या ओटीटीवर कॉमेडी, ड्रामा, सस्पेन्स अन् क्राइम थ्रिलरचा भडिमार पाहायला मिळतो. पण जर तुम्हाला रहस्य आणि गुन्हेगारी जगतावर आधारित थरारक कथा पाहायला आवडत असतील, तर 'क्राइम बीट' ही सीरिज तुमच्यासाठी एकदम परफेक्ट चॉइस आहे. २०१३ मध्ये आलेल्या 'द प्राइस यू पे' या प्रसिद्ध कादंबरीवर ही सीरिज आधारित आहे. पत्रकारिता, राजकारण आणि अंडरवर्ल्ड यांच्यातील भयंकर साटंलोटं यात अगदी बारकाईने मांडलं आहे.

काय आहे 'क्राइम बीट'ची रंजक कथा?

या सीरिजमध्ये अभिनेता साकिब सलीमने 'अभिषेक सिन्हा' या महत्त्वाकांक्षी पत्रकाराची भूमिका साकारली आहे. एका छोट्या शहरातून आलेला हा क्राइम रिपोर्टर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी दिल्ली गाठतो. पण, त्याच्या हाती एक अशी बातमी लागते जी त्याचं संपूर्ण आयुष्यच बदलून टाकते. पोलिसांच्या नाकावर टिच्चून फरार झालेला धोकादायक गँगस्टर 'बिन्नी चौधरी' परत आल्याचा सुगावा त्याला लागतो आणि तिथूनच त्याच्या करिअरमध्ये एक भयंकर अन् नाट्यमय वळण येतं.

'क्राइम बीट' हा एक असा शो आहे, ज्यातील प्रत्येक एपिसोडमधील जबरदस्त ट्विस्ट अन् टर्न्स तुमची उत्सुकता ताणून ठेवतात. बातमीच्या शोधात असलेल्या पत्रकारांना प्रत्यक्ष आयुष्यात कोणत्या जीवघेण्या आणि खडतर प्रसंगांना सामोरे जावे लागते, याचे वास्तववादी चित्रण यात पाहायला मिळते. ही सीरिज पाहताना तुमची नजर स्क्रीनवरून हटणारच नाही.



तगडी स्टारकास्ट अन् कलाकारांचा दमदार अभिनय

या सीरिजची स्टारकास्ट अत्यंत तगडी आहे. साकिब सलीमसोबतच मराठी अभिनेत्री सई ताम्हणकर, सबा आझाद, आदिनाथ कोठारे, दानिश हुसेन, विपिन शर्मा आणि राजेश तैलंग यांसारख्या दिग्गज कलाकारांची फौज यात आहे. मुख्य म्हणजे, राहुल भट्टने साकारलेला व्हिलन प्रेक्षकांना फार आवडला होता.

कुठे पाहायची क्राइम बीट सीरिज?

क्राइम बीट ही ८ एपिसोड्सची सीरिज आहे. ती तुम्ही झी५ वर पाहू शकता. वीकेंडला जर तुम्ही बोअर होत असाल आणि तुम्हाला क्राइम मिस्ट्री आवडत असेल, तर तुम्ही ही सीरिज झी५ वर पाहू शकता.

ही सीरिज हिंदी भाषेत उपलब्ध आहे. 'क्राइम बीट' सीरिजला आयएमडीबीवर ६ रेटिंग मिळाले आहे.

सबा आझाद व साकिबने आधी एकत्र केलंय काम

दरम्यान, साकिब सलीम आणि सबा आझाद यांनी यापूर्वी २०११ मध्ये आलेल्या 'मुझसे फ्रेंडशिप करोगे' या चित्रपटात एकत्र काम केले होते.

याच चित्रपटातून या दोघांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. साकिब आणि सबा यांच्यात उत्तम बाँडिंग आहे आणि त्यांची ही केमिस्ट्री पडद्यावरही दिसते. तुम्ही ही सीरिज पाहिली नसेल तर या वीकेंडला नक्की पाहू शकता.

## आलियाचा बोल्ड 'शो गर्ल' अवतार चर्चेत

संजय लीला भन्साळी हे गेल्या काही वर्षांपासून त्यांच्या बहुचर्चित 'लव्ह अँड वॉर' या सिनेमावर काम करत होते. हा सिनेमा आता पूर्णत्वास आला असून, येत्या जानेवारीमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातील कलाकारांचे लूक आता समोर येण्यास सुरुवात झालेली आहे. सर्वात आधी रणबीर कपूरचा लूक समोर आला. परंतु नुकताच समोर आलेल्या आलियाच्या लूकने इंटरनेटचं तापमान चांगलंच वाढवलं आहे. आलियाचा ग्लॅमरस अंदाज पाहून सोशल मीडियावर चर्चेला उधाण आले आहे. मुख्य म्हणजे आलियाचा हा ग्लॅमरस अंदाज पाहून झीनत अमान यांनाही प्रतिक्रीया देण्याचा मोह आवरता आला नाही.आलियाचा पहिला लूकमधील फोटो हा कॅबरे डान्सरमधील असून, ती शो गर्ल दिसत आहे. वाईन रेड रंगाचा क्रॉप टॉप, त्याला मॅचिंग फ्लोइंग स्कर्ट आणि थाय हाय स्लिट असा तिचा ग्लॅमरस लूक आहे. तिच्या डोक्यावर असलेल्या पिसांनी तर या लूकला आणखीच शोभा आली आहे. आलियाने आत्तापर्यंत साकारलेल्या भूमिकांपेक्षा हा लूक वेगळा असल्याने सर्वत्र या लूकची चर्चा होऊ लागली आहे.



आलियाने हा फर्स्ट लूक सोशल मीडियावर शेअर करताच चाहत्यांसोबतच अनेक सेलिब्रिटींनीही तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.

## 'माझ्या आयुष्यातील शत्रूंचा देवीने नाश करावा

बॉलिवूड अभिनेता गोविंदा आणि त्यांची पत्नी सुनीता आहुजा यांच्यातील वैवाहिक आयुष्याबाबत गेल्या काही दिवसांपासून सातत्यानं चर्चा सुरू आहेत. यातच गोविंदानं कथित गर्लफ्रेंडसोबत लालबागच्या राजाचं दर्शन घेतल्यानं चर्चेला हवा मिळाली. या सगळ्यानंतर आहुजानं कोलकाता इथल्या प्रसिद्ध दक्षिणेश्वर काली मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले आणि प्रसारमाध्यमांशी बोलताना आपल्या आयुष्यातील संघर्षावर भाष्य केलं.



माझ्या आयुष्यातही काही राक्षस आहेत आणि देवीनं त्यांचा नाश करावा, अशी मी प्रार्थना केली आहे,असं विधान करत तिनं जेन झी आणि महिलांना आपल्याला पाठिंबा देण्याचं आवाहन केलं आहे.

मंदिरात दर्शन घेतल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना सुनीता भावुक झाली होती. तुम्हा सर्वांना माहीत आहे की माता काली राक्षसांचा संहार करते. माझ्याही आयुष्यात काही राक्षस प्रवेश करून आहेत आणि मी मातेला प्रार्थना करायला आले आहे की तिनं त्यांचा नाश करावा. काही लोक केवळ पब्लिसिटी आणि प्रसिद्धीसाठी हे सर्व करत आहेत. जे काही माझ्यासोबत घडत आहे ते योग्य नाही. विनाकारण माझं घर उद्ध्वस्त केलं जात आहे.

आपलं दुःख व्यक्त करताना सुनीतानं विशेषतः आजच्या तरुण पिढीला आणि महिलांना पुढं येण्याचं आवाहन केलं. जर तुमच्या मुलीसोबत किंवा सुनेसोबत असं काही घडलं असतं तर तुम्ही काय केलं असतं? मी सर्वांना विनंती करते की मला पाठिंबा द्या. मुलं आहेत आणि महिला आहेत, त्यांनी मला पाठिंबा द्यावा. कारण जे लोक माझं घर तोडण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांना प्रसिद्धी देऊ नका.गेल्या काही दिवसांपासून गोविंदा आणि अभिनेत्री कोमल राणी स्वर्णकार यांच्या नावाची जोरदार चर्चा बॉलिवूड वर्तुळात रंगली आहे.

## ''आई-वडिलांची लाडकी लेक'': मृणाल ठाकूरने शेअर केला आई-बाबांसोबतचा खास फोटो

अभिनेत्री मृणाल ठाकूर सोशल मीडियावर तिच्या कामासोबतच वैयक्तिक आयुष्यातील काही खास क्षणही चाहत्यांसोबत शेअर करत असते. नुकताच तिने आई-वडिलांसोबतचा एक सुंदर फोटो शेअर केला आहे. या फोटोसोबत तिने 'आई-वडिलांची लाडकी लेक' असं कॅप्शन दिलं आहे. मृणालच्या या पोस्टने चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं असून, तिच्या आई-बाबांचा साधा आणि आपुलकीचा अंदाजही नेटकऱ्यांना आवडला आहे.

या फोटोत मृणाल तिच्या आई-वडिलांसोबत दिसत आहे. एकीकडे अभिनेत्री म्हणून ग्लॅमरस अंदाजात दिसणारी मृणाल, तर दुसरीकडे तिच्या आई-वडिलांचा साधेपणा या फोटोमधून प्रकर्षाने जाणवतो. त्यामुळे हा फोटो केवळ एक कौटुंबिक क्षण न राहता मृणालच्या चाहत्यांसाठीही खास ठरला आहे.

धुळ्यातून सुरू झाला प्रवास



मृणाल ठाकूरचा जन्म महाराष्ट्रातील धुळे येथे झाला. अभिनयाच्या क्षेत्रात येण्याचं स्वप्न घेऊन तिने छोट्या पडद्यावरून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. 'मुझसे कुछ कहती... ये खामोशियां' या मालिकेतून तिने अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. त्यानंतर 'कुमकुम भाग्य' मालिकेतील बुलबुल या भूमिकेमुळे ती घराघरात पोहोचली. छोट्या पडद्यावर ओळख निर्माण केल्यानंतर मृणालने मोठ्या पडद्याकडे मोर्चा वळवला. 'लव्ह सोनिया'मधील भूमिकेने तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर 'सुपर ३०', 'बाटला हाऊस', 'जर्सी' यांसारख्या चित्रपटांमध्ये तिने काम केलं. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतही मृणालने आपली वेगळी ओळख निर्माण केली. 'सीता रामम' या चित्रपटातील तिच्या भूमिकेला प्रेक्षकांकडून मोठी पसंती मिळाली. त्यानंतर 'हाय नन्ना' आणि 'द फॅमिली स्टार' यांसारख्या चित्रपटांमधूनही ती प्रेक्षकांच्या भेटीला आली.

आगामी प्रोजेक्ट

मृणालचा २०२६ मध्ये 'डू दिवाने शहर में', 'डाकू' आणि 'हाय जवानी तो इश्क होना है' हे चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. तिचा 'पूजा मेरी जान' हा चित्रपट २ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. याशिवाय ती 'राका' या आगामी चित्रपटातही दिसणार आहे.

## आदिनाथने शेअर केला १९९२चा फोटो

आदिनाथ कोठारेने पुन्हा एकदा युनायटेड किंगडममधील प्रसिद्ध विंडसर कॅसलला भेट दिली. यावेळी त्याने बालपणीच्या आठवणींना उजाळा देत एक खास फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. तब्बल ३४ वर्षांपूर्वी याच ठिकाणी काढलेला फोटो आणि आताचा फोटो पाहून जुन्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत.आदिनाथने शेअर केलेल्या पोस्टमध्ये १९९२ सालचा एक फोटो पाहायला मिळतो. त्यावेळी तो दुसरीत शिकत होता आणि कोठारे कुटुंबाची ती पहिलीच यूके भेट होती. या फोटोत आदिनाथसोबत त्याचे आजी-आजोबा 'डॅडी' आणि 'जेन्मा', तसेच आई-वडील महेश कोठारे आणि नीलिमा कोठारे दिसत आहेत. तब्बल ३४ वर्षांनंतर आदिनाथ पुन्हा त्याच ठिकाणी पोहोचला. विंडसर कॅसलच्या बाहेर उभं राहून त्याने जुन्या फोटोची आठवण करून देणारा नवा फोटो शेअर केला. त्यावेळी काढलेला फोटो आणि आताचा क्षण एकत्र पाहताना त्याच्या बालपणीच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या.ही पोस्ट शेअर करताना आदिनाथने आपल्या दिवंगत आजी-आजोबांची आठवणही काढली.

सध्या आदिनाथ कोठारे त्याचा आगामी बहुप्रतीक्षित आणि बहुचर्चित असलेल्या रामायण या चित्रपटामुळे प्रसिद्धीझोतात आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित या चित्रपटात तो भरत हे पात्र साकारणार आहे. त्याच्या या चित्रपटाची प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.

## 'वेलकम' फेम अभिनेते मुश्ताक खान यांचे निधन



वेलकम', 'आशिकी' आणि 'मुझसे शादी करोगी' यांसारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांमधून आपल्या अभिनयाची आणि विनोदाची छाप सोडणारे बॉलिवूडचे सुप्रसिद्ध अभिनेते मुश्ताक खान यांचे निधन झाले आहे. वयाच्या ५६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. यकृताच्या कर्करोगामुळे त्यांचे निधन झाल्याची अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे.

**बॉलिवूड चित्रपट पहा**

गेल्या १५ दिवसांपासून त्यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक होती. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही त्यांची कर्करोगाशी झुंज अपयशी ठरली.

मुश्ताक खान यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ आपल्या उत्कृष्ट विनोदी शैलीने आणि विविध पात्रांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले होते. 'हम हैं राही प्यार के', 'जोडी नंबर १' आणि विशेषतः 'वेलकम' मधील त्यांच्या भूमिका प्रचंड गाजल्या होत्या. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण बॉलिवूड आणि मनोरंजन विश्वावर मोठी शोककळा पसरली असून, चाहत्यांसह अनेक दिग्गज कलाकारांकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली जात आहे.

## महेश भट्ट यांच्याशी लग्न केल्यानंतर एका रात्रीत.....

सोनी राजदान म्हटलं की काही जण आलिया भट्टची आई म्हणतात, तर काही दिग्दर्शक महेश भट्ट यांची दुसरी पत्नी म्हणतात. मात्र या सर्व भूमिका आयुष्यात येण्यापूर्वी सोनी एक उत्तम अभिनेत्री होत्या. त्यांनी 'सारांश'सारखे चित्रपट तसेच 'बुनियाद'सारख्या टीव्ही मालिकांमधून आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. महेश भट्ट यांच्याशी लग्न केल्यावर आयुष्य कसं बदललं, याबाबत सोनी राजदान व्यक्त झाल्या आहेत.



'झूम'ला दिलेल्या मुलाखतीत सोनी म्हणाल्या, 'मी लग्न केलं, त्याआधीपासूनच मी काम करत होते. त्यामुळे ते काम सुरूच राहिले, पण त्यानंतर मात्र काहीच काम मिळालं नाही. शून्य. लग्नानंतर एका रात्रीत सगळं बदललं. मला काम मिळणंच बंद झालं.' सोनी आणि महेश यांचं लग्न १९८६ मध्ये झालं होतं. तेव्हापर्यंत सोनी राजदान यांनी पुरेसं काम केलं होतं.

महेश भट्ट सोनी राजदान यांना काय म्हणाले होते?

अचानक काम मिळणं बंद झालं, त्याबद्दल सोनी यांनी पतीला विचारलं. त्यावर महेश भट्ट यांनी सोनीला सांगितलं की इंडस्ट्रीचे लोक त्यांना म्हणतात, 'तुमच्या पत्नीला काम करण्याची काय गरज आहे? तिचं लग्न झालंय ना?' लग्नानंतर महिलांनी काम सोडून दिलं पाहिजे या विचारसरणीची सोनी यांना अजिबात सवय नव्हती. 'ही गोष्ट माझ्यासाठी पूर्णपणे वेगळी होती. माझी विचारसरणी किंवा मानसिकता तशी नव्हती. पण त्या काळात बरेच लोक असाच विचार करायचे,' असं त्या म्हणाल्या.

त्याकाळी अभिनेत्री लग्न उशीरा करायच्या कारण लग्न केलं की करिअर संपलं, असं तेव्हा समजलं जायचं. 'या कारणामुळेच अभिनेत्री लग्नाची घाई करायच्या नाहीत. पण मी प्रेमात होते, त्यामुळे मला लग्न करायचंच होतं,' असं त्या म्हणाल्या. त्यांनी चित्रपटसृष्टीतील पुरुषप्रधान दृष्टिकोनावरही भाष्य केलं. 'ती पूर्णपणे पुरुषी मानसिकता होती. आकर्षक स्त्रीची व्याख्या वगैरे सगळं काही पुरुषांच्या दृष्टिकोनातून ठरायचं. मुळात स्त्रीने फक्त आकर्षकच का असलं पाहिजे? मला कळतंय की चित्रपटात लोक तुम्हाला अडीच तास पाहणार आहेत, पण त्याचा अर्थ असा नाही की तुम्ही नात्यात राहू शकत नाही.'सोनी राजदान यांच्यामते, कलाकाराला उत्तम अभिनय यायला हवा, त्याच्या वैयक्तिक आयुष्याचा कामावर परिणाम होऊ नये. दरम्यान, सोनी राजदान यांचा 'शक: ट्रस्ट नो वन' सिनेमा नुकताच नेटफ्लिक्सवर रिलीज झाला आहे. यात परिणीती चोप्रा व जेनिफर विंगेट आहेत.

## सोनाली बेंद्रेची मराठी सिनेविश्वात नवी सुरुवात

बॉलीवूडमध्ये आपल्या दमदार अभिनय व सौंदर्याने सर्वांची मने जिंकणारी अभिनेत्री म्हणजे सोनाली बेंद्रे. मराठी कुटुंबातील सोनालीने बॉलीवूडमध्ये अनेक सिनेमांमध्ये काम करीत तिची वेगळी ओळख निर्माण केली. यानंतर तिने दोन दशकांपूर्वी मराठी सिनेमांमध्ये कॅमिओ भूमिका केल्या होत्या;पण आता सोनाली बेंद्रे पुन्हा मराठी सिनेविश्वाकडे वळाली असून, सोशल मीडियावर तिने आगामी मराठी सिनेमाचे पोस्टर शेअर केले आहे.सोनाली बेंद्रे ही अभिनेत्री म्हणून नाही तर सिनेमाची प्रस्तुतकर्ती म्हणून काम करीत आहे.



सोनालीने बालकलाकारांच्या भन्नाट अभिनयावर आधारित असलेल्या 'सोहळा' सिनेमाचे पोस्टर इन्स्टाग्रामवर शेअर केले आणि पहिल्याच मराठी सिनेमामध्ये प्रस्तुतकर्ती म्हणून काम करण्याबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत.

'सोहळा' सिनेमाबाबत काय म्हणाली सोनाली बेंद्रे?'सोहळा' सिनेमाचे पोस्टर शेअर करत सोनाली बेंद्रेने लिहिले, ''सोहळा' या खूप खास चित्रपटाचं पहिलं पोस्टर मी शेअर करीत आहे. या सिनेमाच्या माध्यमातून मी पहिल्यांदाच 'फिल्म प्रेझेंटर' (सिनेमा सादरकर्ती) म्हणून काम करतेय. या सिनेमाची गोष्ट ही वय वाढताना आणि मोठे होताना येणारे अनुभव, कुटुंब, स्वप्नं आणि आपल्याला घडवणारे निर्णय यांवर आधारित असणार आहे.

**डिजिटल साक्षरता ही केवळ तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता नाही, ती विवेकाने तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता आहे. ग्रामीण नागरिक असो, विद्यार्थी असो, महिला असो किंवा ज्येष्ठ नागरिक, प्रत्येकाला डिजिटल जगात सुरक्षितपणे वावरता आले पाहिजे. अक्षरज्ञान प्रत्येकासाठी आणि डिजिटल ज्ञान प्रत्येकाच्या हातात हा संकल्प प्रत्यक्षात उतरवला तरच डिजिटल भारत अधिक सक्षम, सुरक्षित आणि समावेशक बनेल.**

# डिजिटल साक्षरता महत्त्वाची



प्रसाद शिरोडकर

साक्षरतेचा संबंध आता केवळ शैक्षणिक गुणवत्ता किंवा वाचता आले आणि लिहिता आले यापुरता मर्यादित राहिला नसून आजच्या काळात त्याचे समीकरण बदललेले आहे. ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा केला गेला. व्यक्तीच्या विकासाबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे.

साक्षरता व्यक्तीला माहिती समजून घेण्याची, निर्णय घेण्याची आणि आपल्या हक्कांसाठी उभे राहण्याची क्षमता देते. डिजिटल युगात या क्षमतेला तंत्रज्ञानाच्या ज्ञानाची जोड मिळणे आवश्यक झाले आहे. साक्षरता म्हटले की अक्षर ओळखता येणे, वाचता आणि लिहिता येणे एवढाच त्याचा पारंपरिक अर्थ आपल्या मनात येतो. मात्र तंत्रज्ञानाने आपल्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. स्मार्टफोन, इंटरनेट, डिजिटल बँकिंग, ऑनलाईन शिक्षण, सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. त्यामुळे आजच्या युगात केवळ अक्षरज्ञान पुरेसे नाही, तर डिजिटल साधनांचा सुरक्षित, जबाबदार आणि विवेकी वापर करता येणे ही आधुनिक साक्षरतेची नवी ओळख आहे. भारतात यूपीआय आणि डिजिटल पेमेंट याचे उत्तम उदाहरण म्हणजे डिजिटल साक्षरता आहे. शहरांपासून छोटय़ा गावांपर्यंत, चहाच्या टपरीपासून किराणा दुकानापर्यंत क्यूआर कोड दिसतो. गावखेडय़ातील ग्राहकसुद्धा मोबाईलवरून काही सेपंदांत पैसे देतो आहे. मात्र डिजिटल व्यवहार करता येणे एवढेच पुरेसे नाही. एखाद्याने 'तुमच्या खात्यात पैसे जमा करण्यासाठी हा क्यूआर कोड स्पॅन करा' असे सांगितल्यास पैसे मिळण्याऐवजी आपल्या खात्यातून पैसे जाऊ शकतात, हे समजणेहीसुद्धा तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे डिजिटल साक्षरतेबरोबरच आर्थिक सुरक्षिततासुद्धा तितकीच महत्त्वाची आहे.

ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार हे डिजिटल साक्षरतेच्या अभावाचे गंभीर उदाहरण आहे. 'तुमचे बँक खाते बंद होणार आहे', 'तुमचे केवायसी अपडेट करा' किंवा 'तुम्हाला बक्षीस मिळाले आहे' अशा संदेशांसोबत बनावट लिंक पाठवली जाते. घाईघाईने लिंक उघडून बँक तपशील, पासवर्ड किंवा ओटीपी दिल्यास मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. डिजिटल साक्षर नागरिक अशा संदेशांवर त्वरित विश्वास न ठेवता अधिकृत माध्यमातून त्याची पडताळणी करतो. ओटीपी, पासवर्ड किंवा पिन कोणालाही न देणे हा साधा नियम अनेकांना आर्थिक फसवणुकीपासून वाचवू शकतो.

डिजिटल साक्षरतेचा फायदा ग्रामीण भागालाही मोठय़ा प्रमाणात होऊ शकतो. उदाहरणार्थ, शेतकरी मोबाईलवरून हवामानाचा अंदाज, बाजारभाव, कृषीविषयक माहिती आणि विविध सरकारी योजनांची माहिती मिळवू शकतो. पावसाचा अंदाज पाहून शेतीची कामे नियोजित करता येतात किंवा वेगवेगळ्या बाजारपेठांमधील दरांची माहिती घेऊन माल विक्रीचा निर्णय घेता येतो. मात्र सोशल मीडिया किंवा अनोळखी व्हॉट्सअॅप समूहातून मिळालेली प्रत्येक कृषीविषयक माहिती खरी असेलच असे नाही. त्यामुळे माहिती मिळवण्याबरोबरच तिची सत्यता तपासणे महत्त्वाचे आहे.

शिक्षण क्षेत्रातही डिजिटल माध्यमांनी मोठी संधी निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील एखादा विद्यार्थी मोबाईल किंवा संगणकाच्या माध्यमातून ऑनलाईन व्याख्याने पाहू शकतो, ई-पुस्तके वाचू शकतो आणि विविध विषयांचा सराव करू शकतो. पूर्वी चांगल्या शिक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी शहरात जाण्याची गरज होती. आज इंटरनेटमुळे ज्ञानाचे जग मोठय़ा प्रमाणात सर्वांसाठी खुले झाले आहे. परंतु मोबाईलचा वापर अभ्यासाऐवजी केवळ मनोरंजनासाठी होऊ नये यासाठी विद्यार्थ्यांना डिजिटल शिस्त आणि माहितीचे चिकित्सक आकलन शिकवणे गरजेचे आहे. सोशल मीडियावरील चुकीची माहिती हे डिजिटल युगातील आणखी एक मोठे आव्हान आहे. एखादा जुना व्हिडीओ नवीन घटनेचा म्हणून प्रसारित केला जातो, बनावट छायाचित्रे खरी असल्याचा दावा केला जातो किंवा एखाद्या व्यक्तीच्या नावाने खोटे वक्तव्य व्हायरल केले जाते. अशा वेळी कोणतीही पोस्ट पुढे पाठवण्यापूर्वी तिचा स्रोत, तारीख आणि विश्वासार्ह माध्यमांमधील माहिती तपासणे आवश्यक आहे. आज 'वाचता येणे' इतकेच नव्हे, तर वाचलेल्या माहितीचे मूल्यमापन करता येणे हीदेखील साक्षरतेची कसोटी आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता विशेष महत्त्वाची आहे. ऑनलाईन बँकिंग, रेल्वे आरक्षण, बिल भरणे, सरकारी सेवा आणि व्हिडीओ कॉल यांसारख्या सुविधांमुळे त्यांचे जीवन सुलभ होऊ शकते. मात्र त्यांना डिजिटल फसवणुकीपासून सुरक्षित राहण्याचे प्रशिक्षण देणेही तितकेच आवश्यक आहे. कुटुंबातील तरुणांनी ज्येष्ठांना मोबाईल वापर शिकवताना पासवर्ड, पिन आणि ओटीपीची गोपनीयता याबाबतही जागरूक करणे गरजेचे आहे. आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात डिजिटल साक्षरतेचा अर्थ आणखी व्यापक झाला आहे. एआयच्या मदतीने मजकूर, चित्रे आणि विविध प्रकारची माहिती काही क्षणांत तयार करता येते, परंतु एआयने दिलेली प्रत्येक माहिती अचूक असेलच असे नाही. त्यामुळे तंत्रज्ञानावर पूर्णपणे अवलंबून न राहता माहितीची पडताळणी करण्याची सवय आवश्यक आहे. डिजिटल साक्षरता ही केवळ तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता नाही, ती विवेकाने तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता आहे. ग्रामीण नागरिक असो, विद्यार्थी असो, महिला असो किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला डिजिटल जगात सुरक्षितपणे वावरता आले पाहिजे. अक्षरज्ञान प्रत्येकासाठी आणि डिजिटल ज्ञान प्रत्येकाच्या हातात हा संकल्प प्रत्यक्षात उतरवला तरच डिजिटल भारत अधिक सक्षम, सुरक्षित आणि समावेशक बनेल. कारण डिजिटल युगातील खरी साक्षरता म्हणजे केवळ स्क्रीनवरचे शब्द वाचणे नव्हे, तर त्यातील सत्य ओळखणे, योग्य निर्णय घेणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे होय. नाहीतर आपण या डिजिटल महाजालात केव्हा फसले जाऊ हे काही सांगता येणार नाही.

# दुष्काळी गालिचा...




छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दुष्काळ पाहणी दौऱ्यादरम्यान मंत्र्यांच्या स्वागतासाठी पसरलेल्या फुलांच्या गालिचाची चित्रफीत सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे.

'सर्व टीकाकार तसेच माध्यमकर्मींनो, दुष्काळाच्या छायेत असलेल्या जनतेला दिलासा देण्यासाठी अहोरात्र झटत असताना तुम्ही माझी एक चित्रफीत फिरवून जो पोरकटपणा लावलाय त्याचा सर्वप्रथम तीव्र निषेध करतो. छत्रपती संभाजीनगरच्या ग्रामीण भागात दुष्काळी गावांना भेटी देत असताना एके ठिकाणी फुलांच्या गालिचावरून चाललो. त्यामागची वेगळी कथा तुम्हाला ठाऊक नाही नतद्रष्टांनो! या गावच्या शिवारातील सर्व पिके करपली पण काही ठिकाणी फुलांची शेती शाबूत आहे असे मला कळले. मी लगेच सोबतच्या कार्यकर्त्यांना पाठवून सर्व फुले रोखीने विकत घेतली. त्यामुळे शेतकऱ्यांना पैसे मिळाले. त्यांचे चेहरे फुलासारखे टवटवीत झाले.

पैसे घ्या पण फुले तुमच्याजवळच ठेवा असे माझे सांगणे होते. मग त्या फुलांचे करायचे काय असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला व त्यांनी माझ्या स्वागतासाठी त्याचा गालिचा अंथरला. त्यावरून चालत मी ज्या घरात गेलो तिथे अनेक शेतकरी जमलेले. सरकारची मदत मिळेल तेव्हा मिळेल पण मी तुम्हाला माझ्या खिशातून मदत करायला तयार आहे असे आश्वासन देत फूलखरेदीचा प्रसंग सांगितला. त्यामुळे प्रेरित होऊन सर्वांनी फुलांची शेती करण्याचा निर्णय जाहीर केला.

पिकांपेक्षा फुलांच्या शेतीला पाणी कमी लागते असेही त्यांचे म्हणणे होते. जोवर या भागावर दुष्काळाची छाया आहे तोवर मी या भागात नियमितपणे येत राहीन. तुम्ही माझे स्वागत हारतुरे घालून करू नका. असाच गालिचा अंथरा व जेवढी फुले वापरली त्याचे पैसे माझ्याकडून घ्या असे वचन मी दिले. हे ऐकून त्यांच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद मी कधीही विसरणार नाही. दुष्काळाच्या चिंतेत असलेल्या एका गावाला माझ्या या कृतीमुळे समाधान मिळत असेल तर हा क्षण मी सर्वोच्च समजतो.

आमचे लाडके मुख्यमंत्री देवाभाऊ बांधावर फिरताहेत. त्यांचाच आदर्श घेत आम्ही सर्वजण गावागावात जाताहोत. बांधावरच्या चित्रफिती तयार करण्यापेक्षा स्वागतासाठी वापरलेल्या फुलांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट मदत ही कल्पना मला नावीन्यपूर्ण वाटली. त्यामुळे ही चित्रफीत मी प्रसारित होऊ दिली. मात्र टीकाकारांनी त्याचा वेगळाच अर्थ काढून माझ्यासारख्या कर्तव्यतत्पर मंत्र्यांची नाहक बदनामी चालवली आहे.

दुष्काळी दौरे करताना शेतकऱ्यांचे नुसते सांत्वन करण्यापेक्षा त्यांच्या हातात काही पडेल अशी कृती मी केली. संकटात असलेल्या लोकांना थेट मदत करणे ही आमच्या पक्षाची व शिंदे साहेबांची परंपरा आहे. आमच्या मराठवाड्याला दुष्काळ नवा नाही. त्यामुळे बांधावरून फिरणे नित्याचेच. त्यापेक्षा फुलांच्या नाजूकपणात समृद्धी दडली आहे असा संदेश गावोगाव पोहचवणे मला महत्त्वाचे वाटले. याला कुणी निझामशाहीची आठवण म्हणत असेल तर त्याच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते. शेवटी एकच सांगतो. 'परिस्थिती कशीही असो, फुलासारखे उमलत राहा. आयुष्याचा प्रत्येक क्षण आनंदात जगून पाहा.'

# खगोल अभ्यास

जागतिक खगोल दिवसाची संकल्पना १९७३ मध्ये डॉ. बर्गर यांनी मांडली. ते उत्तर कॅलिफोर्नियाच्या खगोल-संस्थेचे अध्यक्ष होते. वर्षातून दोन वेळा दोन मोसमात खगोल दिवस असावा असं त्यांना वाटलं. त्यांच्याकडच्या वसंत ऋतुमधला खगोल दिन १७ सप्टेंबरला, तर दुसरा एप्रिलमध्ये असं ठरलं. परंतु याला 'युनेस्को' वगैरे जागतिक संस्थांचा दुजोरा नाही. कारण जगात विविध देशांत खगोलशास्त्राचा अभ्यास करणारे अव्यावसायिक खगोल अभ्यासकही असतात. त्यांच्या पैकी काही धूमकेतू, अशनींचे शोधही लावतात. त्यामुळे त्यांचं महत्त्वसुद्धा व्यावसायिक खगोल वैज्ञानिकांसारखंच असतं. कदाचित त्यातूनच पुढे व्यावसायिक खगोल अभ्यासक घडतात. हा आमच्या 'खगोल मंडळा'चा गेल्या चार दशकांतला यशस्वी अनुभव आहे.

खगोलीय अभ्यासाची आवड आणि प्रत्यक्ष आकाशदर्शन याची सांगड घालून तयार केलेला सुटसुटीत अभ्यासक्रम 'आवड' म्हणून पूर्ण करणाऱ्या अनेकांमध्ये याच विषयाची व्यवसायासाठी निवड करण्याची उर्मी उत्पन्न होते. हे अशा अव्यावसायिक संस्थाचं मोठं यश. मुंबईचं खगोल मंडळ, पुण्याची ज्योतिर्विद्या संस्था, बंगळुरूची हौशी अभ्यासकांची संस्था अशा अनेक संस्था देशभर आहेत. उत्तर आणि उत्तर-पूर्व हिंदुस्थानातल्या तरुणाईलाही अथांग अवकाश कसं साद घालतं ते आम्हाला राष्ट्रीय सेमिनारसारख्या कार्यक्रमातून समजतं. ३१ मे रोजी देशाच्या पंतप्रधानांनी आधी उल्लेख केलेल्या संस्थांची दखल त्यांच्या 'मन की बात' कार्यक्रमात घेतली हे विशेष.



**खगोलशास्त्र कोर्स शोधा**

सरकार आणि समाज दोघांचाही सहभाग असेल तर संविधानात उल्लेखिलेल्या वैज्ञानिक जाणिवेचा प्रसार होईल. आधुनिक काळात विज्ञान वाढतंय. त्याचा वेग अफाट आहे. रचनात्मक कार्यासाठी त्याचा उपयोग करून घेणं आपल्या सर्वांच्या हाती आहे. त्यातही खगोलशास्त्राचा अभ्यास आपल्याला 'विश्व परिचय' घडवतो. खऱ्या अर्थाने आपण मुळातच 'वैश्विक' असल्याची जाणीव करून देतो. विश्वामध्ये एका ठिपक्याएवढाही नसलेल्या पृथ्वी नावाच्या ग्रहावरचं आपलं अस्तित्व जेव्हा विश्वाचा धांडोळा घेऊ लागतं तेव्हा माणसाच्या मेंदूची किमया ध्यानात येते. त्याविषयी सखोल 'विचार' मात्र कुणी करत नाहीत ही आमच्यासारख्यांची खंत असते.

अशावेळी अनेक वैज्ञानिक दिवसांच्या निमित्ताने जग विज्ञानाबाबत सजग बनत असेल तर ते चांगलंच. तसं झालं तर वैज्ञानिक संशोधनांच्या बऱ्या-वाईटचाही जग साकल्याने आढावा घेत राहील. विश्वाचा अभ्यासही पृथ्वीच्या कल्याणा साठीच असतो. अशाच अभ्यासातून अवकाशातील काही धुमकेतू किंवा अशनींचे संभाव्य धोके समजू शकतात.

# जागतिक संतुलनाचा नवा नकाशा

४ दिनांक ४ सप्टेंबर, २०२६ रोजी, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने 'नकाशा दुरुस्त करा' (करेक्ट द मॅप) असा ऐतिहासिक ठराव मंजूर केला. १६व्या शतकातील मर्केटर प्रक्षेपणातील गंभीर भौगोलिक विकृती किंवा विपर्यास दूर करण्यासाठी हा ठराव मांडण्यात आला होता. जगाच्या सध्या वापरात असलेल्या पारंपरिक नकाशामुळे आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि दक्षिण आशिया ही भूखंडे प्रत्यक्षात आहेत त्यापेक्षा खूपच लहान दिसतात आणि त्यामुळे जगातील देशांबद्दलचा एक असंतुलित जागतिक दृष्टिकोन तयार होतो. मर्केटर प्रक्षेपणामुळे विषुववृत्ताजवळील प्रदेशांचे महत्त्वही कमी होते त्यामुळेही अशा दुरुस्तीची आवश्यकता होतीच. हा ठराव कोणताही विशिष्ट जागतिक नकाशा स्वीकारीत नाही किंवा प्रमाणित करीत नाही; तसेच तो आंतरराष्ट्रीय सीमा, वादग्रस्त प्रदेश किंवा स्थान नावे यांसह राजकीय नकाशाशास्त्राशी संबंधित मुद्द्यांवर भाष्य करीत नाही. संयुक्त राष्ट्रांचा हा ठराव पूर्णपणे दृश्य प्रमाणांवर केंद्रित आहे. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त सीमा, सार्वभौमत्व किंवा वादग्रस्त प्रदेशांची कायदेशीर स्थिती बदलत नाही.

१६व्या शतकापासून प्रचलित असलेल्या मर्केटर या प्रक्षेपण प्रकारावर टीका झाली आहे, कारण आफ्रिका खंड प्रत्यक्षात १४ पट मोठा असूनही, त्यात तो ग्रीनलँडच्या आकाराएवढाच दाखवला आहे. या जुन्या नकाशांच्या प्रमाणांमुळे विषुववृत्तीय देशांच्या विकासाच्या गरजा आणि व्याप्तीबद्दल जगाची धारणा नकारात्मक होते असेही अनेकांचे मत होते.

जागतिक नकाशानिर्मितीचा विकास ही खरे म्हणजे स्थानिक पौराणिक कथांपासून ते सध्याच्या सखोल सांख्यिकी विज्ञानापर्यंत झालेल्या मानवी दृष्टिकोनाच्या स्थित्यंतराची कहाणी आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, जागतिक नकाशांनी आपल्या दृष्टिकोनात लक्षणीय विपर्यास निर्माण केला होता. सुरुवातीचे नकाशे स्थानिक ज्ञान, आदिम साधने आणि राजकीय किंवा आध्यात्मिक पूर्वग्रहांमुळे मर्यादित झाले होते.

प्राचीन ग्रीक नकाशाकार ?नाक्झिमँडर हे नकाशा निर्मितीचे जनक मानले जातात. दुसऱ्या शतकातील टॉलेमीच्या 'जिओग्राफिया'सारख्या नकाशांनी अक्षांश आणि रेखांशाची ओळख करून दिली. हे नकाशे खलाशी आणि शोधकर्त्यांच्या एकत्र जोडलेल्या रोजनिशींच्या आधारे, मातीच्या पाट्या, चर्मपत्र यावर अत्यंत काळजीपूर्वक हाताने रेखाटले जात असत.

१६ते १८व्या शतकात आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधी, जागतिक नकाशे करण्यासाठी अचूक सर्वेक्षण हे त्रिकोणीकरणाद्वारे (ट्रँग्युलेशन) विकसित झाले, ज्यात भौमितिक जाळ्यांचा वापर करून आणि दूरच्या उंच ठिकाणांमधील अचूक कोन मोजून गणितानुसार अंतराची गणना केली जात असे.

आधुनिक नकाशे आता प्रवाशांच्या हाताने लिहिलेल्या अहवालांवर आणि वर्णनांवर अवलंबून राहत नाहीत. ते उपग्रह दूरसंवेदन, जीआयएस (भौगोलिक माहिती प्रणाली, गुगल मॅप्ससारखे प्लॅटफॉर्म) याचा उपयोग करून केले जातात.

जागतिक नकाशा म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागाचा बहुतेक किंवा संपूर्ण भाग दर्शवणारा नकाशा. जागतिक नकाशांना, त्यांच्या प्रमाणामुळे, प्रक्षेपणाच्या समस्येशी सामना करावा लागतो. द्विमितीय नकाशे अपरिहार्यपणे पृथ्वीच्या त्रिमितीय पृष्ठभागाचे प्रदर्शन विकृत करतात. जरी हे कोणत्याही नकाशासाठी खरे असले तरी, जागतिक नकाशामध्ये या विकृती पराकोटीला पोहोचतात.

जागतिक नकाशा तयार करण्यासाठी पृथ्वी, तिचे महासागर आणि तिचे खंड यांचे जागतिक ज्ञान आवश्यक असते. प्रागैतिहासिक काळापासून मध्ययुगापर्यंत, एक अचूक जागतिक नकाशा तयार करणे अशक्य होते, कारण पृथ्वीच्या अर्ध्याहून कमी किनारपट्टी आणि तिच्या खंडांच्या अंतर्गत भागांचा केवळ एक छोटासा अंशच कोणत्याही संस्कृतीला ज्ञात होता. युरोपीय प्रबोधनकाळात सुरू झालेल्या शोधमोहिमांमुळे, पृथ्वीच्या पृष्ठभागाचे ज्ञान वेगाने जमा झाले, ज्यामुळे १७०० च्या दशकाच्या मध्यापर्यंत जगातील बहुतेक किनारपट्टीचे, किमान अंदाजे, नकाशे तयार झाले होते आणि विसाव्या शतकापर्यंत खंडांच्या अंतर्गत भागांचे नकाशे तयार झाले होते.

जगाचे नकाशे सामान्यतः राजकीय वैशिष्ट्यांवर किंवा भौतिक वैशिष्ट्यांवर लक्ष केंद्रित करतात. राजकीय नकाशे प्रादेशिक सीमा आणि मानवी वस्तीवर भर देतात. सर्व जागतिक नकाशे अनेक नकाशा प्रक्षेपणांपैकी एकावर आधारित असतात, म्हणजेच पृथ्वीगोलाला एका सपाट पृष्ठभागावर दर्शवण्याच्या पद्धतींवर. सर्व प्रक्षेपणे भौगोलिक वैशिष्ट्ये, अंतर आणि दिशा यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे विकृत करतात. विकसित झालेली विविध नकाशा प्रक्षेपणे अचूकता आणि जागतिक नकाशे बनवण्यामध्ये अंतर्भूत असलेली अपरिहार्य विकृती यांच्यात संतुलन साधण्याचे वेगवेगळे मार्ग प्रदान करतात.

सुरुवातीच्या जागतिक नकाशांमध्ये लोहयुगापासून ते शोधयुगापर्यंत आणि आधुनिक काळाच्या सुरुवातीच्या काळात आधुनिक भूगोलाच्या उदयापर्यंतच्या जगाच्या चित्रणांचा समावेश होतो. जुने नकाशे भूतकाळात ज्ञात असलेल्या ठिकाणांविषयी माहिती देतात, तसेच त्या नकाशाचा तात्त्विक आणि सांस्कृतिक आधारही स्पष्ट करतात, जो अनेकदा आधुनिक नकाशाशास्त्रापेक्षा खूप वेगळा होता. नकाशे हे एक असे माध्यम आहे, ज्याद्वारे शास्त्रज्ञ आपल्या कल्पना प्रसारित करतात आणि त्या भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवतात.

ज्या तंत्रामुळे पृथ्वीचा गोल पृष्ठभाग द्विमित सपाट प्रदेशावर रूपांतरित केला जातो त्यास प्रक्षेपण (प्रोजेक्शन )असे म्हटले जाते. पृथ्वीवरील खंडे व महासागर यांचा आकार जसा आहे तसा कागदावर प्रक्षेपित करण्याचा यात प्रयत्न केलेला असतो. अर्थातच, प्रत्येक प्रक्षेपणानुसार काही गुणधर्मांत त्रुटी या राहतातच. काही प्रक्षेपणात दोन ठिकाणांतील अंतर बरोबर राहते, पण त्याच्या बदल्यात दिशादर्शनात अवास्तवता येते. काही प्रक्षेपणात आकारांचे निर्देशन बरोबर होते पण त्याचवेळी क्षेत्रफळात चूक होते; असे असले तरी आज पृथ्वीच्या घनगोलाकृतीचे द्विमित कागदावर रूपांतरण करण्याचा प्रक्षेपण हाच एकमेव पर्याय उपलब्ध आहे. भविष्यात कदाचित त्रिमित प्रतिमानी व आभासी यथार्थता या क्षेत्रात अधिक संशोधन होऊन याला उत्तर मिळेलही! नकाशा प्रक्षेपणाचे खमध्य, शंक्वाकृती व दंडगोलीय असे प्रमुख तीन प्रकार असून मर्केटर हा दंडगोलीय प्रक्षेपणाचा प्रकार आहे.



मर्केटर प्रक्षेपण त्याच्या दंडगोलीय गुणधर्मामुळे ध्रुवांजवळील भूभाग ताणते आणि विषुववृत्ताजवळील प्रदेश आकुंचित करते, ज्यामुळे उत्तर अमेरिका आणि युरोपच्या तुलनेत आफ्रिका आणि इतर प्रदेश लहान दिसतात. म्हणूनच हा ठराव, आफ्रिकेसारखे विषुववृत्तीय प्रदेश आकुंचित करणाऱ्या १५६९च्या मर्केटर प्रक्षेपणाऐवजी, 'इक्वल अर्थ' म्हणजेच समान-क्षेत्रफळ दर्शवणाऱ्या नकाशा प्रक्षेपणाला प्राधान्य देतो.

यावेळी १६४ देशांनी ठरावाच्या बाजूने तर अमेरिकेने विरोधात मतदान केले आणि एस्टोनिया, जॉर्जिया, लिथुआनिया, मोल्दोव्हा, सर्बिया आणि युक्रेन या सहा देशांनी मतदानात भाग घेतला नाही.आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि दक्षिण आशिया यांचे अशा नकाशामुळे होणारे प्रतिकात्मक अवमूल्यन रोखण्यासाठी आफ्रिकन युनियन सदस्य राष्ट्रांच्या वतीने आफ्रिकेतील टोगो या देशाद्वारे नकाशा बदलाचा हा प्रस्ताव सादर करण्यात आला. भारताने भूभागांच्या अधिक अचूक चित्रणाला पाठिंबा देत ठरावाच्या बाजूने मतदान केले. टोगोचे परराष्ट्र व्यवहार मंत्री रॉबर्ट डुसे म्हणाले, की एक निष्पक्ष नकाशा, जगाचा भूगोल बदलत नाही, तर तो जगाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोनच बदलतो.

मर्केटर प्रक्षेपण विषुववृत्तापासून दूरचे प्रदेश ताणून भूभागाच्या आकारात मोठ्या प्रमाणात अवास्तवता निर्माण करते, ज्यामुळे उत्तरेकडील राष्ट्रे प्रचंड मोठी दिसतात आणि विषुववृत्तीय प्रदेश लहान दिसतात. याउलट, समान-क्षेत्रफळ दर्शवणारे (इक्वल अर्थ) नकाशा प्रक्षेपण भूभागाचे अचूक सापेक्ष आकार कायम ठेवते. अमेरिकेने या ठरावाला नकाशाशास्त्रीय अचूकतेमुळे नव्हे, तर नकाशा बनवण्याच्या मुद्द्याला वैचारिक आणि राजकीय चौकटीत बसवण्यास आक्षेप घेतल्यामुळे विरोध केला.

टोगोच्या नेतृत्वाखालील प्रस्तावित केलेल्या ठरावाच्या मसुद्यात, मर्केटर नकाशाचे वर्चस्व हे वसाहतवादाचा वारसा आहे, असे स्पष्टपणे मांडण्यात आले होते, आणि 'बौद्धिक न्याय' म्हणून त्यात सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली होती. अमेरिकेच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला, की या भाषेमुळे एका सरळ शैक्षणिक बदलाचे रूपांतर एका 'मूलगामी वैचारिक प्रकल्पात' झाले. अमेरिकेने असा युक्तिवाद केला, की संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने आपला वेळ आणि संसाधने शाळेतील वर्गांच्या भिंतीवरील नकाशांवर वादविवाद करण्याऐवजी तातडीच्या आंतरराष्ट्रीय संकटे, सुरक्षा धोके आणि मानवतावादी समस्यांवर केंद्रित केला पाहिजे. जरी देशांच्या सीमा बदलल्या जाणार नाहीत असे ठरावात म्हटले असले तरी, काही राष्ट्रांना नकाशाशास्त्रात संयुक्त राष्ट्रांच्या हस्तक्षेपाच्या परिणामांबद्दल चिंता वाटत होती. उदाहरणार्थ, ग्लोबल साउथला पाठिंबा देताना, युक्रेनने नमूद केले, की काही 'इक्वल अर्थ' नकाशे रशियाच्या ताब्यातील युक्रेनियन प्रदेश चुकीच्या पद्धतीने दर्शवतात, यावरून नकाशा निवड किती सहजपणे अत्यंत राजकीय बनते हे दिसून येते.त्रिमितीय (थ्री डी) पृथ्वीगोलाला द्विमितीय (टू डी) नकाशावर विकृतीशिवाय सपाट करणे गणितानुसार अशक्य आहे. मर्केटर आणि इक्वल अर्थ प्रक्षेपण या दोन्ही प्रक्षेपणात पूर्णपणे भिन्न भौमितिक गुणधर्मांना प्राधान्य दिले गेले आहे. मर्केटर प्रक्षेपण १५६९मध्ये बेल्जियममधील फ्लेमिश भूगोलज्ञ मर्केटर यांनी नौकानयन (नॅव्हिगेशन) सुकर करण्याच्या उद्देशाने सुचविले होते. हे प्रक्षेपण नौकानयन मार्गांसाठी आवश्यक असलेल्या ऱ्हम्ब (प्लंः) रेषांना सरळ रेषा म्हणून दर्शवण्याच्या गुणधर्मामुळे वापरले जात असे. ऱ्हम्ब लाइन (ज्याला लोक्सोड्रोम असेही म्हणतात) हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एक काल्पनिक मार्ग आहे जो प्रत्येक रेखांश रेषेला एकाच कोनात छेदतो.

**डिजिटल व्यवहारांच्या जगात आतापर्यंत सावधगिरीचा एक साधा नियम सांगितला जात असे- अनोळखी व्यक्तीला ओटीपी सांगू नका, संशयास्पद लिंकवर लिक करू नका, बँक खात्याची माहिती देऊ नका. पण कृत्रिम बुद्धिमत्तेने फसवणुकीचे तंत्र इतके बदलून टाकले आहे की, आता ओळखीच्या व्यक्तीचा आवाजही विश्वासाचा पुरावा राहिलेला नाही. मुलगा, मुलगी, पती, पत्नी, मित्र किंवा वरिष्ठ अधिकारी यांच्याच आवाजात फोन येऊ शकतो आणि तातडीने पैसे पाठविण्याची विनंती केली जाऊ शकते. आवाज अगदी परिचित असतो, बोलण्याची ढबही तशीच असते; फक्त पलीकडे ती व्यक्ती नसते. कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेला हुबेहूब आवाज मोठ्या संकटात ढकलून जातो. 'व्हॉईस क्लोनिंग'च्या या वाढत्या फसवणुकीने सायबर सुरक्षेसमोर नवे आव्हान उभे केले आहे.**

# 'आवाजा'चा भूलभुलैया




**शहाजी शिंदे**

डिजिटलायजेशनच्या युगात अनेक मानवी श्रमाची कामे सुकर झाली; अर्थव्यवस्थेचा वेग वाढला, आर्थिक उलाढाली गतिमान झाल्या, दैनंदिन जीवनमान सुखकर बनले; पण अलीकडील काळात वाढत चाललेल्या फसवणुकांमुळे विश्वासार्हता मात्र लयाला जात आहे. फेक मेसेजेसबरोबरच आता व्हॉईस क्लोनिंगच्या वाढत्या वापरामुळे फोनवर ओळखीच्या आवाजात पलीकडून बोलणारी व्यक्ती खरी आहे का, असा प्रश्न आता पडू लागला आहे.

डिजिटल व्यवहारांच्या जगात आतापर्यंत सावधगिरीचा एक साधा नियम सांगितला जात असे- अनोळखी व्यक्तीला ओटीपी सांगू नका, संशयास्पद लिंकवर लिक करू नका, बँक खात्याची माहिती देऊ नका. पण कृत्रिम बुद्धिमत्तेने फसवणुकीचे तंत्र इतके बदलून टाकले आहे की, आता ओळखीच्या व्यक्तीचा आवाजही विश्वासाचा पुरावा राहिलेला नाही. मुलगा, मुलगी, पती, पत्नी, मित्र किंवा वरिष्ठ अधिकारी यांच्याच आवाजात फोन येऊ शकतो आणि तातडीने पैसे पाठविण्याची विनंती केली जाऊ शकते. आवाज अगदी परिचित असतो, बोलण्याची ढबही तशीच असते; फक्त पलीकडे ती व्यक्ती नसते. कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेला हुबेहूब आवाज मोठ्या संकटात ढकलून जातो. 'व्हॉईस क्लोनिंग'च्या या वाढत्या फसवणुकीने सायबर सुरक्षेसमोर नवे आव्हान उभे केले आहे.

व्हॉईस क्लोनिंग म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या आवाजाचे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने अनुकरण. पूर्वी अशा प्रकारासाठी त्या व्यक्तीच्या आवाजाचे भरपूर ध्वनिमुद्रण आवश्यक असे. आता तंत्रज्ञान इतके पुढे गेले आहे की तुलनेने छोट्या ध्वनिनमुन्यावरूनही आवाजातील लय, चढ-उतार, उच्चार आणि बोलण्याची विशिष्ट ढब यांचे अनुकरण करता येते. त्यानंतर त्या व्यक्तीने प्रत्यक्षात कधीही न उच्चारलेली वाक्ये तिच्याच आवाजासारखी ऐकविता येतात. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने ही प्रगती असली तरी गुन्हेगारांच्या हातात तिचे रूपांतर प्रभावी फसवणूक तंत्रात होत आहे.

या गुह्याला समाजमाध्यमांनी नकळत मोठा कच्चा माल उपलब्ध करून दिला आहे. इन्स्टाग्राम, फेसबुक, यूट्यूब किंवा अन्य मंचांवर आपण स्वतचे व्हिडीओ, रील्स आणि ध्वनिमुद्रणे सहज प्रसिद्ध करतो. त्यातून चेहरा, आवाज, बोलण्याची पद्धत आणि वैयक्तिक आयुष्याशी संबंधित अनेक तपशील सार्वजनिक होतात. फसवणूक करणा-यांना त्यासाठी आता स्वतंत्रपणे आवाज रेकॉर्ड करण्याचीही गरज उरत नाही. समाजमाध्यमांवरील व्हिडीओमधून आवाजाचा नमुना मिळू शकतो आणि त्याच्या आधारे कृत्रिम आवाज तयार करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो.

या फसवणुकीची खरी ताकद मात्र तंत्रज्ञानापेक्षा मानवी भावनांमध्ये आहे. 'माझा अपघात झाला आहे', 'मी अडचणीत आहे', 'तातडीने पैसे पाठव', 'फोन बंद होणार आहे' अशा वाक्यांनी समोरच्या व्यक्तीला विचार करण्यासाठी वेळच दिला जात नाही. आपल्या मुलाचा किंवा जवळच्या नातेवाईकाचा घाबरलेला आवाज ऐकल्यानंतर आई-वडील प्रथम आवाज खरा आहे की खोटा, याचे तांत्रिक परीक्षण करणार नाहीत. ते मदतीसाठी धावतील. गुन्हेगार नेमक्या या भावनिक प्रतिक्रियेचा फायदा घेतात. सायबर फसवणुकीतील हा बदल महत्त्वाचा आहे. पूर्वी फसवणूक प्रामुख्याने माहिती चोरण्यावर आधारित होती; आता ती विश्वास चोरण्याकडे सरकली आहे. म्हणूनच केवळ आवाज ऐकून व्यक्तीची ओळख निश्चित करण्याची सवय बदलावी लागणार आहे. संशयास्पद फोन आला आणि परिचित व्यक्तीने पैसे मागितले तर त्या क्रमांकावर किंवा दुस-या परिचित क्रमांकावर स्वतंत्रपणे फोन करून खात्री करणे हा सर्वांत सोपा बचाव आहे.

समोरची व्यक्ती 'आत्ता फोन करू नको', 'कुणालाही सांगू नको', 'ताबडतोब पैसे पाठव' असा दबाव आणत असेल तर संशय अधिकच बळावायला हवा. फसवणूक करणारा जितकी घाई निर्माण करतो, तितकीच आपली प्रतिक्रिया संथ आणि पडताळणीवर आधारित असायला हवी. कुटुंबाने यासाठी स्वतची छोटी सुरक्षा पद्धतही ठरविणे उपयुक्त ठरू शकते.

एखादा खास प्रश्न, फक्त कुटुंबीयांना माहीत असलेला संदर्भ किंवा आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यासाठी ठरावीक सांकेतिक शब्द यामुळे ओळख पडताळण्यास मदत होऊ शकते.

व्हॉइस क्लोनिंगचा धोका केवळ कुटुंबीयांच्या आर्थिक फसवणुकीपुरता मर्यादित नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या या गैरवापराला उत्तरही तंत्रज्ञानातूनच शोधावे लागेल; परंतु केवळ तंत्रज्ञान पुरेसे ठरणार नाही. संशयास्पद कृत्रिम आवाज शोधणा?या यंत्रणा विकसित होत असल्या तरी बनावट आवाज तयार करणारे तंत्रज्ञानही सतत सुधारत आहे. आज ज्या खुणांवरून कृत्रिम आवाज ओळखता येतो, त्या उद्या अधिक प्रगत प्रणालीत नाहीशा होऊ शकतात. त्यामुळे 'हा आवाज खरा की कृत्रिम?' याचे उत्तर सामान्य नागरिकाने प्रत्येक वेळी स्वत शोधावे, अशी अपेक्षा व्यवहार्य नाही.

बँका, दूरसंचार कंपन्या आणि डिजिटल व्यवहार करणा-या संस्थांची जबाबदारी म्हणूनच वाढते. मोठ्या किंवा असामान्य आर्थिक व्यवहारासाठी अतिरिक्त पडताळणी, संशयास्पद व्यवहारांचे तत्काळ निरीक्षण आणि ग्राहकाला त्वरित सूचना अशा सुरक्षा पद्धती अधिक सक्षम कराव्या लागतील.


फसवणूक झाल्यानंतरही वेळ अत्यंत महत्त्वाचा असतो. आर्थिक व्यवहार झाल्याचे लक्षात येताच बँकेशी संपर्क साधणे आणि अधिकृत सायबर गुन्हे नोंदविण्याच्या व्यवस्थेकडे तातडीने जाणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन १९३० ही अशा आर्थिक सायबर फसवणुकीच्या तक्रारींसाठी महत्त्वाची व्यवस्था आहे. यातील सर्वांत मोठा प्रश्न पुढे येणा-या काळाचा आहे. आतापर्यंत डिजिटल जगात चेहरा आणि आवाज हे व्यक्तीच्या ओळखीचे मजबूत पुरावे मानले जात होते. 'मी त्याला स्वत पाहिले', 'मी त्याचा आवाज ऐकला' या विधानांना विश्वासार्हता होती. कृत्रिम बुद्धिमत्ता नेमक्या याच विश्वासाच्या पायावर घाव घालत आहे. याचा अर्थ तंत्रज्ञानाला विरोध करणे नव्हे.

आवाजाची कृत्रिम निर्मिती अनेक विधायक कामांसाठी उपयोगी ठरू शकते. मात्र एखाद्याचा आवाज त्याच्या परवानगीशिवाय वापरून फसवणूक किंवा दिशाभूल केली जात असेल तर त्यासाठी कायदेशीर आणि तांत्रिक संरक्षण अधिक सक्षम करावे लागेल. डिजिटल मंचांनीही वापरकर्त्यांच्या आवाजाचा आणि दृश्य सामग्रीचा गैरवापर रोखण्यासाठी अधिक प्रभावी उपाय करणे आवश्यक आहे.

सायबर सुरक्षेचा जुना मंत्र होता- 'ओटीपी कुणालाही सांगू नका.' आता त्यात आणखी एक वाक्य जोडण्याची वेळ आली आहे. 'ओळखीचा आवाज ऐकला तरी आधी खात्री करा.' कारण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात फसवणूक करणा-याला तुमचा पासवर्डच हवा असे नाही;

काही वेळा तुमच्या जवळच्या माणसाचा आवाज पुरेसा ठरू शकतो. तंत्रज्ञानाने आवाजाची नक्कल करणे सोपे केले आहे; म्हणून विश्वास ठेवण्यापूर्वी पडताळणी करणे हीच नव्या डिजिटल युगातील सर्वांत आवश्यक सावधगिरी ठरणार आहे.

---



# झुरळांना पळवण्यासाठी....

घरात, विशेषतः स्वयंपाकघरातून झुरळे दूर ठेवण्यासाठी बेकिंग सोडा आणि पिठीसाखरेचे मिश्रण कोप-यात ठेवणे हा एक अत्यंत प्रभावी आणि सोपा घरगुती उपाय आहे. समप्रमाणात बेकिंग सोडा आणि पिठीसाखर एकत्र करून किचनच्या कोप-यात किंवा सिंकखाली ठेवा. साखरेच्या गोड वासाने झुरळे आकर्षित होतात आणि बेकिंग सोडय़ामुळे त्यांचा नाश होतो.

पाण्यात पांढरे व्हिनेगर मिसळून स्प्रे तयार करा. जिथे झुरळे जास्त येतात त्या जागांवर किंवा पाइपजवळ रात्री झोपण्यापूर्वी हा स्प्रे मारा. फरशी पुसण्याच्या पाण्यात कडूलिंबाचे तेल किंवा पाल्याची पावडर वापरा. याच्या उग्र दर्पामुळे झुरळे पळून जातात.

# तांदळाला किडे लागू नयेत म्हणून .....



पावसाळ्यात वातावरणातील आर्द्रता वाढल्यामुळे तांदूळ आणि इतर धान्यांमध्ये किडे होण्याची समस्या वाढू शकते. तांदूळ साठवताना काही सोप्या गोष्टींची काळजी घेतल्यास ही समस्या कमी करता येऊ शकते. तांदूळ पूर्णपणे कोरड्या आणि हवाबंद डब्यात ठेवणे महत्त्वाचे आहे. काचेचे, फूड-ग्रेड प्लास्टिकचे किंवा स्टेनलेस स्टीलचे डबे वापरता येतात. मात्र कोणताही पदार्थ ओलसर नसावा. तांदूळ काढताना ओला चमचा किंवा ओले हात वापरू नका.

डब्यात ओलावा गेल्यास बुरशी आणि किड्यांची समस्या वाढू शकते. तांदळाचा डबा वेळोवेळी तपासावा. ओलावा जाणवत असल्यास तांदूळ स्वच्छ कापडावर पसरवून काही काळ उन्हात ठेवण्याची पद्धत वापरता येते. मात्र तांदळात मोठ्या प्रमाणावर किडे, बुरशी किंवा खराब वास आढळल्यास तो वापरण्याऐवजी सुरक्षिततेच्या दृष्टीने टाकून देणे योग्य ठरेल.

तांदळाच्या डब्यात पूर्णपणे वाळलेली कडुनिंबाची पाने ठेवण्याची पारंपरिक पद्धतही वापरली जाते. त्याचप्रमाणे तमालपत्र आणि सुक्या लाल मिरच्या ठेवण्याचा उपायही केला जातो. किडे दूर ठेवण्यासाठी लवंग ठेवण्याचाही सल्ला दिला जातो.

# गुणकारी ज्येष्ठमध

ही एक अत्यंत गुणकारी आणि आयुर्वेदामध्ये महत्त्वपूर्ण मानलेली औषधी वनस्पती आहे. घसा बसल्यास किंवा खोकला झाल्यास ज्येष्ठमधची पूड मधात मिसळून घेतल्यास घशाला आराम मिळतो आणि खोकला कमी होतो. ही वनस्पती शरीरात थंडावा निर्माण करणारी आहे. त्यामुळे पित्तदोषाशी संबंधित आजार, जळजळ किंवा तोंडातील अल्सरवर याचा चांगला उपयोग होतो.



ज्येष्ठमधची पूड गाईच्या दुधाबरोबर घेतल्यास स्मरणशक्ती आणि मेंदूची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होते असा आयुर्वेदामध्ये उल्लेख आढळतो.

---

# नाचणीची भाकरी रोज खाणे योग्य आहे का?



नाचणीला सुपरफूड मानले जाते, कारण ते वजन नियंत्रित ठेवण्यासाठी, रक्तातील साखर (शुगर) नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि पोटाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी अत्यंत गुणकारी आहे. मात्र, प्रश्न हा आहे की नाचणी रोज खाऊ शकतो का? याविषयीची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**नाचणी पौष्टिक का मानली जाते?**

नाचणी हे एक असे पीक आहे, जे कमी पाण्यात आणि कठीण हवामानातही पिकवले जाऊ शकते.

यामध्ये कॅल्शियम, लोह, फॉस्फरस, पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअम यांसारखी खनिजे चांगल्या प्रमाणात आढळतात.

हे घटक ॲनिमिया दूर करण्यासाठी, पोट दीर्घकाळ भरलेले ठेवण्यासाठी, हाडे मजबूत करण्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करतात.

**रोज नाचणी खाणे योग्य आहे का?**

नाचणीला आपल्या संतुलित आहाराचा (बॅलन्स्ड डाएट) भाग बनवणे योग्य आहे, पण पूर्णपणे त्यावरच अवलंबून राहणे चुकीचे ठरते. कोणतेही एक धान्य संपूर्ण आहाराची जागा घेऊ शकत नाही. जर एखाद्या व्यक्तीने फक्त नाचणी खाल्ली आणि इतर डाळी, फळे आणि भाज्या कमी केल्या, तर शरीरात आवश्यक पोषक तत्त्वांची कमतरता भासू शकते. म्हणूनच, नाचणीसोबत इतर तृणधान्यांचा आहारात समावेश करणे आणि पुरेशा प्रमाणात प्रोटीन तसेच भाज्या खाणे अधिक फायदेशीर ठरते.

**नाचणीच्या भाकरीचे मुख्य फायदे**

**कॅल्शियम:** गव्हाच्या पोळीच्या तुलनेत नाचणीमध्ये कॅल्शियम खूप जास्त असते, जे हाडे आणि दातांसाठी अत्यंत फायदेशीर आहे.

**फायबर:** यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि वजन कमी करण्यास मदत होते.

**डायबिटीज नियंत्रण:** फायबर आणि कॉम्प्लेक्स कार्ब्स असल्यामुळे रक्तातील साखर (ब्लड शुगर) हळूहळू वाढते.

**ग्लुटेन फ्री:** ग्लुटेनची ॲलर्जी असलेल्या लोकांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

नाचणीची भाकरी कोणी खाणे टाळावे?

ज्या लोकांना किडनी स्टोनचा (विशेषतः ऑक्सलेट स्टोन) त्रास आहे, त्यांना नाचणी मर्यादित प्रमाणात खाण्याचा सल्ला दिला जातो.

ज्यांची पचनसंस्था जास्त प्रमाणात फायबर सहन करू शकत नाही, त्यांनी कमी प्रमाणापासून सुरुवात करावी.

**आयुर्वेद काय सांगतो?**

आयुर्वेदानुसार नाचणीचे स्वरूप 'रूक्ष' म्हणजेच कोरडे मानले जाते. त्यामुळे नाचणीचे सेवन करताना पुरेशा प्रमाणात पाणी पिणे अत्यंत आवश्यक आहे. पुरेसे पाणी प्यायल्याने पचन सुधारते आणि शरीर हायड्रेटेड राहते.

**१. एका नाचणीच्या भाकरीत किती कॅलरीज असतात?**

एका मध्यम आकाराच्या नाचणीच्या भाकरीत (४०-५० ग्रॅम) सुमारे ९५–१२० कॅलरीज असतात. भाकरीला तूप किंवा तेल लावल्यास कॅलरीज वाढू शकतात.

**२. नाचणीमध्ये किती प्रोटीन असते?**

नाचणीच्या पिठात प्रति १०० ग्रॅम सुमारे ७–७.५ ग्रॅम प्रोटीन आढळते. एका सामान्य नाचणीच्या भाकरीतून सुमारे २–३ ग्रॅम प्रोटीन मिळते.

**३. नाचणी वजन कमी करण्यास मदत करते का?**

होय, नाचणीमध्ये असलेले फायबर पोट दीर्घकाळ भरलेले ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे वारंवार भूक लागण्याची शक्यता कमी होते.

**४. डायबिटीज असलेले रुग्ण रोज नाचणी खाऊ शकतात का?**

नाचणीचा ग्लायसेमिक प्रभाव आटोक्यात मानला जातो आणि त्यात फायबरचे प्रमाणही चांगले असते. म्हणूनच याला डायबिटीज-फ्रेंडली आहाराचा भाग मानले जाते.

# असहिष्णुता की संवेदनशीलता?




अनेकांना एखादा अन्नपदार्थ खाल्ल्यानंतर शिंका येणे, श्वास घेताना घरघर होणे, अंगावर पुरळ उठणे, पोट फुगणे, जुलाब, मळमळ, सांधेदुखी किंवा थकवा यांसारखी लक्षणे जाणवतात. अशा वेळी बहुतेक जण त्याला 'अन्न ॲलर्जी' समजतात. मात्र प्रत्येक वेळी ती ॲलर्जीच असेल असे नाही. काही वेळा ही अन्न असहिष्णुता, अन्न संवेदनशीलता किंवा सेलिअक रोगाची लक्षणे असू शकतात

. या स्थितींचे स्वरूप आणि उपचार वेगवेगळे असल्याने त्यातील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. अन्न असहिष्णुता अन्न असहिष्णुता म्हणजे शरीराला विशिष्ट अन्नपदार्थ नीट पचवता किंवा त्यावर प्रक्रिया करता न येणे. याचे सर्वाधिक परिचित उदाहरण म्हणजे लॅक्टोज असहिष्णुता. वय वाढत गेल्यानंतर अनेकांच्या शरीरात लॅक्टोज पचवण्यासाठी आवश्यक असलेले लॅक्टेज हे एन्झाइम कमी प्रमाणात तयार होते. त्यामुळे दुधातील लॅक्टोज पूर्णपणे पचत नाही आणि पोट फुगणे, गॅस, पोटदुखी किंवा जुलाब यांसारख्या तक्रारी निर्माण होतात. संशोधनानुसार, जगातील केवळ सुमारे ३५ टक्के लोकच बालपणानंतरही लॅक्टोज सहज पचवू शकतात. लॅक्टोज असहिष्णुता जीवघेणी नसली, तरी ती दैनंदिन जीवनात मोठा त्रास देऊ शकते. दुग्धजन्य पदार्थ कमी करणे किंवा टाळणे, तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने लॅक्टेज एन्झाइमची पूरक औषधे घेणे उपयुक्त ठरू शकते

अन्न ॲलर्जी अन्न ॲलर्जी ही रोगप्रतिकारक शक्तीची अतितीव्र प्रतिक्रिया असते. शरीर एखाद्या निरुपद्रवी अन्नपदार्थालाही धोकादायक समजून त्याविरुद्ध प्रतिक्रिया देते. शेंगदाणे, समुद्री खाद्यपदार्थ, अंडी, दूध किंवा इतर काही अन्नपदार्थांमुळे काही व्यक्तींना श्वास घेण्यास त्रास, चेहरा किंवा घसा सुजणे, रक्तदाब अचानक कमी होणे किंवा ॲनाफिलॅक्सिससारखी जीवघेणी अवस्था निर्माण होऊ शकते. अशा वेळी तातडीने वैद्यकीय उपचार आवश्यक असतात. अन्नॲलर्जी केवळ लहान मुलांनाच होते असे नाही. ती कोणत्याही वयात, अगदी प्रौढावस्थेतही प्रथमच उद्भवू शकते. त्यामुळे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. अन्न संवेदनशीलता अन्न संवेदनशीलता ही अधिकृत वैद्यकीय निदानाची संज्ञा नसली, तरी अनेक तज्ज्ञांच्या मते ती इ्उ-मध्यस्थ रोगप्रतिकारक प्रतिसादाशी संबंधित असू शकते. मात्र याविषयी अद्याप एकमत नाही. या स्थितीत लक्षणे लगेच दिसतीलच असे नाही. ती काही तासांनी किंवा काही दिवसांनीही जाणवू शकतात. यात विशेषत: पोटदुखी, पोट फुगणे, अतिसार, डोकेदुखी, थकवा, सांधेदुखी, त्वचेवर पुरळ, लक्ष केंद्रित करण्यात अडचण, चिंता अशी संभाव्य लक्षणे दिसतात. अनेक वेळा वगळणी आहार वापरून संवेदनशील अन्नपदार्थ शोधले जातात. इ्उ चाचण्यांच्या अचूकतेबाबत मात्र तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत.

लक्षात घ्या, एखादा अन्नपदार्थ खाल्ल्यानंतर वारंवार त्रास होत असल्यास स्वतः निदान करण्याऐवजी डॉक्टर किंवा ॲलर्जी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. योग्य तपासणीनंतरच ॲलर्जी, असहिष्णुता किंवा संवेदनशीलता यातील नेमके कारण निश्चित करता येते.

# यूपीआय शुल्कवाढीचा फास

भारतीय डिजिटल वित्तीय विश्वामध्ये क्रांती घडवून आणण्यात यूपीआयचा सिंहाचा वाटा राहिला आहे. याबाबत सरकारने देशातच नव्हे तर जगासमोर आपली पाठ थोपटून घेतली. तथापि, या अफाट लोकप्रियतेचे आणि अभूतपूर्व यशाचे मुख्य कारण आहे ते यूपीआयची 'झीरो एमडीआर' धोरणावर आधारित संपूर्ण मोफत सेवा. मात्र आता एनपीसीआयद्वारे दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या पर्सन-टू-मर्चंट व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर आकारण्याचा घेतलेला निर्णय या संपूर्ण डिजिटल परिसंस्थेच्या पायालाच हादरा देणारा ठरू शकतो. या यूपीआय शुल्कवाढीचा फास डिजिटल अर्थव्यवस्था मंदावण्याची तसेच रोख व्यवहार वाढवून करचोरी आणि काळ्या पैशाचा प्रश्न वाढण्याची भीती आहे.

भारतीय वित्तीय विश्वामध्ये क्रांती घडवून आणणारी प्रणाली म्हणून 'युनिफाईड पेमेंट इंटरफेस' म्हणजेच यूपीआयचे कौतुक गेल्या दशकभरामध्ये संपूर्ण देश सातत्याने ऐकत आहे. यूपीआयमुळे वित्तीय व्यवहारांमध्ये गतिमानता आली हे वास्तव नाकारता येणार नाही. २०१६ मध्ये लाँच झाल्यापासून गेल्या १० वर्षांमध्ये अगदी महानगरांपासून ते दूरवरच्या ग्रामीण भागातील लहान-मोठ्या विक्रेत्यांपर्यंत डिजिटल व्यवहारांचे जाळे पसरवण्यात यूपीआयचा वाटा सिंहाचा राहिला आहे. या अफाट लोकप्रियतेचे आणि अभूतपूर्व यशाचे सर्वात मुख्य मूळ कारण म्हणजे 'झीरो एमडीआर' धोरणावर आधारित संपूर्ण मोफत सेवा. कोणत्याही अतिरिक्त शुल्काविना अविरत चालणाऱ्या या डिजिटल सुविधेमुळे रोख रकमांवर आधारित अर्थव्यवस्था वेगाने कॅशलेस स्वरूपाकडे वळली. मात्र आता नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाद्वारे २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या पर्सन-टू-मर्चंट व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर आकारण्याचा घेतलेला निर्णय या संपूर्ण डिजिटल परिसंस्थेच्या पायालाच हादरा देणारा ठरू शकतो.

भारतातील बहुतांश किरकोळ व्यापारी, व्यापारी संघटना आणि सूक्ष्म व्यावसायिक अत्यंत कमी नफ्याच्या मार्जिनवर काम करतात. अमेरिका किंवा युरोपसारख्या प्रगत देशांमध्ये व्यापा?यांचे नफ्याचे प्रमाण २५ ते ३५ टक्क्यांपर्यंत असते; त्यामुळे तिथे १ ते २ टक्क्यांचा एमडीआर सोसणे व्यापा-यांना शक्य होते. याउलट, भारतीय व्यापा-यांचे नफ्याचे प्रमाण हे केवळ ८ ते १० टक्क्यांच्या आसपास




किंवा त्याहूनही कमी असते. अशा स्थितीत २,००० रुपयांवरील व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर देणे व्यापा?यांच्या थेट नफ्यावर गदा आणणारे ठरते. उदाहरणार्थ, जर एखाद्या ग्राहकाने ५,००० रुपयांची खरेदी केली, तर व्यापा?याला त्यावर २० रुपये शुल्क भरावे लागेल. १ लाख रुपयांची उलाढाल पार करणा?या मध्यम व्यापा?यांसाठी हे शुल्क महिन्याकाठी मोठा आर्थिक भार ठरते. या शुल्काच्या भीतीपोटी व्यापारी एकतर २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेचे यूपीआय पेमेंट स्वीकारणे बंद करतील किंवा ग्राहकांना रोखीने व्यवहार करण्याचा आग्रह धरतील.

पोकळ दावा

यूपीआयवर लादले जाणारे हे शुल्क केवळ मर्चंट म्हणजे व्यापा?यांवर असेल आणि ग्राहकांसाठी यूपीआय पूर्णपणे मोफत राहील असा दावा केला असला, तर तो आर्थिक सिद्धांताच्या दृष्टीने निव्वळ भ्रम आहे. अर्थशास्त्रात शुल्काचे हस्तांतरण (इन्सिडेन्स ऑफ टॅक्सेशन /फी) असे एक तत्त्व आहे. त्यानुसार जेव्हा सरकार एखाद्या उत्पादकावर, व्यापा?यावर किंवा सेवा पुरवठादारावर कोणताही नवीन कर किंवा प्रक्रिया शुल्क (उदा. एमडीआर किंवा उत्पादन शुल्क) लादते, तेव्हा तो व्यापारी हे शुल्क स्वतच्या खिशातून देत नाही. व्यापारी या खर्चाचा समावेश वस्तू किंवा सेवेच्या अंतिम विक्री किंमतीत करतो. अशा प्रकारे, कराचा किंवा शुल्काचा हा भार पुढे ढकलून तो शेवटी खरेदीदाराच्या माथीच मारला जातो. इंधनावरील अबकारी कराचे गणित याचे उत्तम उदाहरण आहे. सरकार हा कर थेट तेल कंपन्यांवर लावते, परंतु कंपन्या तो खर्च पेट्रोल आणि डिझेलच्या किरकोळ किमती वाढवून सर्वसामान्य नागरिकांकडूनच वसूल करतात. यूपीआयच्या बाबतीतही हेच घडण्याची दाट शक्यता आहे.

अमेरिकेचा दबाव

जागतिक स्तरावर व्हिसा आणि मास्टर कार्ड या दोन अमेरिकन बलाढ्य कंपन्यांचे डिजिटल कार्ड व्यवहारांमध्ये एकाधिकारशाही किंवा दुहेरी मक्तेदारी राहिलेली आहे. या कंपन्या व्यापा?यांकडून १.५ ते ३ टक्क्यांपर्यंत प्रचंड एमडीआर वसूल करून अब्जावधींचा नफा कमावत होत्या. भारतात २०१६ मध्ये यूपीआयच्या आगमनाने आणि त्याच्या 'झीरो एमडीआर' धोरणामुळे या अमेरिकन कंपन्यांच्या व्यवसायाला मोठा हादरा बसला. भारतीय बाजारपेठेत यूपीआयने मिळवलेले वर्चस्व आणि आता भारत सरकारकडून सिंगापूर, फ्रान्स, यूएई, मॉरिशस आणि श्रीलंकेसारख्या देशांमध्ये यूपीआयचा केला जाणारा विस्तार यामुळे व्हिसा आणि मास्टर कार्डच्या जागतिक मक्तेदारीलाच थेट आव्हान निर्माण झाले आहे. युनायटेड स्टेट्स् ट्रेड रिप्रेझेंटेटिव्हच्या अहवालातही भारताच्या या मोफत धोरणावर आक्षेप नोंदवण्यात आला होता. प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन कंपन्यांना समान संधी देण्याच्या उद्देशाने आणि दबावाला बळी पडत भारताने हे मोफत धोरण गुंडाळल्याची टीका होत असून त्यात तथ्य आहे, असे मानण्यास जागा आहे.

जुलै महिन्यामध्ये यूपीआयवर २,३६६ कोटी रुपयांचे व्यवहार झाले होते, तर ऑगस्टमध्ये व्यवहार संख्या २,४५१ कोटींवर गेली. म्हणजे एका महिन्यात सुमारे ८५ कोटी व्यवहार वाढले. यूपीआयचा वापर किती झपाट्याने वाढत आहे हे यावरून दिसून येते. नुकत्याच पार पडलेल्या ब्रिक्स परिषदेमध्ये भारताने आपल्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा जो डंका वाजवला त्यामध्ये यूपीआय केंद्रस्थानी होते. यूपीआयची अफाट यशोगाथा ही सदर प्रणाली वापरण्यास अत्यंत सोपी आणि पूर्णपणे निःशुल्क होती म्हणूनच शक्य झाली. अचानक एमडीआरसारख्या शुल्काची कु-हाड चालवून सरकारने आपल्याच यशाच्या मुळावर घाव घातला आहे. यामुळे लहान आणि मध्यम व्यापा?यांमध्ये असंतोष पसरून ते पुन्हा एकदा समांतर अशा रोख अर्थव्यवस्थेकडे वळण्याची चिन्हे आहेत.

ऑनलाईन बँकिंगच्या सुरुवातीच्या काळात एका खात्यातून दुस?या खात्यात पैसे पाठविण्यासाठी एनईएफटी आणि आरटीजीएसच्या काही व्यवहारांवर शुल्क आकारले जात होते. व्यवहारावरील अशा खर्चामुळे डिजिटल माध्यमांचा सरसकट वापर करण्यास ग्राहकांना प्रोत्साहन मिळत नव्हते. पुढे डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी या शुल्काचा भार टप्प्याटप्प्याने कमी करण्यात आला. रिझर्व्ह बँकेने १ जुलै २०१९ पासून एनईएफटी आणि आरटीजीएस व्यवहारांसाठी बँकांकडून घेतले जाणारे प्रक्रिया शुल्क रद्द केले; त्यानंतर १ जानेवारी २०२० पासून बचत खातेदारांच्या ऑनलाईन एनईएफटी व्यवहारांवर शुल्क न आकारण्याचे निर्देश बँकांना देण्यात आले. यूपीआयवरील शुल्क आकारणीमुळे अनौपचारिक रोख व्यवहार वाढून करचोरी आणि काळ्या पैशाचा प्रश्न पुन्हा डोके वर काढू शकतो. विशेष म्हणजे याला लगाम घालण्यासाठीच डिजिटल इंडियाचा नारा दिला गेला होता. त्यामुळे, महसूल वाढवण्याच्या किंवा आंतरराष्ट्रीय दबावाला सामोरे जाण्याच्या घाईत घेतलेला हा निर्णय 'झीरो एमडीआर'च्या मूळ संकल्पनेला हरताळ फासणारा ठरत आहे.

# चीनचा एआय हवामान अंदाजाचा नवा जुगार

> 'उद्या पाऊस पडेल का?' हा प्रश्न माणसाला शतकानुशतके पडत आला आहे. कधी आकाशातील ढग, वा-याची दिशा, पक्ष्यांची हालचाल यावरून त्याचे उत्तर शोधले गेले. पुढे हवामान केंद्रे, रडार, उपग्रह आणि संगणकीय मॉडेल्स आली. आता या प्रश्नाच्या उत्तरात कृत्रिम बुद्धिमत्तेची भर पडली आहे. फरक एवढाच की, या वेळी बदल फक्त हवामानाचा अंदाज घेण्याच्या पद्धतीत होत नाही, हवामान समजून घेण्याच्या मानवी क्षमतेचीच पुनर्रचना होत आहे.

नेपाळमधील हाहाकारानंतर जगभर हवामान अंदाज आणि नैसर्गिक आपत्तींची चर्चा होत आहे. त्यातच चीनने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे हवामान वर्तवण्याच्या क्षेत्रात घेतलेली मोठी झेप संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेत आहे.

'उद्या पाऊस पडेल का?' हा प्रश्न माणसाला शतकानुशतके पडत आला आहे. कधी आकाशातील ढग, वा-याची दिशा, पक्ष्यांची हालचाल यावरून त्याचे उत्तर शोधले गेले. पुढे हवामान केंद्रे, रडार, उपग्रह आणि संगणकीय मॉडेल्स आली. आता या प्रश्नाच्या उत्तरात कृत्रिम बुद्धिमत्तेची भर पडली आहे. फरक एवढाच की, या वेळी बदल फक्त हवामानाचा अंदाज घेण्याच्या पद्धतीत होत नाही, हवामान समजून घेण्याच्या मानवी क्षमतेचीच पुनर्रचना होत आहे.

चीनने या बदलाची दिशा ओळखून मोठी झेप घेतली आहे. शांघाय एआय लॅबोरेटरीचे फेंगवू, हुआवेचे पेंगू आणि फुदान विद्यापीठाचे फुक्सी यासारखी घ् आधारित हवामान मॉडेल्स विकसित होत आहेत. पारंपरिक हवामान अंदाज पद्धतींना पर्याय म्हणून नव्हे, तर त्यांना पूरक ठरतील अशा या प्रणालींची क्षमता आता प्रत्यक्ष हवामान घटनांमध्ये तपासली जात आहे. काही चाचण्यांमध्ये फेंगवूने गुगलच्या ग्राफकास्टपेक्षा अनेक हवामान चलांमध्ये चांगली कामगिरी केली आहे. डॉल्फिन चक्रीवादळाच्या मार्गाचा अंदाजही त्याने वादळ जमिनीवर धडकण्याच्या काही दिवस आधी उल्लेखनीय अचूकतेने दिल्याचे वृत्त आहे. म्हणजेच हवामान बदलाच्या युगात कोणाकडे अधिक चांगला अंदाज बांधण्याची क्षमता आहे, याची स्पर्धा सुरू झाल्याचे हे संकेत आहेत.

आहे.



पारंपरिक हवामान अंदाजात वातावरणातील तापमान, दाब, आर्द्रता, वा?याचा वेग, समुद्राचे तापमान यांसारख्या असंख्य घटकांचा विचार केला जातो. भौतिकशास्त्रावर आधारित गुंतागुंतीची समीकरणे संगणकांच्या मदतीने सोडविली जातात. या प्रक्रियेला मोठी संगणकीय शक्ती आणि वेळ लागतो.एआय या प्रक्रियेकडे वेगळ्या पद्धतीने पाहते. प्रचंड प्रमाणातील जुन्या हवामान डेटामधून तो नमुने आणि परस्परसंबंध शिकतो. त्यावरून भविष्यातील परिस्थितीचा अंदाज तयार करतो. त्यामुळे गणना करण्याचा वेग मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. आपत्ती व्यवस्थापनासाठी हा वेग निर्णायक आहे.

चक्रीवादळाचा मार्ग काही तास आधी समजण्यापेक्षा काही दिवस आधी समजला, तर नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यापासून मच्छीमारांना समुद्रात जाण्यापासून रोखण्यापर्यंत अनेक निर्णय वेळेत घेता येतात. पूर, अतिवृष्टी, उष्णतेची लाट किंवा वादळ याबाबत मिळालेला प्रत्येक अतिरिक्त तास प्रशासनासाठी आणि नागरिकांसाठी महत्त्वाचा ठरतो. म्हणूनर्घ् चे सर्वात मोठे सामर्थ्य 'भविष्य सांगण्यात' नसून भविष्यासाठी तयारी करण्यासाठी अधिक वेळ उपलब्ध करून देण्यात आहे, पण याच ठिकाणी एक गैरसमज दूर करणे आवश्यक

**भावेश ब्राम्हणकर**

घएआय हवामान आपत्ती रोखणार नाही. ती वादळाची दिशा बदलणार नाही, पाऊस थांबवणार नाही किंवा समुद्राचे तापमान कमी करणार नाही. तिची भूमिका अधिक अचूक पूर्वसूचना देण्याची आहे आणि बदलत्या हवामानाच्या काळात ती भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे.

एआय च्या प्रगतीने प्रभावित होणे स्वाभाविक असले तरी तिच्यावर अंधविश्वास ठेवणे धोकादायक आहे. चक्रीवादळ कुठे धडकेल, पावसाचे क्षेत्र कुठे असेल किंवा तापमानातील बदल कसा होईल, याबाबतर्घ् मॉडेल्स प्रभावी ठरू शकतात. मात्र वादळाची नेमकी तीव्रता, अत्यंत टोकाच्या घटनांचे स्वरूप आणि दीर्घकालीन हवामान बदल याबाबत अजूनही मर्यादा आहेत. याचे कारणर्घ् च्या सामर्थ्यातच दडलेले आहे, पण हवामान बदलामुळे भविष्यातील हवामान स्वतच बदलत असेल, तर भूतकाळातील नमुने भविष्याला किती लागू पडतील, हा प्रश्न राहतो.

चीनच्या या प्रयत्नांकडे केवळ हवामानशास्त्रीय प्रयोग म्हणून पाहणेही चुकीचे ठरेल. आर्घ्, सेमीकंडक्टर, उच्च क्षमतेची संगणकीय व्यवस्था, उपग्रह आणि डेटा या सर्व क्षेत्रांत अमेरिका, चीन आणि युरोपमध्ये तीव्र स्पर्धा सुरू आहे. गुगलचे 'ग्राफकास्ट.' युरोपियन केंद्राचे 'एआयएफएस'यांना चीन टक्कर देत आहे. हवामान अंदाजाच्या शर्यतीत मोठे भू-राजकीय आणि आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत. हवामानविषयक माहितीचा उपयोग शेतीपुरता मर्यादित नाही. ऊर्जा उत्पादन, जलव्यवस्थापन, वाहतूक, विमा, शहरी नियोजन, आपत्ती व्यवस्थापन आणि पायाभूत सुविधांची आखणी यासाठी ती अत्यावश्यक आहे. ज्या देशाला काही दिवस आधी अचूकपणे कळू शकते की, कुठे मुसळधार पाऊस पडणार आहे, कुठे उष्णतेची लाट येणार आहे किंवा चक्रीवादळाचा मार्ग कोणता असू शकतो, त्या देशाला निर्णय घेण्यासाठी इतरांपेक्षा आघाडी मिळते. त्यामुळे भविष्यात हवामान डेटा ही रणनीतिक संपत्ती ठरू शकते. या सगळ्या तंत्रज्ञानाच्या चर्चेपलीकडे एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो. आपण हवामानाचा अंदाज अधिक अचूक करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करू, पण हवामान बदलाची मूळ कारणे कमी करण्यासाठी तेवढीच राजकीय इच्छाशक्ती दाखवू का?

चीनने हवामान आर्णिघ् यांची सांगड घालून भविष्यातील तंत्रज्ञानाची दिशा दाखवली आहे. भारताने या स्पर्धेकडे केवळ चीनच्या प्रगतीकडे पाहण्याच्या दृष्टीने पाहू नये. ही स्वतची वैज्ञानिक क्षमता उभारण्याची संधी आहे. कारण उद्याच्या जगात ज्याच्याकडे अधिक अचूक हवामान अंदाज असेल, त्याच्याकडे केवळ चांगली माहिती नसेल, त्याच्याकडे शेती, पाणी, ऊर्जा, शहर आणि आपत्ती व्यवस्थापनाबाबत निर्णय घेण्यासाठी अधिक वेळ असेल आणि हवामान बदलाच्या युगात वेळ हीच सर्वात मौल्यवान संपत्ती आहे.

भारताची अर्थव्यवस्था आणि सामाजिक रचना हवामानाशी घट्ट जोडलेली आहे. मान्सूनमधील बदल शेतीपासून सर्वच क्षेत्रांवर परिणाम करतो. अशा देशासाठी अचूक हवामान अंदाज ही चैनीची बाब नाही. भारतीय हवामान विभाग, घ्ङ्रूश्, ऱ्श्रैइ, घ्ऍध्, घ्ण्ध्घ्ए तसेच विविध विद्यापीठे आणि संशोधन संस्थांची मजबूत वैज्ञानिक पायाभूत व्यवस्था आहे. हवामान, समुद्र, उपग्रह, रडार आणि वातावरण यासंबंधी मोठ्या प्रमाणात डेटा उपलब्ध आहे. पण पुढचे पाऊल अधिक महत्त्वाचे आहे की, या डेटाचे एआय मध्ये रूपांतर करण्याची राष्ट्रीय क्षमता निर्माण करणे.

यासाठी केवळ काही प्रयोगशाळांमध्ये प्रकल्प राबवून भागणार नाही. उच्च क्षमतेची संगणकीय साधने, दर्जेदार आणि मुक्तपणे वापरता येणारा संशोधन डेटा, एआय आणि हवामानशास्त्र यांचा संगम साधणारे तज्ज्ञ आणि दीर्घकालीन सरकारी गुंतवणूक आवश्यक आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे अंदाज लोकांच्या दारापर्यंत पोहोचला पाहिजे.

# गायीच्या पाठीवर कावळा!

गाय रस्त्याच्या कडेनं हिरवं गवत शोधत हिंडत होती. कावळा तिच्या पाठीवर आरामात बसलेला होता. तिच्या मऊ केसांमध्ये लपून बसलेले इवले इवले चवदार जीव म्हणजे कावळ्यासाठी जणू मेजवानीच होते. कावळा मध्येच चोच मारायचा, आपलं भक्ष्य मटकावता मटकावता चेहरा डावी-उजवीकडे फिरवत मध्येच गायीच्या पाठीवर मानेकडून शेपटीकडे आणि शेपटीकडून पुन्हा पाठीवर मध्यभागी येऊन थांबायचा. गायीनं कान टवकारत मान वर करून तिरप्या नजरेनं पाठीवरच्या कावळ्याकडे पाहिलं आणि म्हणाली, 'मला वाटलं तुला मान नाही.' तिच्या प्रश्नात चोच खुपसत कावळा म्हणाला, 'नीट बघ पुन्हा माझ्याकडे. माझा चेहरा संपतो आणि लगेचच शरीर सुरू होतं, मला खरंच मान नाही आणि गळाही नाही.'

'अरे बावळटा, एका ओळीच्या पोस्टमध्ये तुझं नाव आलं, म्हणजे केवढा मान मिळाला बघ तुला. त्या विषयी बोलते आहे मी.'

'अच्छा, त्या पोस्टचं म्हणतेस. पण मी कधी गं तुला शाप दिला?'

'मला काय माहीत? दिला असशील मनातल्या मनात!'

'खरं तर तुझ्यामुळे माझी खूप बदनामी झालेली आहे आजपर्यंत, पण मी कधी अवाक्षरही काढलेलं नाही त्याबद्दल.'

'माझ्यामुळे बदनामी झाली. ती कशी?'

'तुझ्या पाठीवर बसून मी तुला त्रास देणाऱ्या किड्यांचा बंदोबस्त करतो. तू मात्र माझी फसवणूक केलीस.'

'कधी केली फसवणूक?'

'अगं, हजारो वर्षांपासून सगळेच सांगतात. काऊचं घर होतं शेणाचं... चिऊचं घर होतं मेणाचं. एकदा खूप पाऊस आला आणि शेणाचं घर वाहून गेलं. आपले चांगले संबंध आहेत, म्हणून मी तुझ्या शेणावर विश्वास ठेवला. पण त्यामुळे मला घर बांधण्याची अक्कल नाही, असं वाटलं लोकांना. ही माझी बदनामी नव्हे काय?'

राहुल गांधींकडून मोदींची खिल्ली! अनर्ह ईईंने यांचं सडेतोड प्रत्यूत्तर

'अच्छा, म्हणजे तुझं घर वाहून गेलं होतं, म्हणून तू मला शाप दिला होतास तर!'

'नाही गं, शेणा-मेणातला फरक मलाच कळला नाही. त्यात तुझा काय दोष?'

'पण मग हे गायीला शाप देण्याचं प्रकरण नेमकं कधी झालं?'

'खरंच मला माहिती नाही. अगं, फक्त शेणा-मेणाचं जाऊ देत, तशीही वर्षानुवर्षं माझी फसवणूक होत आहे. कोकिळेचं तुला माहिती आहेच. लहान मुलांच्या आयासुद्धा एक घास काऊचा म्हणून हवेत हात उंचावतात, ते ऐकून मी मोठ्या आशेनं चोच उघडतो, तर तो घास जातो चिमुकल्याच्या पोटात. मी आपला उपाशीच.'


'अच्छा, मुलांच्या आया घास दाखवून तुला उपाशी ठेवतात, कोकिळा तुला फसवून तुझ्या घरट्यात अंडी घालते, भर पावसात तुला चिमणीचं दार ठोठवावं लागतं या सगळ्याचा राग तू जगावर काढतोस वाटतं.'

'मी जगावर राग काढतो? कधी काढला?'

'परवा, तू आणि तुझा तो मित्र दोघेही माझ्या पाठीवर बसला होता, तेव्हा तुमचं बोलणं ऐकलं मी.'

'काय बोललो होतो आम्ही?'

'कुणाच्या तरी खिडकीत जाऊन बसला होतास तू आणि त्या घरातल्या म्हाताऱ्यानं तुला हाकलून लावलं. तेव्हा तू रागानं म्हणाला होतास ना, आपण



ठराव करू या, याच्या पिंडाला आपल्यापैकी कुणीही अजिबात शिवायचं नाही.'

'अगं आम्हा कावळ्यांची शाळा भरते रोज झाडावर, तेव्हा काही तरी विषय हवा असतो, गप्पांसाठी. नुसतंच काव काव करत टाइमपास करत बसण्यापेक्षा चर्चेला मुद्दा असला की बरं वाटतं. पण कुणाच्या पिंडाला शिवायचं आणि कुणाच्या नाही, हे आम्हाला नाही ठरवता येत. वरून आदेश आला की शिवावंच लागतं.'

'ठीक आहे रे, आपल्या हातात नसतात काही गोष्टी. बघ ना आता, गाय पवित्र, गायीचं दूध जास्त पोषक, पण आमच्या दुधाचा भाव मात्र म्हशीच्या दुधाच्या भावापेक्षा कमी. आता काय बोलणार? तोंडानं देशी देशी म्हणायचं आणि जरसी गायीचं कौतुक करायचं. ही माणसं अशीच असतात.'

'तुला सांगतो, ती जी पोस्ट होती ना, त्यात सुद्धा तुझा माझा उल्लेख आपला उगाच जगाला दाखवण्यासाठी आहे म्हणतात, त्यांचा रोख मात्र भलत्याच लोकांकडे होता...'

'अच्छा... म्हणूनच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री त्यांच्या घरी गणपतीच्या दर्शनाला गेले नाहीत तर. पण तुला बरं कळलं हे?'

**तुंबी दुराई**

'कावळ्याच्या शापानं गायी मरत नाहीत' ही पोस्ट वाचल्या वाचल्या त्यांना जाब विचारायला गेलो होतो मी. आमचं दोघांचं बरं चाललंय, तुम्ही कशाला आमच्यात भांडण लावताय, असं विचारणार होतो मी.'

'मग? का नाही विचारलास?'

'अगं, त्यांच्या घरात जमलेले कार्यकर्ते चर्चा करत होते, साहेबांनी हे कोणाविषयी म्हटलेलं आहे हे त्यांनाही कळत नव्हतं.'

'अच्छा?'

'हो. मग थोडे वरच्या लेव्हलचे कार्यकर्ते आले. त्यांनाही काही टोटल लागत नव्हती.'

'बाप रे.'

'मग आणखी थोडे वरच्या लेव्हलचे आले. अशी गर्दी वाढतच गेली. साहेबांनी ही एका ओळीची पोस्ट नेमकी कुणाला उद्देशून लिहिली आहे यावर सगळेच मंथन करत होते.'

'बरं, पुढे काय झालं?'

'साहेब, त्यांच्या खास घोळक्यात बसले होते, ते म्हणाले, या निमित्तानं कार्यकर्ते विचार करत आहेत, हे काय कमी झालं? गोष्टी अर्धवट सोडल्याचा फायदा होतो हे आज मी पुन्हा एकदा सिद्ध केलं. हो की नाही?'

'यावर सगळे माना डोलवीत हो म्हणाले, मग मी उडून आलो आणि तुझ्या पाठीवर बसलो.'

पाठीवर बसलेल्या कावळ्याकडे पुन्हा एकदा मान तिरकी करत कौतुकानं पाहात गाय म्हणाली, 'हुशार माणसांना उगाच काही काकबुद्धी म्हणत नाहीत...' कावळ्यानं खुशीनं जागीच उडी घेतली आणि तो गायीच्या मऊ केसांमध्ये किडे शोधू लागला... गाय पुन्हा गवताच्या शोधात निघाली.